कर्नाटक सरकार

# समाज विज्ञान

## भाग – II

## मराठी माध्यम

## (सुधारित)

# 6

## इयत्ता सहावी

कर्नाटक पाठ्यपुस्तक संघ (रजि.)
100 फूट रिंग रोड, बनशंकरी 3 रा टप्पा
बेंगळूरु - 560 085.

©KTBS
Not to be republished

# अनुक्रमणिका


| पाठ क्रमांक | इतिहास | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| 1 | आपले कर्नाटक (फुढीले भाग) कलबुरगी | 01 |
| 2 | दक्षिण भारतातील प्रमुख राज्य धराणी | 38 |
| 3 | कोडगू, कित्तूर, तुळूनाडू आणि हैदराबाद कर्नाटक | 72 |
| 4 | धर्म आणि समाज सुधारक | 89 |
| 5 | भारतीय इतिहासात रजापूत | 95 |
| | नागरिक शास्त्र | |
| 6 | शासन | 102 |
| 7 | केंद्र सरकार, राज्य सरकार, न्यायांग | 109 |
| 8 | मानव हक्क | 121 |
| | भूगोल विज्ञान | |
| 9 | युरोप - आशियाचे पर्यार्या द्वीप | 125 |
| 10 | आफ्रिका - केंद्रिय खंड | 143 |


©KTBS Not to be republished

पाठ 1

# आपले कर्नाटक (पुढील भाग)

## कलबुरगी विभाग

या विभागात 6 जिल्हे आहेत. ते म्हणजे कलबुरगी, बळ्ळारी, रायचूरु, कोप्पळ, बिदर आणि यादगिरी. आपल्या राज्यतील कलबुरगी विभागामध्ये साक्षरतेचे प्रमाण, दरडोई उत्पन्न, शेतीमध्ये मागास, जीवनमान आयुष्य अत्यंत कमी आहे. कर्नाटक सरकारने 2000 मध्ये राज्यामध्ये हा विभाग मागासलेला का राहिला. याची कारणे शोधण्यासाठी डॉ.डी.एम. नंजुडप्पा यांच्या अध्यक्षतेखाली प्रादेशिक असमानता अध्ययन उच्चाधिकार समिती स्थापन केली. त्याच्या प्रमाणे अत्यंत मागासलेला विभाग म्हणजे कलबुरगी होय. या विभागातील जिल्हयांना विशेष सहाय देण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने संविधानात कलम 371 (जी) नुसार विशेष स्थान दिले आहे.




**कलबुरगी विभाग**

©KTBS Not to be republished

## कलबुरगी विभागील जिल्हे

### पूर्व इतिहास

या विभागातील जिल्हयाना अत्यंत श्रेष्ठ असा प्राचीन इतिहास आहे. इतिहास पूर्व अवशेषामधून दिसून येतो. आरंभी हा प्रदेश मौर्य साम्राज्यात होता. नंतर तो शातवाहनांच्या साम्राज्यात सामील झाला. अशोकाची अनेक शिल्पकला येथे पहा-वयास मिळतात. सामान्य शके 8 व्या शतकात राष्ट्रकूट साम्राज्य राज्ये कारभार करीत होते. त्यांची राजधानी कलबुरगी जिल्ह्यातील मान्यकेट (आजची मुळखेड) ही होती. नंतर कल्याणच्या चालुक्यानी राज्यकारभार केला. बसवकल्याण ही त्यांची राजधानी होती. बळ्ळारी जिल्हयातील हंपी ही विजयनगर राज्याची राजधानी होती. प्रसिद्ध वचनकार बसवेश्वरांच्या नेत्वृत्वाखाली चाललेल्या वचन चळवळीचे केंद्र कल्याण हे कलबुरगी विभागात येते. पुढे मध्ययुगात बहमनी राजे अधिकारावर आले. त्यांची राजधानी कलबुरगी होती. बहमनी आणि विजयनगर साम्राज्यांचे पतन झाल्यानंतर कलबुरगीचा प्रदेश हैदराबादच्या निजामांच्या अधिपत्याखाली आला. पुढे 1948 मध्ये निजाम संस्थान भारतीय गणराज्यामध्ये विलीन झाले. राज्य पुनर्रचना योजनेनुसार निजाम संस्थानाच्या अधिपत्याखाली असलेले बीदर, कलबुरगी आणि रायचूरु जिल्हे 1956 मध्ये कर्नाटकात सामील झाले. कलबुरगी हे विभागीय केंद्र आहे. मद्रास प्रांतांत असलेला बळ्ळारी जिल्हा कर्नाटकात सामील झाला.



शिलालेख

बहमनी आणि विजयनगर साम्राज्याच्या राजकारभारानंतर अनेक संस्थानीक स्वतंत्र झाले. त्यांच्यामध्ये हरपनहळ्ळी, जरीमले, संडूरु आणि सुरपूर नायक प्रसिध्द होत. कृषणप्पनायक याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा वेंकटप्पा नायक अधिकारावर आला. पहिल्या स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतलेल्या वेंकटप्पानायकने ब्रिटीशांच्या विरूद्ध लढा दिला. परंतु त्याचा लढा अयशस्वी झाला. वेंकटप्पा नायकाला ब्रिटीशानी कैद करून कैदखान्यात डांबून ठेवले. कलबुरगी आणि रायचूरु जिल्हे निजाम संस्थानाचा भाग होता. हे जिल्हे 1956 साली कर्नाटकात सामील झाले.

### हैदराबाद कर्नाटक प्रदेश मुक्ती संग्राम

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हैद्राबाद संस्थान भारतात विलीन करण्यात

©KTBS Not to be republished

तयार नव्हते. यामुळे चिडलेल्या लोकानी निजामशाही विरूद्ध बंड पुकारले. या भागातील स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व स्वामी रमानंदतीर्थ यानी केले. निजामाच्या अधिपत्याखाली असलेले हैदराबाद कर्नाटक प्रदेशाच्या मुक्ती संग्रामामध्ये पुढाकार घेतलेल्यामध्ये सरदार शरणगौडा इनामदार, शिवमूर्ती अळवंडी, शिरूर विरभद्रप्पा, प्रभूराज पाटील संगनाळ, पुंडलिकप्पा इत्यादी होत. निजामशाही विरूद्ध सत्याग्रह केला. निजाम सरकारने नागरीकांच्या वर हिंसाचार केला. रजाकार या निजामाच्या खाजगी सैन्या विरूद्ध लोकानी तीव्र लढा सुरू केला. केंद्र सरकारने योग्यक्रम घेऊन निजामसंस्थान भारतात 17 सप्टेंबर 1948 मध्ये विलीन केले. त्यावेळी सरदार वल्लभाई पटेल हे गृहमंत्री होते. जवाहरलाल नेहरु पंतप्रधान होते.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) संविधानाच्या कोणत्या कलमामध्ये कलबुरगी विभागातील जिल्ह्यांना विशेष स्थान दिले आहे?

2) निजाम संस्थान कोणत्या साली भारतात विलीन झाले?

3) बळ्ळारी जिल्हयातील हंपी ही कोणत्या साम्राज्याची राजधानी होती?

4) विजयनगर आणि बहमनी राज्यघराण्यांच्या पतनानंतर राज्यकारभार केलेल्या दोन संस्थानांची नांवे लिहा.

**रिकाम्या जागी शब्द भरा.**

1) बळ्ळारी जिल्हयातील__________येथे विजयनगर साम्राज्याची राजधानी होती.

2) कलबुरगी विभागातील जिल्हयांना __________साली स्वातंत्र्य मिळाले.

**भौJ|||लीक साधन संपत्ती**



तुंगभद्रा धरण

या विभागातील प्रमुख नद्या म्हणजे भिमा, तुंगभद्रा, कृष्णा, मुल्लामारी, बेण्णेतोर इत्यादी होत. कारंज धरण बीदर जिल्हयाला वरदान ठरले आहे. लालमाती, काळी माती आणि चिकण माती या विभागात आढळते. कोप्पळ आणि रायचूर जिल्ह्यामध्ये भात हे

©KTBS Not to be republished

प्रमुख पीक पिकवितात. ऊस हे प्रमुख आर्थिक पीक आहे. कापूस, तीळ, कुसमं, जोंधळा, कुळथी (हुरळी), तूर इत्यादी या भागातील पिके आहेत. या विभागात जंगली भाग (अरण्याचा प्रदेश) क्वचितच आढळतो. बळ्ळारी जिल्हयातील संडूरु तालुक्यामध्ये दाट जंगली प्रदेश आहे. बीदर जिल्हयात विरळ जंगली प्रदेश आहे. कोप्पळ जिल्हयामध्ये जंगली प्रदेशाचा भाग अत्यंत कमी प्रमाणात आहे.

या विभागातील जिल्हयामध्ये मिळणारी प्रमुख खनिजे म्हणजे चांदी, सिलीकॉन, सोने (रायचूरु जिल्हा) लोंखडाचे खनिज, चुन्याचा दगड, मँगनीज खनिज (बळ्ळारी). ग्रॅनाईटचे दगड या विभागातील सर्व जिल्हयामध्ये मिळतात. भौगोलिक साधन संपत्तीच्या दृष्टीने हा समृद्ध विभाग नाही.



**लोखंडाची खाण**

या विभागातील रायचूरु आणि बळ्ळारी जिल्हयांना तुंगभद्रा धरणाचा पाणीपुखठा होतो. कृष्णा नदीला अडवून बांधलेल्या बसव सागर धरणातून रायचूरु, कलबुरगी जिल्हयातील शेतीला पाणी पुरवठा करतात.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) या विभागातील प्रमुख दोन नद्या कोणत्या ?
2) बीदर जिल्हयातील एका धरणाचे नांव लिहा.
3) बळ्ळारी आणि रायचूरु जिल्हयांना पाणीपुखठा करणाऱ्या धरणाचे नांव लिहा.

Not to be Republished

## आमच्या विभागातील अरण्ये, जंगली प्राण्यांची निवास स्थाने

हा विभाग अरण्यांची कमतरता असणारा भाग आहे. मोठे प्राणी येथे आढळत नाहीत. लंगूर (माकडा सारखा प्राणी) हरिण, कोल्हा, माकडे, अस्वले, लांडगा रानटीकुत्रा इत्यादी प्रमुख जंगली प्राणी येथे आढळतात. बळ्ळारी जिल्हयामध्ये दरोजी अस्वल धाम आहे. रायचूर जिल्हयात हरिणे आढळून येतात.



**दरोजी धाम**

## आमची शेती सुधारणा, आमचे उद्योगधंदे.

या विभागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. येथे पावसाचे प्रमाण कमी आहे. पावसावर अवलंबून असणारी पिके येथे पिकवितात. पावसाचे प्रमाण अत्यंत कमी असल्यामूळे येथे वरचेवर दुष्काळ लोकांना सतावतो. या विभागातील जिल्हयांना दुष्काळग्रस्त जिल्हे म्हणून ओळखतात. या विभागातील प्रमुख उद्योग म्हणजे लोखंड आणि पोलाद, साखर, सिमेंट दगडी कोळसा पासून तयार होणारी विद्यूत केंद्रे इत्यादी होत. उद्योगधंद्यानी या विभागातील पुरूष व महिलाना उद्योग मिळवून दिला आहे.

©KTBS Not to be republished

बळ्ळारी आणि कोप्पळ जिल्हयामध्ये लोखंड आणि पोलादाचे कारखाने आहेत. यादगिर आणि कलबुरगी जिल्हयामध्ये भरपूर सिमेंट कारखाने आहेत. बिदर जिल्हयाची बिदरी कला प्रसिध्द आहे. या विभागात प्रेक्षणीय स्थळांची प्रगती होत आहे. या विभागातील प्रमुख प्रवासी (प्रेक्षणीय) केंद्रे म्हणजे बळ्ळारी जिल्हयातील हंपी, तुंगभद्रा धरण, रायचूरु जिल्हयातील हट्टी येथील सोन्याची खाण इत्यादी होय. संपूर्ण भारतात सोने उत्पादन करण्याचे केंद्र रायचूरु जिल्हयातील हट्टी येथे आहे. येथे सोन्याचे उत्पादन केले जाते.



**हट्टी सोन्याची खाण**

© KTBS Not to be republished

## खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1) कलुबुरगी विभागातील प्रमुख उद्योगांची नावे लिहा.

2) या विभागातील कोणत्या जिल्हयामध्ये मोठ्या प्रमाणात लोह खनिजाच्या खाणी आहेत?

3) कलबुरगीमध्ये असलेल्या दर्ग्याचे नांव काय?

4) कलबुरगी जिल्हयातील प्रमुख उद्योगधंदे कोणते?

## खालील रिकाम्या जागा भरा.

1) या विभागातील ....................... येथे सोन्याची खाण आहे.

2) बळ्ळारी जिल्हयातील ................. येथे वन्य प्राणी धाम आहे.

## कला, साहित्य, संगीत, लोकगीत, नृत्य

कलबुरगी विभागातील जिल्हे आर्थिक दृष्ट्या मागासलेले असतील. परंतु कला, साहित्य, संगीत, लोकगीत, नृत्य इत्यादी विषयामध्ये समृद्ध आहेत. साहित्य क्षेत्रात कलबुरगी प्राचीन विभागाला इतिहासात महत्व आहे. कन्नड भाषेतील शास्त्रकृति 'कविराज मार्ग' ची रचना राष्ट्रकुटांच्या काळात झाली हे विसरून चालणार नाही. आदि कवी पंप यांने आरीकेसरी राजाच्या आश्रयात आसताना 'विक्रमार्ज विजय' या महत्वपूर्ण काव्यानी रचना केली. पंप, पोन्न आणि रन्न यांना कन्नडमधील तीन रत्ने असे संबोधले जाते. हे तिघेही कलबुरगी विभागातील आहेत. कन्नडमधील प्रथम व्याकरण ग्रंथ 'शब्दमणीदर्शनम' चे रचनाकार केशीराज हे सुद्धा कलबुरगी विभागा-तीलच होत.

## वचन चळवळ



बसवण्णा

12 व्या शतकात कर्नाटकात उदयास आलेली महत्वाची समाज सुधारणा चळवळ वचन चळवळ कबलुरगी विभागातील कल्याण नगरामध्ये चालली होती. बसवण्णा, अल्लमप्रभू, अक्कमहादेवी, बेडर (देवाचा) दासीमय्या, सिद्धराम इत्यादी शिवशरणानी केलेल्या सिद्धी साधनेचे कार्यक्षेत्र कलबुरगी विभागातील होते. या चळवळीमध्ये सर्व बाबतीत असमानतेचा तिरस्कार केला. या चळवळीने अस्पृश्यतेच्या विरूद्ध युद्ध पुकारले. या चळवळीचा एक भाग म्हणून धार्मिक आणि सामाजिक वर्तुळातील अनेक पुरुष महिलांनी वचने लिहिली.

## दास साहित्य



पुरंदर दास

कलबुरगी विभागातील रायचूर जिल्हा दास साहित्याचे माहेर घर होय. श्रीव्यासरायांच्या नेतृत्वाखाली दास संघाची स्थापना झाली. त्यानी स्पृश्य अस्पृश्य असा भेदभावांच्या आ-चरणांचा तिरस्कार केला. पुरंदरदास, कनकदास, राघवेंद्रतीर्थ इत्यादीनी किर्तनांची रचना केली. जातीभेदा बद्धल त्यांनी किर्तनातून टीका केली. पैशाचा माज असणाऱ्यांची आपल्या किर्तनातून निंदा केली.

© KTBS Not to be republished

## तत्व पदकार

वचन चळवळ दास साहित्य, प्राचीन काव्य इत्यादीच्या विचारानी प्रभावित झालेल्या लोकांनी तत्व पदांची रचना केली. लोकगीत कलाकार, साधू संत, फकीर यांनी रचलेल्या (लिहिलेल्या) काव्यानाच 'तत्वपद' असे म्हणतात. 18 व्या आणि 19 व्या शतकात अनेक तत्वपद कारांनी लिंग भेदाभेदा विरुद्ध, खोटे बोलणाऱ्यांच्या विरुद्ध, पैसा (संपत्ती) गोळा करणाऱ्यांच्या विरुद्ध आपल्या तत्व पदामध्ये विडंबन केले आहे. चेन्नर जलालसाब, हनुमंतव्वा इत्यादीनी तत्व पदाच्या रचना केल्या. अनेक निरक्षरानी तत्वपदांची रचना करून गायील्या आहेत.

आधुनिक काळात कलबुरगी विभागाला साहित्य क्षेत्राला वैभव प्राप्त करून दिलेल्यांमध्ये सिद्धय्या पुराणीक, जयतीर्थ राजपुरोहीत, शांतरस, पंडीत तारानाथ, बीची, मुदेनूर संगण्णा, सिंधी लिंगण्णा, श्रीमती शैलजा चडचण, जयदेवी ताई लिगाडे चेनण्ण वालीकार, जंबण्ण अमरचिंत इत्यादी होत. संगीत क्षेत्राला सुद्धा देणगी कलबुरगी विभागाने अपार दिलेली आहे. सिद्धराम जंबलदिनी, पंडीत तारानाथ, गजल गुंडम्मा, सुभद्रम्मा,मन्सुर इत्यादीनी संगीत क्षेत्राला योगदान दिले आहे. चित्रकलेमध्ये प्रसिद्ध एस.एम.पंडीत यांचे नांव अग्रस्थानी आहे. लोकगीत, नाटक क्षेत्रामध्ये कलबुरगी विभागात दोड्डाट, सन्नाट, बोलक्या बाहुल्यांचे प्रदर्शन इत्यादी प्रचलीत आहेत. बोलक्या बाहुल्यांच्या खेळामध्ये बेळगळ विरण्णा प्रसिद्ध होते.

नंदी बैलाचे नृत्य, आल्लावा नृत्य, चौडम्माचे नृत्य, लमाणी नृत्य, टिपरी नृत्य, दुरगु-मुरगी (लाड-लक्ष्मी) इत्यादी लोक कलांचे प्रकार आहेत. करडी मजल, किलेक्यातळ खेळ, मोहरम नृत्य, बहुरूपी इत्यादी लोकगीताचे प्रकार आहेत. बीदर जिल्हयाची बीदरी कला, किन्नाळच्या बाहुल्या, कोप्पळ जिल्ह्याची घोंगडी (रग) इत्यादी प्रचलीत असलेल्या पारंपरिक कला आहेत.

### खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1) कलबुरगी विभागात प्राचीन काळात रचना केलेल्या दोन काव्यांची नांवे लिहा.
2) वचन चळवळी बद्धल माहिती लिहा.
3) दास साहित्यामध्ये साधना केलेल्या दोन श्रेष्ठ दासांची नांवे लिहा.
4) कलबुरगी विभागातील लोकनृत्यांची नांवे लिहा.

## आमचे शिक्षण आमचे आरोग्य

आपल्या राज्यामध्ये शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले जिल्हे यादगीरी आणि रायचूरु हे कलबुरगी विभागातच आहेत. शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने साक्षरतेचे प्रमाण येथे

©KTBS Not to be republished

कमी आहे. अलिकडे साक्षरतेच्या प्रमाणात उत्तम वाढ होत आहे. या विभागातील कलबुरगी शहरात गुलबर्गा विश्वविद्यालय आहे. आणि कर्नाटक केंद्रिय विश्वविद्यालय आहे. रायचूरु जिल्हयात कृषि विश्व विद्यालय आणि बळ्ळारीमध्ये विजयनगर श्रीकृष्ण देवराय विश्व विद्यालय आहे. या जिल्हयातील हंपी प्रदेशामध्ये कन्नड विश्वविद्यालय आहे. बीदरमध्ये पशु संगोपन आणि मासेमारी विश्व विद्यालय आहे.

बळ्ळारी, कलबुरगी, रायचूरु, बीदर मध्ये वैद्यकीय कॉलेज आहेत. प्रत्येक जिल्हयात जिल्हा हॉस्पिटल आहेत. ग्रामीण भागातील लोकांना आरोग्य सुविधा देणेसाठी आरोग्य उपकेंद्रे आहेत. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रामध्ये तीव्रगतीने प्रगती होत आहे.



**बौद्ध विहार**



**गुलबर्गा विश्वविद्यालय**

Not to be republished © KTBS

## ✻ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1) या विभागातील रायचूरु जिल्हयात असलेली विश्वविद्यालये कोणती?
2) बळ्ळारी जिल्हयातील दोन विश्वविद्यालये कोणती?
3) कन्नड विश्वविद्यालय कोणत्या ठिकाणी आहे?

## ✻ रिकाम्या जागा भरा.

1) कर्नाटक केंद्रिय विश्वविद्यालय ............ जिल्हयात आहे.
2) बळ्ळारी जिल्हयातील हंपी येथे असलेल्या विश्वविद्यालयाचे नाव .......... होय.

## सांस्कृतीक संपत्ती

कलबुरगी विभाग आर्थिक संपत्तीच्या दृष्टीने मागासलेला असला तरी त्यांची सांस्कृतीक संपत्ती समृद्ध आहे. संगीत, साहित्य, चित्रकला, लोकगीत, नाटक, नृत्य इ. क्षेत्रात कलबुरगी विभागातील जिल्ह्यांचे आपल्या कर्नाटकाला मोठे योगदान आहे. कर्नाटकातील प्राचीन चार राज्य घराण्यांनी याला आश्रय दिला होता. ती राज्यघराणी म्हणजे राष्ट्रकूट, कल्याणचे चालुक्य, बहमनी आणि विजयनगर साम्राज्य होय. या राज्यघराण्यांच्या काळात साहित्य, कला, संगीत याना प्रोत्साहन मिळाले.

बीदरची बीदरीकला, किन्नाळची खेळणी, वाकळ इत्यादी (गृह उद्योग) येथे आहेत. प्राचीन वास्तुशिल्पकलेमुळे हे प्रसिद्धीत आले. हंपीतील स्मारके, बसवकल्य_ ाणचे बसव स्मारक, कलबुरगीचा ख्वाजा बंदेनवाज दर्गा, सन्नती मधील स्मारके इत्यादी येथील वास्तुशिल्पाची आश्चर्ये झाली आहेत.



**किन्नाळातील बाहुल्या**

## स्वातंत्र सैनिक

कर्नाटकातील इतर भागात भारताच्या स्वातंत्र्यासाठी आणि कर्नाटकाच्या एकीकरणासाठी संघर्ष केला असला तरी कलबुरगी विभागातील लोकांनी स्वातंत्र्या साठीच्या चळवळीमध्ये, निजाम संस्थानाची मुक्ती संघर्षाच्या चळवळीमध्ये आणि कर्नाटक एकीकरण चळवळीमध्ये भाग घेणे आवश्यक झाले. स्वातंत्र्य चळवळीशी संबंधीत असलेल्या कलबुरगी विभागातील दोन बाबींचा उल्लेख केला पाहिजे. एक म्हणजे राष्ट्रीय चळवळी बद्धल लोकांच्या मध्ये जागृती निर्माण करण्यासाठी वाचनालय

©KTBS Not to be Republished

चळवळ आणि दुसरी म्हणजे मुलांना शिक्षण देण्यासाठी आणि स्वातंत्र्य चळवळीबद्धल माहिती देण्यासाठी केंद्रिय (राष्ट्रीय) शाळा स्थापन केल्या. चार राष्ट्रीय शाळांची स्थापना केली.

1)नूतन विद्यालय कलबुरगी (1907)

2)उस्मानिया राष्ट्रीय शाळा (चिंचोळी)

3)विद्यानंद गुरुकुल, कुकनूर (1922)

4)हमदर्द राष्ट्रीय शाळा, रायचूरु (1922)

आर्य समाज आणि वंदेमातरम चळवळीतून या विभागातील स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा मिळाली. महागावच्या कल्याण शेट्टी याने स्वातंत्र्याची चळवळ सुरु करण्यास-ाठी तरूण संघाची संघटना केली. महागावच्या चंद्रशेकर पाटील यांनी अध्यक्ष म्हणून हे कार्य पुढे चालविले. श्री रमानंद तीर्थ हे या विभागातील प्रमुख स्वातंत्र्य सैनिक होते. त्याशिवाय शेकडो लोकांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेतला होता.


श्री रमानंद तीर्थ

निजामशाहीमुक्तीच्या चळवळीमध्ये मुख्य भूमिका बजावलेला सरदार शरणगौडा इनामदार हा प्रमुख होता. निजामाच्या खाजगी सैन्याच्या रजाकारांनी कलबुरगी विभागातील नागरीकांच्यावरती अत्याचार (हिंसा) केले. त्याविरोधात लोकांनी तीव्र विरोध केला. भारताला 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले पण निजाम संस्थान 17 सप्टेंबर 1948 रोजी भारतात विलीन झाले.

## ✻ खालील प्रश्नांना उत्तरे द्या.

1) कलबुरगी विभागातील स्वातंत्र्य चळवळी बरोबर आणखीन दोन चळवळी सुरू होत्या त्या कोणत्या?

2) निजामाच्या खाजगी सेनेचे नांव काय?

3) कलबुरगी विभागात स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग म्हणून सुरू झालेल्या दोन राष्ट्रीय शाळांची नावे लिहा.

4) हैदराबादचे निजाम संस्थान कोणत्या तारखेस भारतात विलीन झाले?

5) कलबुरगी विभागातील प्रमुख नेत्यांची नांवे काय?

©KTBS Not to be republished

## आमच्या विभागातील जिल्हयांची वैशिष्टये

या विभागात 6 जिल्हे आहेत. प्रारंभी चार जिल्हे होते. परंतु 1997 मध्ये रायचूर जिल्हयाचे विभाजन करून कोप्पळ जिल्हयाची निर्मिती केली आणि कलबुरगी जिल्हयाचे विभाजन करून यादगीर जिल्ह्याची 10 एप्रिल 2010 रोजी निर्मिती केली. बहमनी राजांच्या कारकिर्दीत येथे इस्लामिक कला वाढीस लागत्नी.

या जिल्हयामध्ये अनेक प्राचीन स्मारके आणि स्थळे आहेत. यामध्ये प्रसिद्ध असलेले सन्नती व येथे अनेक बौद्ध विहारांची स्मारके आहेत. कागीणा नदीच्या काठावर मान्यखेट आहे.

## कलबुरगी जिल्हा

हा जिल्हा सिमेवरती आहे. हा 10-11 व्या शतकात अस्तित्वात आला असे म्हटले आहे. हा जिल्हा 13 व्या शतकात प्रसिद्ध बहमनी राज्याची राजधानी होती. या जिल्हयाची विभागणी करून 10 एप्रिल 2010 रोजी यादगीर जिल्हयाची निर्मिती केली. या जिल्हयातील मुख्य पिके म्हणजे तुर, जोंधळा, कापूस, बागायती पिके इत्यादी होत. जगामध्ये अतिलांब म्हणजे 29 फूट लांबीची तोफ बहमनींच्या काळात सामील झालेली येथे आहे असे सांगीतले जाते. या नगरीत असलेले शरण बसेवेश्वरांच्या देवालयाच्या जत्रेतील हमारो भक्त लोंकाना आकर्षित करते. त्या प्रमाणेच ख्वाजा बंदेनवाज दर्ग्याशी संबंधीत उरस हजारो भक्तांना आकर्षित करतो. या जिल्हयामध्ये असलेल्या घुमटांमधून नैसर्गिक रंगापासून काढलेली अद्भूत चित्रे आहेत. बहमनी सुलतानानी 1347 मध्ये बांधलेला किल्ला आकर्षणीय आहे. अलिकडच्या काळात कलबुरगी शहरात सिद्धार्थ बौद्ध विहाराची निर्मिती केली आहे. या बौद्ध विहाराचे उदघाटन  तिबेटीयन गुरु दलाई लामा यांनी केले. या जिल्हयातील भिमा नदीच्या तीरावर भगवान दत्तात्रयांचे पुण्य क्षेत्र गाणगापूर आहे.

या जिल्हयात दोन विश्वविद्यालये आहेत. एक म्हणजे गुलबर्गा विश्वविद्यालय आणि दुसरे म्हणजे कर्नाटक केंद्रिय विश्व विद्यालय होय.

या जिल्हयातील सेडम तालुक्यात बाळंतीण खांब हा 52 फूट उंच आहे. हा खांब जमीनीला टेकलेला नाही. त्याच्या बुडाखालून पातळ कपडयाचा तुकडा आरपार पाहू शकता. या जिल्ह्यातील मरतुरू हे एक ऐतिहासीक स्थळ आहे. प्रसिद्ध हिंदू संहिता लिहिलेले विज्ञानेश्वर यांचे जन्म गांव होय. या जिल्हयात अनेक सिमेंट कारखाने आहेत.

©KTBS Not to be republished



**ख्वाजा बंदेनवाज दर्गा**

## यादगीरी जिल्हा

हा तीन तालुक्यांनी बनलेला लहान जिल्हा आहे. यादगीर, सुरपूर आणि शहापूर हेच ते तीन तालुके. हा 2010 मध्ये अस्तित्वात आला. या प्रदेशावर शातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, आदिल शाही, निजामशाही राज्यघराण्यानी राज्यकारभार केला. अत्यंत महत्वाचे आणि उपयुक्त असे युरेनियम खनिज येथे सापडते. शुद्ध युरेनियम खनिज संरक्षण आणि विज उत्पादन करण्यासाठी उपयुक्त असे संपन्मूल खनिज आहे. कोर ग्रीन शुगर आणि फ्यूयल्स प्रायव्हेट लिमिटेड हे दोन मोठे कारखाने या जिल्हयात आहेत. हा एक संयुक्त उद्योगधंदा आहे. येथे साखर, विज, जैवीक खत, आणि कारखान्यांचे रसायन यांचे उत्पादन होते. शहापूर तालुक्यातील टेकडयांची रांग झोपलेल्या बुद्धा प्रमाणे दिसते.

## बीदर जिल्हा



**बीदरी कला**

या जिल्हयात श्रेष्ठ इतिहास आहे. मौर्य, शातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य, कलचुरी, काकतीय, खिलजी, बहमनी, बरीदशाही घराण्यानी येथे राज्यकारभार केला. हे कर्नाटकच्या उत्तर दिशेच्या तोंडाशी वसलेले आहे. हा एक सिमावर्ती जिल्हा आहे. येथील शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.

मांजरा, कारंजा, मुळ्ळमारी, चुळ्कीनाल या जिल्हयातून वाहणाऱ्या प्रमुख नद्या आहेत. सामाजिक स्थितिमध्ये बदल

©KTBS Not to be republished

घडवून आणणारा क्रांतीकारक बसवेश्वरांचे कार्यक्षेत्र असलेले कल्याण हे या जिल्हयात आहे. बीदर नगराला शिखांचे गुरु गुरुनानक यानी भेट दिली होती असे म्हणतात. येथे अनेक गुरुद्वार आहेत. याला गुरुनानक झरा असे म्हणतात. अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असलेले नरसिंह जरणी नावाचे पवित्र स्थळ आहे.

या जिल्हयामध्ये 435 चौ.कि.मी. विस्तीर्ण असलेला जंगली प्रदेश आहे. राखीव अरण्य, सुरक्षित अरण्य आणि मुक्त अरण्य अशा तीन भागात अरण्याची विभागणी केली आहे. येथे औषधी वनस्पतीची लागवड करण्यासाठी वनस्पती उद्यानाची अभिवृद्धी केलेली आहे.


गुरुद्वार

बीदर शहराच्या मध्यभागी भव्य असा किल्ला आहे. किल्यामध्ये अनेक खोल्यांचे बांधकाम केले आहे. यामध्ये रंगीत महल मुख्य आहे. 1424 नंतर या ठिकाणी बहमनी राज्यांची राजधानी होती. या किल्यातील कमानी, मशिदी आणि फुलांच्या बागा अत्यंत आकर्षक आहेत. पाणी पुरवठ्याची व्यवस्था अत्यंत वैशिष्ठयपूर्ण आहे.


बीदरचा किल्ला

## रायचूरु जिल्हा

हा जिल्हा दुआब प्रदेश म्हणून ओळखला जातो. कारण हा प्रदेश दक्षिणेला असलेल्या तुंगभद्रा नदी व उत्तरेला असलेल्या कृष्णा नदीच्या मधील भाग आहे. याला भाताचे कोठार म्हणून ओळखतात. या जिल्हयात 100 पेक्षाजास्त भाताच्या गिरण्या (मिल) आहेत. आहार पदार्थांचे युरोपीय देशाना निर्यात करतात. सुमारे 5000 टन

Not to be republished ©KTBS

सामावेल अशा शितगृहाची येथे निर्मिती केली आहे. हा एक सीमावर्ती जिल्हा आहे. कुक्कूट पालन व्यवसायामुळे या जिल्हयाची किर्ती झाली आहे. या नगरामध्ये असलेल्या कोळशाच्या विद्युत केंद्रात मोठ्या प्रमाणात विज निर्माण करतात. राज्यामध्ये वापरात असलेल्या विजेपैकी शेकडा 48% विज येथूनच येते.



**शाखोत्वन्न विद्यूत केंद्र**



**अशोकाचा शिलालेख**

देशातील सर्व शहरांना संपर्क साधण्यासाठीचे रेल्वे मार्ग रायचूरु शहरातून गेला आहे. हैद्राबाद, मुंबई, चेन्नई, बेंगळूरुला संपर्क करणारे रेल्वे मार्ग येथे आहेत. या नगरातील मस्की येथे चक्रवर्ती अशोकाची शिल्पकला पहावयास मिळते. म्हणजे सामान्य शकाच्या पूर्वीही येथील अभिवृद्धी झाली होती हे स्पष्ट होते. हा प्रदेश सामान्य शकाच्या पूर्वी मौर्य साम्राज्याचा भाग होता. या जिल्हयातील लोकांचा मुख्य व्यवसाय म्हणजे शेती होय. या जिल्हयातील सिंधनूर आणि रायचूरु तालुके पुढारलेले असले तरी लिंगसगुरू तालुका प्रगती पथावर आहे. देवदूर्ग आणि मानवी तालुके अत्यंत मागासलेले आहेत.

## कोप्पळ जिल्हा

कोप्पळ शहराला जैनांची काशी असे म्हणतात. जैनांचे हे पवित्र क्षेत्र आहे. पाल्कीगुंडू आणि गवीमठ मध्ये अशोकाची शिल्प पहावयास मिळते. भारताचे पहिले

©KTBS Not to be republished

स्वातंत्र्य युद्ध म्हणून नांव मिळालेल्या 1857 च्या बंडामध्ये ब्रिटीशांच्या विरूद्ध लढलेला कोप्पळ प्रातांचा वीर योद्धा मुंडरगी भिमराव हा ब्रिटीशां विरुद्ध लढाईत बळी पडला. या जिल्हयातील प्रमुख पिके म्हणजे जोंधळा, भात, कापूस, सजगुरा, मक्का, गहू इ. होत. या जिल्हयातील माती आणि हवामान बागायती पिकाना उपयुक्त आहे असे म्हटले जाते. सफरचंद, आंबा, डाळींब, केळी, द्राक्षे इत्यादी फळे येथे मोठ्या प्रमाणात पिकवितात.

या जिल्हयामध्ये अरण्यमय प्रदेश कमी प्रमाणात आहे. येथे वन्यप्राणी आढळत नाहीत असे म्हटले तरी चालेल.



**महादेव देवालय, इटगी**

कल्याणचा चालुक्य, राज्यांनी बांधविलेले भव्य महादेवाचे मंदिर इटगी येथे आहे. याला देवालयाचा चक्रवर्ती असे म्हणतात.

रायचूरु शहरापासून कांही मैल दूर असलेला किन्नाळ हे राष्ट्रीय प्रसिद्धी मिळविलेले लाकडापासून खेळणी तयार करणाऱ्या पारंपरीक (सांप्रदायीक) कलाकरांची भूमी आहे. या कलेची जोपासना करणारे चित्रगार कुटूंबे येथे आहेत. या जिल्हयातील मुनीराबाद येथे तुंगभद्रा नदी अडवून मोठे घरण बांधले आहे. विजयनगर राजाची सुरुवातीची राजधानी आनेगोंडी ही कोप्पळ जिल्हयात आहे. अलिकडे येथे लोंखडाचे आणि पोलादाचे कारखाने अस्तित्वात आले आहेत. कोप्पळ प्रदेश हा तिरुळ कन्नड प्रदेश असे म्हणतात.

## बळ्ळारी जिल्हा

विजयनगर साम्राज्याची राजधानी म्हणून किर्ती मिरवलेले हंपी हे शहर बळ्ळारी जिल्हयात आहे. विजयनगर साम्राज्याने 1336 पासून 1565 पर्यंत राज्य केले. रामायण व

©KTBS Not to be republished

महाभारत या पुराणा संबंधीत असलेली अनेक स्थळे या जिल्हयात आहेत. कनकगीरी कनकाचल देवालय प्रसिद्ध आहे. या नगरामध्ये असलेले दुर्गम्मा देवालयातील देवतेला बळरी या नावाने ओळखतात. या पासूनच जिल्हयाला बळ्ळारी नांव आले आहे.



हंपी



तोरणगल्ली कारखाना

ब्रिटीशांच्या काळात हा मद्रास संस्थानाचा भाग होता. स्वातंत्र्यानंतर 1953 मध्ये याला म्हैसूर संस्थानात सामील केले. पुढे 1956 मध्ये कलबुरगी विभागात सामील केले.

हंपीमध्ये अनेक भव्य स्मारके आहेत. येथील उग्र नरसिंह, हजारराम देवालय, कमलमहल, विरुपाक्ष देवालय, इत्यादी ठिकाणे बहुसंख्य प्रवासी लोकांना आकर्षित करतात. संडूरचे कुमारस्वामी देवालय, कुरुवत्तीचे मल्लिकार्जून देवालय, बागळीचे कल्लेश्वर देवालय इ. प्रसिद्ध आहेत. बळ्ळारी शहराजवळ कोळशापासून विज निर्मिती केंद्र स्थापन केले आहे. या जिल्हयातील तोरणगलू हे मोठ्या प्रमाणात कारखानदारीचे केंद्र म्हणून वाढ होत आहे. दोणीमलय येथे असलेले भव्य एन.एम. डी.सी.यु. (National Mineral Development Corporation) सार्वजनीक क्षेत्रात प्रसिद्ध लोखंडाचे खनिज खाणीतून बाहेर काढण्याचा उद्योग झाला आहे. बळ्ळारी हा ऐतिहासिक महत्व प्राप्त झालेला जिल्हा आहे. तुंगभद्रा पाणी पुरवठा योजना कृषीक्रांतीचे साधन बनले आहे. तोरणगल्लु येथील लोखंड आणि पोलादाचे कारखाने आधुनिकतेचे प्रतिक बनले आहे.

©KTBS Not to be republished



**कन्नड विश्व विद्यालय, हंपी**

हंपी येथील कन्नड विश्व विद्यालय आणि विजयनगर येथील श्री कृष्णदेवराय विश्व विद्यालय ही दोन विश्व विद्यालये या जिल्हयात आहेत.

## खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1) कलबुरगी विभागात किती जिल्हे आहेत?
2) प्राचीन काळात या प्रदेशावर राज्य केलेल्या तीन राज्यघराण्यांची नावे लिहा.
3) भारतातील सोने मिळण्याचे स्थळ रायचूरु जिल्हयात आहे. त्याचे नांव काय?
4) या विभागात स्थापन केलेली कोळशापासून विज निर्मिती करणारी दोन केंद्रे कोणत्या जिल्हयात आहेत?
5) बळ्ळारी जिल्हयातील हंपी ही कोणत्या साम्राज्याची राजधानी होती?
6) ख्वाजा बंदेनवाज दर्गा कोणत्या जिल्हयात आहे?

## कृती

या विभागातील लोखंडाच्या खाणी आणि पोलाद कारखान्यांची यादी करा. त्यांच्या चित्रांचा संग्रह करून माहिती लिहून अहवाल तयार करा.

## बेळगावी विभाग

या विभागातील चारही जिल्हे इ.स. 1956 पर्यंत मुंबई प्रांतामध्ये होते. राज्य पुर्नरचनेवेळी ते कर्नाटकात समाविष्ट करण्यात आले. या विभागातील धारवाड जिल्हयाची विभागणी करून इ.स. 1997 मध्ये हावेरी आणि गदग जिल्हयांची रचना केली गेली. तसेच विजापूर (विजयपूर) जिल्हयाची विभागणी करून बागलकोट जिल्हयाची रचना केली गेली. या विभागात आता सात जिल्हे आहेत. ते म्हणजे

©KTBS Not to be republished

बेळगावी, धारवाड, हावेरी, गदग, विजयपूर, बागलकोट आणि उत्तर कन्नड जिल्हा हे होत.




**बेळगावी विभाग**

©KTBS Not to be republished

## ऐतिहासिक पार्श्वभूमी



बदामी गुहेतील शिल्पकला

या विभागातील हा प्रदेश शातवाहन आणि मौर्य यांच्या अधिपत्याखाली होता. बनवासी ही कदंबांची राजधानी होती. चालुक्याची राजधानी बदामी येथेच आहे. बदामी, पट्टदकल्ल, ऐहोळे येथे जगप्रसिद्ध मंदिरे आहेत. बदामीच्या गुहेमध्ये अनेक शिल्पकलेचे वैभव पहायला मिळते. या विभागातील बसवण बागेवाडी, कुडलसंगम इ. वचन चळवळीची केंद्रे आहेत. समाज सुधारणेचे प्रणेते श्री बसवेश्वर यांचे समाधी स्थळ (ऐक्य स्थळ) कुडलसंगम येथे आहे. बेळगावी विभागावर राष्ट्रकूट त्यानंतर बहामनी राज्यांनी राज्य केले.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये बेळगावी विभागातील जिल्हयांनी अद्भूत कामगिरी केली आहे. कित्तूर राणी चन्नम्माने इ.स. 1824 मध्ये ब्रिटीशांविरुद्ध लढा पुकारला. राणी चन्नम्मांनी ब्रिटीशांविरुद्ध पुकारलेला संघर्ष ऐतिहासिक होता. त्यानंतर

संगोळ्ळी रायण्णांच्या लढा स्मरणीय होता. बेळगावीमध्ये इ.स. 1924 साली महात्मा गांधी यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस अधिवेशन भरविले. उत्तर कन्नड जिल्हयामध्ये कर विरोधी सत्याग्रह सुरू झाला.


कित्तूर राणी चन्नम्मा


संगोळ्ळी रायण्णा

या विभागातील जिल्हे मुंबई प्रांतात होते. कर्नाटक एकीकरणावेळी इ.स. 1956 मध्ये ते कर्नाटकात समाविष्ट झाले. सुरूवातीला या विभागात बेळगावी, उत्तर कन्नड, विजापूर (विजयपूर) आणि धारवाड हे चार जिल्हे होते. सुरूवातीला सांगितल्याप्रमाणे धारवाड जिल्हयाची इ.स. 1997 मध्ये विभागणी करून हावेरी आणि गदग या दोन नविन जिल्हयांची रचना केली. याच प्रमाणे मोठा जिल्हा असलेल्या विजापूरची इ.स. 1997 मध्ये विभागणी करून बागलकोट जिल्हयाची रचना केली. आता या विभागात एकूण सात जिल्हे आहेत. या विभागातील उत्तर कन्नड, विजयपूर आणि बेळगावी हे सीमेवरील जिल्हे आहेत.

Not to be republished ©KTBS

## ✻ खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1) ब्रिटीशांविरुद्ध लढा पुकारलेल्या राणीचे नाव काय?
2) हावेरी, गदग आणि बागलकोट या जिल्हयांची रचना कोणत्या साली झाली?
3) म. गांधींच्या अध्यक्षतेखालील काँग्रेस अधिवेशन या विभागातील कोणत्या जिल्हयात व किती साली झाले?
4) बदामी ही कोणत्या राज घराण्याची राजधानी होती?

## ✻ रिकाम्या जागा भरा.

1) बेळगावी विभागातील जिल्हे ............ साली कर्नाटकात समाविष्ट झाले.

## आपल्या विभागातील नैसर्गिक संपत्ती

हा विभाग नैसर्गिक साधन संपत्तीमध्ये समृद्ध आहे. भरून वाहणाऱ्या नद्या, घनदाट जंगले, अनेक खनिज संपत्ती, सुपीक माती, वीज निर्मिती केंद्रे आहेत. या विभागातून वाहणाऱ्या प्रमुख नद्या म्हणजे कृष्णा, मलप्रभा, घटप्रभा, भिमा, काळी, तुंगभद्रा इ. या नद्यांच्या मार्गात अनेक नयनरम्य, सुंदर धबधबे आहेत. 'गोकाकचा धबधबा' अतिशय आकर्षक आहे. दांडेली जवळील मागोडू धबधबा, कारवार जवळील देवमाला धबधबा, मुर्डेश्वर जवळील अप्सरकोंड धबधबा इ. नैसर्गिक सौंदर्याची जिवंत उदाहरणे आहेत. प्रवाशांसाठी उत्तम वातावरण येथे आहे. काळी नदीच्या काठावर अंशी राष्ट्रीय उद्यान आहे. दांडेली येथे अभयारण्य आहे. 'अट्टीवेरी पक्षीधाम' हे देखील निसर्गामधील मनमोहक ठिकाण आहे. या विभागातील बागलकोट जिल्हयामध्ये लोखंडाची खनिजे मिळतात. अजून एक येथे मिळणारी कच्चा माल म्हणजे चुनखडी, या विभागातील जिल्हयांमध्ये तिक्ष्णदगड मुबलक प्रमाणात मिळतात. इळकल्लू भागामध्ये ग्रॅनाईट मुबलक प्रमाणात मिळते. येथून ग्रॅनाईटची निर्यात केली जाते.




इळकल्ल ग्रॅनाईट

## खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1)बेळगावी विभागातील प्रमुख दोन नद्यांची नावे लिहा.

2)या विभागातील प्रमुख अभयारण्याचे नाव लिहा.

3)इळकल्लमध्ये मिळणारी नैसर्गिक साधन संपत्ती कोणती?

© KTBS Not to be republished

## आपली अरण्य संपत्ती



घनदाट जंगल

या विभागातील बेळगावी, उत्तर कन्नड, धारवाड जिल्हयामध्ये घनदाट अरण्ये आहेत. सदाहरित जंगले येथे आहेत. उष्ण कटिबंधातील घनदाट जंगले तसेच वर्षभर हिरवीगार असणाऱ्या जंगलांना 'सदाहरित जंगले' असे म्हणतात. येथे अनावृष्टी म्हणून कधीच नाही. येथे राखीव जंगले, सुरक्षित जंगले आणि मुक्त जंगले आहेत. उत्तर कन्नड जिल्हयाच्या एकूण विस्तारापैकी शेकडा 80% अरण्य प्रदेश आहे. अरण्यामध्ये हत्ती, जंगली म्हैस, हरिण, वाघ, चित्ता, अस्वल, मोर, रान मांजर इ. वन्यजीव आढळतात.

©KTBS Not to be republished

या अरण्यामध्ये रोझवूड, चंदनाचे झाड, सागवान इ. किमती झाडे वाढतात. कांही अरण्यप्रदेश हे अरण्यवाशी आदीवासी समाजासाठी उत्पन्नाचे मूळ आहे.

### खालील प्रश्नामची उत्तरे द्या.

1)सदाहरित जंगले म्हणजे काय?

2)बेळगावी विभागातील प्रमुख धबधब्यांची नावे लिहा.

3)बेळगावी विभागातील कोणत्या जिल्हयात लोखंडाची खनिजे मिळतात?

## आपला शेती व्यवसाय

या विभागात जास्तीतजास्त काळी आणि लाल माती आहे. या मातीत भात, कापूस, मक्का, कडधान्ये, गहू, शेंगा, बाजरी, मिरची ही मुख्य पिके पिकवितात. महालिंगपूर येथे गूळ उत्पादन, बॅडगी येथे मिरची, काजू इ. येथील प्रमुख उत्पादने आहेत. मलप्रभा जल योजना (नाविलतीर्थ) कृष्णा मेल्दंड योजना (आलमट्टी) इ.

पाण्या संबंधी योजना आहेत. काळी, वरदा, शरावती, डोणी, भीमा इ. येथील प्रमुख नद्या आहेत.



**आलमट्टी धरण**

मासेमारी हा उत्तर कन्नड जिल्हयाचा प्रमुख व्यवसाय आहे. येथे अनेक मत्स्यपालन घटक आहेत. काजू हे एक दुसरे व्यापारी पीक आहे. येथे अनेक काजू कारखाने आहेत. उत्तर कन्नड जिल्हयामध्ये कद्र, सूफ, कोडसळ्ळी, नागझरी आणि कैगा विद्युत्त उत्पादन केंद्र आहे. सुपारी, ऊस, कापूस, मसाल्याचे पदार्थ येथील प्रमुख व्यापारी पिके आहेत. विजयपूर आणि बागलकोट जिल्हा बागायतीसाठी प्रसिद्ध आहे. तेथील हवामान आणि मातीतील पोषक घटक फळांच्या वाढीसाठी उपयुक्त आहे. या जिल्हयात द्राक्षे भरपूर प्रमाणात पिकवितात. येथे द्राक्षे संस्करण केंद्रे निर्माण होत आहेत. डाळिंब, लिंबू, संत्री, मोसंबी इ. फळांची झाडे वाढविती जातात. हावेरी जिल्हा हा संकरित बियाणांच्या उत्पादनाचा प्रमुख केंद्रबिंदू आहे. येथे अनेक राष्ट्रीय बीज उत्पादन केंद्रे आहेत. गुळेदगुड्ड खण उत्पादनात नावारूपास आले आहे.

औद्योगिक क्षेत्रामध्ये हुब्बळ्ळी, बेळगावी, बागलकोट, गदग, हावेरी ही प्रमुख केंद्रे म्हणून वाढत आहेत. इळकल्लमध्ये अनेक ग्रॅनाईट शुद्धीकरण कारखाने आहेत.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) या विभागातील जिल्हयामध्ये वाढणारी प्रमुख पिके कोण कोणती?
2) या विभागातील कोणत्या जिल्हयात मासेमारी हा प्रमुख व्यवसाय आहे?
3) या विभागातील कोणत्या जिल्हयात बीजोत्पादन केंद्र आहे?
4) या विभागातील बॅडगी हे गाव कोणत्या शेती उत्पन्नामुळे नावारूपास आले आहे?

©KTBS Not to be republished

## आपल्या विभागातील कला, साहित्य, संगीत, लोककला, नाटक

या विभागातील जिल्हे अनेक प्रकारच्या ललित कलेल प्रसिद्ध आहेत. धारवाड हे राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय हिंदुस्थानी संगीतकारांचे माहेरघर आहे. भारतरत्न पंडित भिमसेन जोशी, पंडित मल्लीकार्जुन मन्सुर, बालेखान (सतार), विदूषी गंगूबाई हनगल, पंडित वेंकटेश कुमार पं. बसवराज राजगुरु इ. अनेक संगीतकार धारवाडचे आहेत.



शिशुनाळ शरिफ



द.रा.बेंद्रे

मध्ययुगामध्ये अनेक कन्नड काव्य रचना केलेले रन्न, नागचंद्र, नयसेन, कुमारव्यास, चामरस, बसवण्णा, कनकदास, शिशूनाळ शरिफ असे अनेक रचनाकार बेळगावी विभागातील वेगवेगळ्या ठिकाणचे आहेत. वचन पितामह फ.गु. हळकट्टी, रेवरेंड किट्टेल, भूसनूरमठ, वि.कृ. गोकाक, दिनकर देसाई, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते द.रा.बेंद्रे, गिरिश कार्नाड, चंद्रशेखर कंबार, बसवराज कट्टीमनी, एम.एम. कलबुर्गी, आधरंगाचार्य (श्रीरंग) यांनी या आधुनिक युगात कन्नड साहित्य श्रीमंत बनविले. लोकगीत गारुडी हुक्केरी बाळप्पा, नाडोज सुक्री बोम्मगौडा यांनी लोकगीतात आपले नाव उचावले. श्रीकृष्ण दोड्डाट इ. नाटक प्रकारांचा विकास झाला. पारिजात, तेंकतिट्टू यक्षगान, सन्नाट आप्पालाल जमखंडी कौजलगी निंगम्मा, लोकापूर देशपांडे यांनी नायकांची (नट) भूमिका करण्यात अग्रेसर होते.

©KTBS Not to be republished



**कर्नाटक विश्वविद्यालय धारवाड**

©KTBS Not to be republished

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) या विभागातील तीन ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्यांची नावे लिहा.

2) या विभागातील तीन प्रसिद्ध संगीतकारांची नावे लिहा.

3) या विभागातील दोन प्रसिद्ध नाटक विभागांची नावे लिहा.

## आपले आरोग्य आणि शिक्षण

धारवाड, बेळगावी, विजयपूर(विजापूर) ही शिक्षणाची प्रमुख केंद्रे आहेत. धारवाडमध्ये कर्नाटक विश्वविद्यालय आहे. हुब्बळ्ळीमध्ये कर्नाटक कायदा विश्वविद्यालय आहे. बेळगावीमध्ये राणी चन्नम्मा विश्वविद्यालय आणि विश्वेश्वरय्या तांत्रीक विश्वविद्यालय आहे तर विजयपूरमध्ये प्रथम कर्नाटक राज्य महिला विश्वविद्यालय आहे. तसेच बागलकोटमध्ये कृषी (बागकाम) विश्वविद्यालय आहे.

या विभागातील जिल्हयांचे साक्षरतेचे प्रमाण उत्तम आहे. तसेच साक्षरतेमध्ये उत्तम स्थान मिळविले आहे. बेळगावी, हुब्बळी, विजयपूर, बागलकोट येथे वैद्यकिय महाविद्यालय तसेच तांत्रीक (इंजिनिअरिंग) महाविद्यालये आहेत. इ.स. 19 व्या शतकाच्या शेवटी डेप्युटी चन्नबसप्पा यांच्या नेतृत्वाखाली कन्नड शाळा या विभागात प्रारंभ करण्यात आल्या. अनेक खासगी शिक्षण संस्था शिक्षण क्षेत्रात आपले योगदान देत आहेत. तसेच ख्रिच्छन संस्था ही शिक्षण प्रसारात अमूल्य योगदान देत आहेत.

आरोग्य क्षेत्रामध्येही बेळगावी विभागातील जिल्हयांनी उत्तम प्रगती साधली आहे. जनसंख्या वाढीचे प्रमाणही कमी आहे. परंतू बालमृत्यू प्रमाण, बाळंतीनीचे मरण प्रमाण वाढलेले आहे. महिला आणि मुले अनियिमा (रक्त हिनता) रोगाला तोंड देत आहेत. तालुका आणि जिल्हा पातळीवर सरकारी दवाखाने चालू केले आहेत. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे (P.H.C.) आहेत. खेडेगावात आरोग्य उपकेंद्र आहेत. वैद्यकिय महाविद्यालये स्वतःचे दवाखाने चालवित आहेत.

## खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1) बेळगावी विभागातील कोणत्या जिल्हयात कायदा महाविद्यालय आहे?
2) ग्रामीण भागात सरकारने स्थापन केलेल्या आरोग्य केंद्राचे नाव काय?
3) या विभागातील कोणत्या जिल्हयात कृषी विश्वविद्यालय आहे?
4) कर्नाटक विभागातील प्रथम महिला विश्वविद्यालय कोठे सुरू झाले?

## आपली सांस्कृतिक संपत्ती

सांस्कृतिक संपत्तीने समृद्ध असा हा विभाग आहे. कला, संगीत, नाटक, साहित्य इ. क्षेत्रात या विभागातील जिल्हयांचे योगदान अपार आहे. येथील संगीतकार राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्धी मिळविलेले आहेत. पंडीत भिमसेन जोशी यांना 'भारतरत्न' प्रशस्ती मिळाली आहे. या विभागातील तीन साहित्यिकानी ज्ञानपीठ पुरस्कार मिळविला आहे. हुब्बळ्ळीला कर्नाटकचे व्यापारी केंद्र म्हणून ओळखले जाते. बॅडगी, महालिंगपूर, विजयपूर अनुक्रमे मिरची, गूळ आणि द्राक्षे यांची व्यापारी केंद्रे आहेत.


भारतरत्न पं. भिमसेन जोशी


मल्लीकार्जुन मन्सूर


गंगूबाई हानगल


पंचाक्षरी गायक

या विभागात जगप्रसिद्ध ऐतिहासिक स्मारके आहेत. बदामी, पट्टदकल्ल आणि ऐहोळे येथील ऐतिहासिक स्मारके कर्नाटक संस्कृतीची उदा. आहेत. प्रवासी स्थळे मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. उत्तर कन्नड जिल्हयातील कारवार येथे नौका सुरक्षा

© KTBS Not to be republished

दल (Sea Bird) मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या जिल्हयातील घनदाट जंगले ही वन्य जीवांचे आश्रयस्थान आहेत. अनेक नद्यांचे उगम येथे झाले आहेत. येथील नयनरम्य धबधबे प्रवाशांना आकर्षित करून घेतात. काही नद्यांच्या काठावरील ठिकाणे ही प्रेक्षणिक स्थळे झाली आहेत.

## स्वातंत्र्यवीर - स्वातंत्र्य सैनिक



पाटील पुट्टप्प



फ.गु.हळकट्टि

आता सांगितल्याप्रमाणे इ.स. 19 च्या शतकात बेळगावी विभागातील कित्तूरमध्ये ब्रिटीशांच्या विरूद्ध लढा सुरु झाला. स्वातंत्र्यासाठी मैलार महादेवप्पा यांनी आपले प्राण गमावले. आपल्या राज्यात सर्वप्रथम बेळगावी विभागातील जिल्हयामध्येच स्व-तंत्र्य संग्रामाला सुरूवात झाली हे कधीच विसरू नये. या विभागातील हजारो लोक स्वातंत्र्य संग्रामामध्ये सहभागी होऊन तुरुंगवासही भोगला. स्वातंत्र्य संग्रामामध्ये भाग घेतलेल्या हजारो लोकांमध्ये काही प्रमुख असे सिद्धप्पा कंबळी, आलुरु वेंकटराव, ना. सु. हर्डीकर, हर्डीकर मंजप्पा, गंगाधर राव देशपांडे, आर.आर. दिवाकर, नाडोज पाटील पुट्टप्पा इत्यादी स्वातंत्र्य संग्रामाबरोबरच कर्नाटक एकीकरणासाठी अनेकांनी समाज सुधारणेमध्ये आपल्याला वाहून घेतले. 'वचन पितामह' ही पदवी मिळविले-ले डॉ. फकिरप्पा गुरुबसप्पा हळकट्टी (फ.गु. हळकट्टी) यांनी पत्रकारीकेचेही काम पाहिले.

मोहरे हनुमंत रायरु, पाटील पुट्टप्पा यांनी स्वातंत्र्य संग्रामाबद्धल वर्तमानपत्रातून लोकांना प्रेरित केले

©KTBS Not to be republished

### खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1) या विभागातील कोणत्या राणीने इ.स.1824 मध्ये ब्रिटीशांविरुद्ध लढा दिला?
2) प्रमुख तीन स्वातंत्र्यवीरांची नावे लिहा.
3) या विभागातील पत्रकारिकेमध्ये अपार योगदान दिलेल्या दोन प्रमुख व्यक्तींची नावे सांगा.

### आपल्या विभागातील जिल्हयांची वैशिष्ठये

या भागात बेळगावी विभागातील प्रत्येक जिल्हयाची विशिष्ठता, तेथील शेती, उद्योग, नैसर्गिक साधन संपत्ती, इ. गोष्टींचे विवरण केले आहे.

### धारवाड जिल्हा

धारवाडला कर्नाटकचे सांस्कृतिक केंद्र असे म्हणतात. संगीत, साहित्य आणि शिक्षण यांचे धारवाड हे माहेरघर आहे. धारवाडचे पेढे हे गोड खाद्य म्हणून प्रसिद्ध आहे.

हा जिल्हा मुंबई प्रांताचा भाग होता. तेंव्हा मराठी ही शासकीय भाषा होती. परंतू अनेक शिक्षण तज्ञांमुळे 20 व्या शतकात बऱ्याच भागामध्ये जास्तीत जास्त कन्नड शाळा सुरू करण्यात आल्या.

टाटा समूहाचे अनेक उद्योग येथे आहेत. बोरूक टेकस्टाईल कारखाने येथे आहेत. मुर्डेश्वरमधील सिरॅमिक कारखान्यामुळे अनेक लोकांना उद्योग मिळाला आहे. धारवाड-हुब्बळी शहराच्यामध्ये उणकल तळे आहे. याला आकर्षित करण्यात आले आहे. धारवाडपासून थोडयाच मैलावर असणारे कुंदगोळ या गावची हिंदुस्थानी संगीताच्या वाढीसाठी प्रमुख भूमिका आहे. हिंदुस्थानी संगीतामध्ये अभूतपूर्व कामगिरी केलेले सवायी गंधर्व यांचे कुंदगोळ हे जन्मगाव आहे.

### हावेरी जिल्हा

या जिल्हयाची रचना इ.स. 1997 मध्ये झाली धारवाड जिल्हयाचे विभाजन करून हावेरी जिल्हयाची रचना झाली. हा जिल्हा मूलतः कृषी प्रधान जिल्हा आहे. एकूण रोजगारापैकी 70% लोक शेतीवर अवलंबून आहेत. या जिल्हयाची विशेषता म्हणजे येथे सुधारित हायब्रीड बीयांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. बीयानांची किंमत पूर्व निर्धारित खंडून घेऊन शेतकरी ते बीजोत्पादन केंद्राकडे विक्री करतात. येथील शेतकरी रासायनिक खत, औषधे, सुधारित बियाणांचा उपयोग करून बीजोत्पादन करतात. आता शेतकरी जास्त संख्येने पारंपारिक बीयाणे पेरून शेती करण्यात गुंतले आहेत.

©KTBS Not to be republished

या जिल्हयात अनेक ऐतिहासिक देवालये आहेत. बंकापूरचे नगरेश्वर देवालय, मैलारचे मैलारलिंगेश्वर देवालय, चालुक्यांच्या काळातील सिद्धेश्वर देवालय अनेक लोकांचे आकर्षण बनले आहे. गोटगोडेमध्ये असलेले उत्सव रॉक गार्डन हे आंतरराष्ट्रीय ख्याती मिळविली आहे. येथे सहज, सुंदर व खऱ्या वाटणाऱ्या प्रतिमा व अनेक मूर्त्यांची निर्मिती केली आहे. आधुनिक शिल्प कलेचा प्रयोग येथे केला आहे. कल-ाकार सोलब्ब कन्नवर याचे आहे.



कनकदास

हावेरी हे कलाकार आणि साहित्यिक यांचे माहेर घर आहे. कवी सर्वज्ञ यांचा जन्म येथेच झाला आहे असे सांगितले जाते. शिशुनाळ शरिफ हे सुद्धा हावेरीचेच, कनकदासांचे जन्मगाव असलेले बाडग्राम हे हावेरी जिल्हयातीलच. राणीबेन्नूर अभयारण्य येथे आहे. कनकदासांची संस्था असलेले कागीनेले येथे अनेक देवालये आहेत.

जिल्हयातील कुमारपट्टणम् येथे ग्रासीम कारखाना आहे. हरिहर पाली फायबर उद्योग येथे आहे सिंथेटिक रासायनिक उद्योगधंदे येथे कार्य पार पाडत आहेत. इतकचे नव्हे तर कोंबडी फार्म् येथे आहेत. याची मागणी जास्त आहे.



सर्वज्ञ कवी

## गदग जिल्हा

धारवाड जिल्हयाचे विभाजन करून इ.स. 1997 मध्ये गदग जिल्हयाची रचना केली गेली. खूप पूर्वीपासून हे कृषी उत्पन्न व्यापारी केंद्र (APMC) आहे. या जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्व भूमी 11-12 व्या शतका दरम्यानची आहे. चालुक्य घराण्यांनी निर्माण केलेले वीरनारायण आणि त्रीकुटेश्वर मंदिरातील कला आणि वास्तुशिल्प अद्भूत आहे. सुमारे दोन शतकापूर्वी निर्माण केलेली जुम्मा मशिद येथेच आहे.

या जिल्हयातील जीव वैविध्य क्षेत्र असलेले कप्पटगुड्ड येथे औषधी वनस्पतींची लागवड व औषधी वनस्पतींचे संस्करण केंद्राची स्थापना करण्याचा प्रयत्न चालू आहे. कर्नाटक विद्युत निगमच्या वतीने येथे पवन चक्की घटक निर्माण होत आहेत. अरण्य खातेही येथे ‘मागडी पक्षीधाम’ चा विकास करत आहे. गदग आणि बेटगेरी शहरे एकत्र येऊन गदग-बेटगेरी नगर पालिकेची रचना झाली आहे.

©KTBS Not to be republished



कुमारव्यास

भारतातील पहिली सहकार संस्था शंभर वर्षापूर्वी 'कणगिनहाळ' येथे सुरू झाली असे सांगितले जाते. सहकार चळवळीला आधुनिकता मिळवून दिलेले प्रसिद्ध राजकीय मुत्सद्दी के.एच. पाटील हे होते. कुमारव्यास हे गदगचे वीर नारायणयांचे स्मरण करत अनेक काव्य रचना केली. या स्थळाला साहित्यिक इतिहास आहे. कुमारव्यासांनी रचलेले 'कर्णाट भारत कथामंजरी' हे 'कुमार व्यास' भारत म्हणून प्रसिद्ध आहे. गदगच्या तोंटदार्य यांची समाजसेवा स्मरणीय आहे.



**वीर नारायण मंदिर**

Not to be republished © KTBS

या जिल्हयात जोंधळा, शेंगा, गहू, मूग, हरभरा ही आहार धान्य पिके तसेच आंबा, संत्री, द्राक्षे, डाळिंब ही बागायती पिके पिकविली जातात. हा जिल्हा आहार पदार्थांचे प्रमुख व्यापारी केंद्र आहे. गदग शहरामध्ये अनेक छपाई केंद्र कार्य करत आहेत. हुलकोटी येथे 'दि गदग को ऑपरेटिव्ह टेक्स्टाईल मिल' गाणगापूर मध्ये श्री विजयनगर साखर कारखाना, श्री सोमेश्वर फार्मस को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल, उत्पादनात गुंतलेले आहेत.

## विजयपूर जिल्हा

विश्व विख्यात गोलघुमट हे विजयपूर (विजापूर) येथे आहे. याला प्रतिध्वनी निर्माण करणारा घुमट म्हणून देखील ओळखले जाते. आत्ताच सांगितल्याप्रमाणे

हा प्रदेश आदिलशहाच्या राजवटीत होता. दिल्लीचा मोगल चक्रवर्ती औरंगजेबच्या आक्रमणामुळे आदिल शहाची राजवट अस्ताला गेली. पुढे इ.स. 1724 मध्ये ते निजामांच्या ताब्यात आले. परंतू इ.स. 1760 मध्ये निजामांकडून मराठा पेशव्यानी काबीज केले. ते शेवटी संपून इ.स. 1818 मध्ये ब्रिटीशांच्या ताब्यात गेला. स्वा-तंत्र्यानंतर इ.स. 1956 मध्ये हा जिल्हा कर्नाटकात समाविष्ट करण्यात आला.



**गोलघुमट, विजयपुर**

चालुक्य घराण्याच्या वेळी याला विजयपूर हे नाव आले. या प्रदेशावर वरचेवर दिल्लीचे सुलतान यांचे आक्रमण होत होते. या बरोबर आदिल शहा घराण्याचे राजे विजयनगराच्या राज्याबरोबर युद्ध करायला येत होते.

आदिल शहा याने इ.स 1656 मध्ये गोलघुमट बांधला. या घुमटाच्या परिघामुळे हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा घुमट म्हणून ओळखला जातो. इब्राहिम रोजा ही आणखी एक अद्भूत इमारत आहे. याची तुलना आग्रा येथील ताजमहलशी केली जाते. इब्राहिम आदिलशहा त्याच्या कारकिर्दीमध्ये हिंदू आणि मुस्लिम यांच्यात आदर, आपुलकी, सौहार्दता निर्माण करण्यास प्रयत्न केले. हे प्रसिद्ध कवी होते. त्यांच्या कृतितून सरस्वती, गणपती यांचे स्त्रोत्र पहावयास मिळतात.

वचन चळवळीचे प्रणेते बसवण्णांची अनेक शहरे या जिल्हयात आहेत. बसवण्णा यांचे कार्यक्षेत्र बसवकल्याण, विजयपूर जिल्हा तसेच सीमाभागात ही आहे. येथे मलप्रभा आणि कृष्णा नदीचा संगम आहे. त्यामुळे या क्षेत्राला कुडलसंगम असे म्हणतात. येथे

© Not to be republished

बसवण्णाचे समाधीस्थळ (ऐक्य स्थळ) आहे.



**कुडलसंगम ऐक्य मंडप**

विजयपूर जिल्हयाचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. येथे जोंधळा, बाजरी, मूग इ. आहारधान्य पिके तर कापूस, ऊस ही व्यापारी पिके आहेत. शेंगा, सूर्यफूल ही तेलबिया पिके आहेत. या जिल्हयातील वातावरण फळांच्या वाढीला उपयुक्त आहे. हा राज्यातील प्रमुख द्राक्षे उत्पादनाचा प्रदेश आहे. डाळिंब, संत्री, पपई, कलिंगड इ फळपिके येथे घेतली जातात.

विजयपूर हे शैक्षणिक केंद्र म्हणून वाढत आहे. येथे कर्नाटक राज्य महिला विश्वविद्यालय आहे. येथे कृषी विद्यापीठ आहे. अनेक इंजिनियरिंग आणि वैद्यकिय कॉलेज येथे आहेत.

## बागलकोट जिल्हा

विजयपूर जिल्हयाचे विभाजन करून इ.स. 1997 मध्ये बागलकोट जिल्हयाची रचना करण्यात आली. येथे चालुक्यांची राजधानी बदामी आहे. बदामी, पट्टदकल, ऐहोळे ही ठिकाणे वास्तुशिल्प कलेची प्रयोगशाळा असे मानले जाते, येथे डोंगरात गुहा कोरून त्यामध्ये मंदिरांची निर्मिती केली आहे. जागतिक परंपरा केंद्र म्हणून याची ओळख आहे. या जिल्हयातील बनशंकरी मंदिर आणि शिवयोग मंदिर प्रसिद्ध आहेत.

पल्लव घराणे, विजयनगर साम्राज्य, आदिल शहा राजवट, मराठा आणि ब्रिटीश यांनी या प्रदेशावर राज्य केले.

©KTBS Not to be republished



**अबूबकर् दर्गा, जमखंडी**

या जिल्हयातील गुळेदगुड्ड हे खणांच्या विणकामासाठी प्रसिद्ध आहे. 'बीळगी' या ठिकाणी मोहरम हा सण मोठ्या प्रमाणात साजरा करतात. प्रसिद्ध हिंदुस्थानी गायिका आणि नायिका अमीरबाई कर्नाटकी या बीळगी शहरातील आहेत. इळकलचे विजयमहांतेश मठ हा हजारो लोकांना आकर्षित करते. येथील हजरत सय्यद मुर्तुजा खाद्र दर्गा प्रसिद्ध आहे. इळकल साडी हे येथील महत्वाचे उत्पन्न आहे. पटवर्धनांच्या अधिपत्याखाली असलेले जमखंडी हे एक राजसंस्थान होते. येथील अबूबेकर दर्गा प्रसिद्ध आहे. या जिल्हयात रबकवी बनहट्टी येथे विणण्याचे केंद्र आहे. येथे विणकामासाठी हातमाग आणि विद्युतमाग वापरले जातात.



**ऐहोळे देवालय. बागलकोट**

©KTBS Not to be republished

कृष्णा, घटप्रभा आणि मलप्रभा हया या जिल्हयातून वाहणाऱ्या नद्या आहेत. महाराष्ट्रात कोयना धरण बांधल्यामुळे नदीतील वाहणाऱ्या पाण्याची पातळी कमी झाली. यामुळे दुष्काळ, गरिबी वाढून लोकांचे जीवन दुःखी झाले. कृष्णा नदीवर आडवे बॅरेज बांधावे म्हणून लोक शासनाकडे मागणी करत आले परंतू शासन बॅरेज निर्माण केले नाही. तेंव्हा या भागातील शेतकरी सिद्ध न्यामगौडा यांच्या नेतृत्वाखाली कृष्णा काठावरील शेतकरी संघ तयार करून पैसे आणि साहित्य गोळा करून श्रमदानातून चिक्कपडसलगी येथे बॅरेज निर्माण केले. हे देशातील प्रथम खासगी बॅरेज आहे. यामुळे लोकांचे जनजीवन आनंदी बनले.

या जिल्हयात मिळणारी खनिजे म्हणजे चुनखडी, ग्रॅनाईट, लाल ग्रॅनाईट, डालमैट इत्यादी येथे मिळणारी खनिजे आहेत. तसेच अनेक साखर कारखाने आणि सिमेंट कारखाने आहेत.

## बेळगावी जिल्हा

कर्नाटकातील प्रसिद्ध सीमेवरील जिल्हा म्हणजे बेळगावी होय. हा गोवा आणि महाराष्ट्र राज्याला जवळ आहे. या जिल्हयाचे प्राचीन नाव वेणूग्राम म्हणजे बांबू ग्राम होय. हा जिल्हा राज्याच्या मलनाड भागात समाविष्ठ आहे. या जिल्हयातील प्राचीन गाव म्हणजे हलशी. कदंबांचे एक घराणे हलशीला आपली राजधानी बनविले होते. हा प्रदेश चालुक्य, राष्ट्रकूट, देवगिरी यादव, दिल्लीचे सुलतान यांच्या राजवटीमध्ये होता. इ.स. 1824 मध्ये कित्तूर राणी चन्नम्माला युद्धात हरवून ब्रिटीशांनी यावर ताबा मिळविला. याला मुंबई प्रांतात समाविष्ट केले. त्यामुळे त्या जिल्हयात मराठ्यांचा प्रभाव वाढला. त्याचाच परिणाम म्हणून आत्ताही येथे महाराष्ट्राबरोबर सीमावाद सुरू आहे. या जिल्हयातील कृष्णा नदी काठावर असलेले यडूरमधील वीरभद्र देवालय प्रसिद्ध आहे. ब्रिटीशानी त्यांच्या सैन्याची एक तुकडी ठेवली होती.

या जिल्हयातील 'गोकाकचा धबधबा' आकर्षित करणाारा आहे. गोकाक कापड गिरण्यांमुळे (गोकाक मील) अनेकांना उद्योग मिळाला आहे. इ.स.12 व्या शतकात बांधलेले शेडबाळमधील शांतीनाथ देवालय भक्तांना आकर्षून घेते. सौंदत्ती येथे जागृत देवस्थान असलेले श्री यल्लम्मा रेणूका यांचे यल्लम्मा डोंगर येथेच आहे. हा जिल्हा शैक्षणिक केंद्रबिंदू म्हणून वाढत आहे. येथे राणी चन्नम्मा विश्वविद्यालय आहे. विश्वेश्वरय्या तांत्रिक विश्व विद्यालय आहे. इंजिनिअरिंग, वैद्यकिय कॉलेज येथे आहेत.

हा जिल्हा राज्याचे प्रमुख औद्योगिक केंद्र आहे. येथे दहा पेक्षा जास्त साखर कारखाने आहेत. हिंडाल्को कारखाना, कापड गिरण्या, चर्मोद्योग, टाटा पॉवर केंद्र, हिंदुस्थान लेटेक्स घटक येथे आहेत.

©KTBS Not to be republished



**साखर कारखाना**

कर्नाटक सरकार बेळगावीला राज्याची दुसरी राजधानी बनविण्याचा प्रयत्न करीत आहे. येथे बेंगळूरमधील विधान सौध प्रमाणे मोठे सुवर्णसौध निर्माण केले आहे. येथे वर्षातून एकदा विधानसभेचे अधिवेशन शासन भरविते.

## उत्तर कन्नड जिल्हा

कर्नाटकातील प्रसिद्ध किनारपट्टीचा जिल्हा म्हणून उत्तर कन्नड जिल्हा ओळखला जातो. यांचे कारवार हे केंद्रस्थान आहे. हा एक प्रसिद्ध जिल्हा आहे. या जिल्हयाच्या स्वरूपावरून भारत सरकार येथे मोठ्या प्रमाणात नौका सुरक्षा दल 'सी बर्ड' स्थापन केले आहे. या जिल्हयाच्या एकूण विस्तारापैकी शेकडा 70% भाग अरण्य प्रदेश आहे. मासेमारी हा येथील लोकांचा प्रमुख उद्योग आहे. या जिल्हयात अनेक प्रवासी स्थळे (प्रेक्षणीय स्थळे) आहेत. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचे सामर्थ्य जास्त आहे. येथे अनेक मनमोहक असे धबधबे आहेत.



**कैगा विद्युत केंद्र**

Not to be republished ©KTBS

या जिल्हयाचे भौगोलिक लक्षणावरून दोन भागात विभाजन केले आहे. पहिला भाग म्हणजे किनारपट्टीचा प्रदेश त्यामध्ये कारवार, अंकोला, कुमटा, होन्नावर आणि भटकळ हा भाग समाविष्ट होतो. आणि दुसरा भाग म्हणजे मलनाड प्रदेश हा शिरसी, सिद्धापूर, यल्लापूर, हलीयाळ, जोयडा आणि मुंडगोड हा भाग व्यापला आहे.

या जिल्हयात वार्षिक 3000 मिली मीटर इतला पाऊस पडतो. येथे सदाहरित जंगले आहेत.

या जिल्हयातील बनवासी ही कदंबाची राजधानी होती. त्या प्रदेशावर कदंब, चालुक्य, राष्ट्रकूट, होयसळ, विजयनगर साम्राज्य, मराठा, ब्रिटीश यांनी राज्य केले. प्राचीन काळापासून हे व्यापाराचे केंद्र आहे असे म्हटले जाते. मोराकोचा प्रवासी इबन बटूट याने येथे वास्तव्य केले आहे असे म्हटले जाते. हा जिल्हा इ.स. 1750 मध्ये मराठयांनी काबीज केला. नंतर हा भाग म्हैसूर संस्थानात गेला परंतू इ.स.1799 मध्ये ब्रिटीशांनी काबीज केला. ब्रिटीशानी हा भाग मद्रास प्रांताला जोडला, परंतू इ.स.1860 मध्ये हा मुंबई प्रांताला जोडण्यात आला.

प्राचीन काळापासून हे अरब, डच, पोर्तुगीज यांचे व्यापारी केंद्र होते. मिरी लवंग, मिरची, दालचिनी इ. मसाल्याचे पदार्थ व्यापाराचे केंद्रबिंदू होते. इ.स. 1882 मध्ये नोबेल प्रशस्ती विजेते कवी रविंद्रनाथ टागोर यांनी या जिल्हयाला भेट दिली होती. त्यांनी त्यांच्या आत्मचरित्रामध्ये कारवारच्या भेटीचा क्षण हा एक अध्याय लिहिला आहे.




**सी बर्ड नौकातळ**

©KTBS Not to be republished

या जिल्हयातील प्रमुख पिके म्हणजे ऊस, कोकम, काजू, भात, केळी, अननस, इ. या जिल्हयातील प्रमुख बंदरे भटकळ, होन्नावर, कारवार, कद्री बेलकेरी इ. येथे कन्नड आणि कोंकणी प्रमुख भाषा आहेत.

या जिल्हयातून वाहणाऱ्या प्रमुख नद्या म्हणजे अघनाशिनी, शरावती, काळी, गंगावती इत्यादी.

**खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

1) या जिल्हयातील सरासरी पावासाचे प्रमाण किती ?
2) या जिल्हयातील प्रमुख बंदरांची नावे लिहा.
3) भारत सरकारने स्थापन केलेल्या नौका सुरक्षा दळाचे नाव काय ?
4) या जिल्हयातून वाहणाऱ्या नद्यांची नावे लिहा.
5) या जिल्हयातील कन्नड भाषा सोडून जास्त लोक बोलणारी दुसरी भाषा कोणती ?

**कृती**

1) कर्नाटकातील तीस जिल्हयांची यादी करा. जिल्हयानुसार कर्नाटकचा नकाशा संग्रह करा. प्रत्येक जिल्हयातील प्रवासी केंद्रांची यादी करा. हे सर्व मिळून अहवाल तयार करा.
2) कर्नाटकातील विविध जिल्हयातील वचनकारांना संबंधित असणाऱ्या स्थळांची यादी करा. वचनकारांची यादी करा. हे सर्व मिळून अहवाल तयार करा.

*****

©KTBS Not to be republished

पाठ 2

# दक्षिण भारतातील प्रमुख राज्य घराणी

## पाठाचा परिचय

या पाठात दक्षिण भारतात राज्य केलेले शातवाहन, कदंब, गंग, चालूक्य, पल्लव, चोळ, राष्ट्रकूट, कल्याण चालूक्य आणि होयसळ राजघराण्याच्या प्रसिद्ध राजांच्या योगदानाचे वर्णन केले आहे. या राजघराण्यानी दक्षिण भारताच्या इतिहासात कला, वास्तूशिल्प, धर्म, साहित्य, शिक्षण, तसेच आर्थिक व सामाजिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाची माहिती दिली आहे.

## सामर्थ्ये

1. गौतमीपूत्र शातकर्णींचे योगदान व शातवाहन राजाचे योगदान स्मरण करणे.
2. मयुरवर्धनचे साहस आणि कदंबांचे योगदान प्रशंसा करणे.
3. दूर्विनित व गंगांचे योगदान जाणून घेणे.
4. पुलकेशी व चालुक्यांचे योगदान समजून घेणे.
5. चोळ आणि पल्लव राज्यांचे सैन्य व सांस्कृतीक योगदान स्मरण करणे.
6. राष्ट्रकूट राज्याचे सैन्यबळ आणि सांस्कृतिक योगदानाची प्रशंसा करणे.
7. कल्याण चालुक्य आणि होयसळ काळातील कला आणि वास्तूशिल्प सौंदर्याचे जतन करणे.

©KTBS Not to be republished

## शातवाहन

मौर्यानंतर दक्षिण भारतात राज्यकारभार केलेले प्रमुख राजघराणे म्हणजे शातवाहन होय. शातवाहनाचे मूळ कन्नड होते. या वंशाच्या राजांची नावे कन्नड नावाप्रमाणे होती (उदा. हाल, पुलुभावी, नागनीक इत्यादी) शातवाहनांची राजधानी महाराष्ट्रातील पैठण अथवा प्रतिष्ठान ही होती. गौतमीपूत्र शातकर्णी हा या वंशाचा श्रेष्ठ राजा होता. याने अधोगतीला गेलेले राज्य उत्कर्षास आणले.




Not to be republished ©KTBS

## गौतमीपूत्र शातकर्णी

गौतमीपूत्र शातकर्णीने शक, यवन, पल्लव अशा विदेशी राजवंशांचा पराभव केला. शकानी नाण्यांवर आपले नाव पूनर्मुद्रीत केले होते. त्याने आपल्या राज्याचा विस्तार कोकण, सौराष्ट्र, माळवा, बिरार इत्यादी प्रदेशापर्यंत केला. त्याने 'त्रिसमुद्रतोय पितावाहन' (तीन समुद्राच्या पाणी पिलेल्या घोडयाच्या वाहनाचा श्रीमंत अशी विरुदावली धारण केली.

## शातवाहनांचे योगदान

**धर्म** शातवाहनानी वैदिक धर्माचे पालन केले. शिवमोग्गा जिल्ह्यातील तालगुंद येथील प्रणवेश्वर हे त्यांचे श्रद्धास्थान होते. त्यानी बौद्ध धर्मालाही उदारपणे प्रोत्साहन दिले. नासिक, कार्ले, कन्हेरी, अमरावती इत्यादी ठीकाणी बौद्ध धार्मिक केंद्रे स्थापन केली. यांच्या काळात सूर्य, विष्णू, गणेश इत्यादी देवतांची आराधना करत.

**साहित्य आणि शिक्षण** शातवाहनांची प्राकृत ही राज्यकारभाराची भाषा होती. त्यांची आज्ञापत्रे सुद्धा प्राकृत आणि ब्राह्मी लिपीत आहेत. हाल नावाच्या राजाने 'गाथासप्तसती' ही साहित्य कृती प्राकृत भाषेत रचिली आहे. गुणाढ्यांची वड्डकथा आणि सर्ववर्मनने कातंत्र व्याकरण या कृतीची रचना केली. शिक्षणासाठी विद्यापिठांची स्थापना केली. त्यापैकी शिवमोग्गा जिल्ह्यातील ताळसुंद (स्थानकुंद) प्रमुख शिक्षण केंद्र होते.

**वास्तू शिल्प** शातवाहनानी वास्तूशिल्पकलेला अपार योगदान दिले. त्यांच्या काळात चैत्य, विहार व स्तूपांची निर्मिती केली. चैत्य म्हणजे बौद्धांचे प्रार्थना मंदिर होय. बौद्ध भिक्षूक राहतात त्याला विहार म्हणतात.

शातवाहनाच्या काळात भारी दगड कोरून चैत्य आणि विहारांची निर्मिती केली. महाराष्ट्रातील कार्ले येथील चैत्य भव्य आहे. तसेच सुंदरही आहे. चैत्याच्या बाजूलाच कोरून विहाराची निर्मिती केली आहे. आंध्रप्रदेशातील अमरावती येथे अमृतशीला स्तूप कलात्मक आहे. कर्नाटकात शातवाहन काळातील वास्तूशिल्प रचनेचे अवशेष कलबुर्गी, जिल्ह्यातील कनगनहळ्ळी (सन्नीती जवळ) आणि उत्तर कन्नड जिल्ह्यातील बनवाशी येथे पाहू शकतो.



**कनगनहळ्ळी येथील स्तूपाचे अवशेष**

Not to be republished ©KTBS

**व्यापार आणि नगरे :** शातवाहन राज्यांचा काळ आर्थिक समृद्धीचा होता. याचे मुख्य कारण म्हणजेच चाललेला अंतर्गत व बाह्य व्यापार होय. साम्राज्याची काही शहरे व्यापारी केंद्रे होती. अशा शहराना 'निगम' म्हणत. महाराष्ट्रातील पैठण, कार्ले, कन्हेरी, जुन्नर आणि नासिक, आंध्रप्रदेशातील धन्यकटक (धरणीकोटे) आणि उत्तर कन्नड जिल्ह्यातील वैजयंती (बनवासी) इत्यादी प्रमुख व्यापारी केंद्रे होती.

नगरांमध्ये श्रेणी नावाचे संघ होते. श्रेणी म्हणजे व्यापाऱ्यानी आणि विविध कामगारानी आपल्या हितासाठी स्थापन केलेले संघ होय. उदा. धानिक श्रेणी नावाचा धान्य व्यापाऱ्यांचा संघ होता. अशा रीतीने तेली, लोहार, सोनार इत्यादी आपापल्या श्रेणी स्थापन केले होते. श्रेणीत एक वयस्कर असायचा. त्यानी श्रेष्ठी अथवा सेठ म्हणत. श्रेष्ठी श्रिमंत होते. अशा एका श्रेष्ठीने कार्ल्याचे प्रसिद्ध चैत्य निर्माण केले. बैलगाडी, गाढवे, घोडे इत्यादींचा वापर अंतर्गत वाहतूकीसाठी करत.

साम्राज्याच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवर असलेल्या बंदरामधून विदेशी व्यापार चाले. शातवाहनांच्या काळात युरोपातील रोमन साम्राज्याबरोबर भारताचे व्यापारी संबंध उत्तम होते.



**अंतर्गत वाहतूकीचे साधन बैलगाडी (कनगनहळ्ळीतील मुर्तीशिल्प)**

Not to be republished ©KTBS

**तुम्हास माहित असू द्याः**

1. बनवासीची वैजयंती ही शातवाहनाची प्रांतीय राजधानी होती. शातवाहनांच्या काळात प्राकृत भाषा लोकप्रिय होती.
2. सुमारे 2300 वर्षापूर्वी शातवाहनांचे राज्य अस्तित्वात आले. त्यानी सुमारे 400 वर्षे राज्यकारभार केला.

## I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

1. शातवाहनानी आपल्या काळात शिक्षणासाठी__________स्थापन केले.
2. शातवाहनांची राज्यकारभाराची भाषा__________ ही होती.
3. व्यापाऱ्यानी आपल्या हितासाठी निर्माण केलेल्या संघाना ............ म्हणत.
4. गौतमीपूत्र शातकर्णीने__________नाण्यावर आपले नाव पूनर्मुद्रीत केले.

## II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1. शातवाहन वंशाचा श्रेष्ठ राजा कोण?
2. गौतमीपूत्र शातकर्णीने धारण केलेली बिरुदावली कोणती?
3. चैत्य म्हणजे काय?
4. हाल राजाने कोणती साहित्य कृती रचली?
5. शातवाहन काळातील प्रमुख व्यापारी नगरे कोणती?
6. श्रेष्ठी म्हणजे काय?

## III. गटात चर्चा करून उत्तर लिहा.

1. शातवाहन काळातील व्यापार आणि नगराबाबत चर्चा करा.

**चर्चा करा**

- शातवाहन काळातील आर्थिक समृद्धीसाठी कारणीभूत अंश.

©KTBS Not to be republished

## कदंब

कदंब हे मूळता कन्नड वंशाचे होते. शातवाहनानंतर वायव्य कर्नाटकात अधिकारावर आले. कदंब वंशाची स्थापना मयूर वर्मा यानी केली. दक्षिण कन्नड जिल्ह्यातील बनवासी ही कदंब घराण्याची राजधानी होती. सिंह हे या वंशाचे प्रतिक होते.




©KTBS Not to be republished

## मयूर वर्मा

जातीने ब्राह्मण असलेला मयूर वर्मा विद्याभ्यासासाठी कांची येथे गेला होता. तेथे पल्लवांचा अश्वसेनाधिकाऱ्याने त्याचा अपमान केला. अपमानित झालेल्या मयूर वर्माने ब्राह्मण धर्म सोडून क्षत्रीय होण्यास निघाला. रानावनातील लोकाना संघटीत करून पल्लवावर हल्ला केला. शेवटी पल्लव राजाने मांडलीकत्व स्वीकारून कर्नाटकाचा काही भाग मयूर वर्माला सोपविला. मयूर वर्माने चित्रदुर्गाजवळील चंद्रवळ्ळी जवळील तलावांची दुरुस्ती केली.



चंद्रवळ्ळीचा तलाव



हल्मडी शिलालेख

©KTBS Not to be republished



**तालगुंदचा प्रणवेवर**

मयूर वर्मा नंतर आलेल्या कदंब राजापैकी काकुस्थ वर्मा प्रसिद्ध होता. यांच्या कारकिर्दीत हल्मडीचा शिलालेख कन्नडमधील प्रथम शिलालेख कोरला गेला म्हणून ओळखला जातो. काकुथ वर्माने उत्तर भारतातील प्रसिद्ध गुप्त वंशाच्याबरोबर विवाह संबंध जोडल्याचे सांगतात.

## कदंबांचे योगदान

**धर्म :** कदंब हे शैव होते. ताळगुंदचे प्रणवेश्वर आणि बनवाशीचे मधुकेश्वराची आराधना करत. ताळगुंदचे प्रणवेश्वर लिंग हे कर्नाटकातील प्राचीन शिवलींग होय. बौद्ध आणि वैष्णव धर्माचा गौरव केला. याद्वारे धर्म सहीष्णूता जोपासली.

**साहित्य आणि शिक्षण :** कदंबांच्या काळात प्राकृत, संस्कृत आणि कन्नड भाषा प्रचलित होती. कंदबाचे अनेक शिलालेख संस्कृतमधे आहेत. या काळात लोकभाषा झालेली कन्नड साहित्य भाषा म्हणून उदयास आली. हे आपण कल्मडीच्या शिलालेखावरून निरिक्षण करू शकतो. कदंबांच्या काळात अग्रहार व फटीकास्थान येथे शिक्षण केंद्र होती. ताळगुंद हे त्या काळातील प्रसिध्द गुहा व कांची प्रसिद्ध स्थान आहे

**वास्तूशिल्प :** हलशीची जैन बसदी, कारदोळचे (बेळगावी जिल्हा) शंकरदेव मंदिर, बनवासीचे मधुकेश्वर देवालय इत्यादी त्यांच्या काळातील वास्तूशिल्प कृती होत.

©KTBS Not to be republished



**मधुकेश्वर देवालय**

## नवीन शब्द

अग्रहार : ब्राह्मणांचे वसती स्थान

फटीकास्थान : हे उच्च शिक्षण केंद्र आताच्या विश्व विद्यालयाशी समान

## I. रीकाम्या जागी योग्य शब्द लिहून पूर्ण करा.

1) कन्नड मधील प्रथम राज घराणे____________होय.

2) काकुस्थ वर्माने उत्तर भारतातील____________वंशाबरोबर विवाह संबंध जोडले.

## II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) कदंब घराण्याची स्थापना कोणी केली?

2) कदंबांची राजधानी कोणती?

3) कन्नडमधील प्रथम शिलालेख कोणता?

4) कदंब काळातील शिक्षण केंद्रे कोणती?

## उपक्रम

सद्या कर्नाटकात असलेल्या विश्वविद्यालयांची व ती कोठे आहेत त्याची यादी करा.

©KTBS Not to be republished

# गंग घराणे



गंगांचे प्रतिक

कदंब कर्नाटकात राज्य करत असताना दक्षिण कर्नाटकात गंग उदयास आले. शेती प्रधान समुदायाची पार्श्वभूमी असलेल्या गंगानी कर्नाटकात दीर्घकाळ राज्यकारभार केला. सुमारे 650 वर्ष कारभार केला. कोलार (कुवलाळपुर) आणि तलकाडू (तलवनपूर) या यांच्या राजधान्या होत्या. कोंगणीवर्मा हा या घराण्याचा संस्थापक होय. हत्ती हे यांचे प्रतिक होते. गंग राजामध्ये दुर्विनीत हा प्रसिद्ध राजा होता.

## दूर्विनीत

सुमारे पंधराशे वर्षापूर्वी राज्य केलेला दुर्विनीत वीर व विद्वान होता. त्याची आई जेष्ठादेवी पुन्नाट राजघराण्यातील होती. त्या घराण्याला वारस नसल्यामुळे पुन्नाट राज्याला दुर्विनीत वारसदार झाले. जवळील शत्रूराज्यांशी युद्ध करून गंग राज्याचा विस्तार केला. पाण्याच्या सोयीसाठी मोठ मोठे तलाव निर्माण केले.

संस्कृत आणि कन्नड भाषेतील विद्वान असलेल्या दुर्विनीतानी संस्कृत कवी भारवीयांचे 'किरातार्जूनीय' कृतीचे 15 भागात भाष्य केले. गुणाढ्यांच्या 'वड्डकथा' चे संस्कृतमध्ये भाषांतर केले. तसेच कन्नड मधील प्रमुख गद्य लेखकामध्ये पुर्विनीत एक असे 'कविराज मार्ग' मध्ये श्रीविजय यानी म्हटले आहे. कविराज मार्ग हा कन्नड मधील उपलब्ध प्रथम ग्रंथ होय.

दुर्विनितानंतर श्री पुरुष, राचमल्ल इत्यादी प्रमुख राजे होऊन गेले. श्री पुरुषाने सुद्धा दुर्विनीताप्रमाणे अनेक तलावांची निर्मिती केली. त्यापैकी कुणीगल दोड्डकेरे, मोडल कुणीगल केरे होत. नोडेरीगोंदैभोग माडी बर्तने बंदीराम' हे लोकगीत प्रसिद्ध आहे. श्री पुरुषानंतर राचमल्ल राजा झाला. त्याचा प्रधान चाऊंडराय याने विश्व प्रसिद्ध गोमटेश्वराची मूर्ती हसन जिल्ह्यातील श्रवणबेळगोळ येथे निर्माण केली. तेथेच आपल्या नावाने एक बसदी बांधली.

©KTBS Not to be republished



**कुणीगल तलाव**

## गंगाचे योगदान

**धर्म :** गंग राजानी जैन आणि वैदिक या दोन्ही धर्मानाही प्रोत्साहन दिले. काही राजानी वैष्णव धर्म स्वीकारला. गंगांच्या राज्यात बौद्ध, काळामुख आणि लोकायूत पंथ होते.

**साहित्य :** गंग राज्यामध्ये काहीजण विद्वान होते. दुर्विनीत हा संस्कृत आणि कन्नड मधील प्रसिद्ध विद्वान होता. श्री पुरुषानी 'गजशास्त्र' या साहित्य कृतीची रचना केली. गंगाचा प्रधान चाऊंडराय याने चाऊंडराय पुराण ही साहित्य कृती कन्नडमध्ये रचली.

**वास्तूशिल्प व मूर्तीशिल्प:** वास्तूशिल्प व मूर्तीशिल्प कलेला गंगानी अपार योगदान दिले. मण्णेय (नेलमंगल तालुका) येथील कपिलेश्वर, तलकाडी येथील बसदी, कंब येथील (नागमंगल तालुका) पंचकूट बसदी इत्यादी गंगांच्या काळातील प्रमुख वास्तूशिल्पकला होत. श्रवणबेळगोळ येथील 58 फूट उंच एकाच दगडात तयार केलेली गोमटेश्वराची मूर्ती यानी मूर्तीशील्प कलेला दिलेले योगदानाचे महत्व सांगते.

### नवीन शब्द

1. **काळामुख :** आणखी एक शैव पंथ, या पंथातील लोक तोंडाला काळी शाही लावत असल्यामुळे हे नाव पडले.
2. **लोकायूत :** याना चार्वाक असे म्हणतात. भौतीकवादी असलेल्या या पंथातील लोकाना वास्तवता जीवनाबद्धल विश्वास होता.

©KTBS Not to be republished

## I रिकाम्या जागी योग्य शब्द लिही.

1) दुर्विनीताची आई जेष्ठादेवी ..................... राजघराण्यातील होती.

2) श्री पुरुषानी ............... नावाची साहित्य कृतीची रचना केली.

## II खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1) गंगांच्या राजधान्या लिहा.

2) दुर्विनीत कोणत्या भाषेत विद्वान होता?

3) गंगाच्या कोणत्या राजाने कुणीगल तलाव निर्माण केला?

4) गोमटेश्वर मूर्ती कोठे आहे? तो कोणी निर्माण केली?

### कृती:

- 'मूडल कुणीगल तलाव' लोकगीत गीते संग्रह करून सूरात गा.
- तलावापासून होणारे फायदे सांगा.
- श्रवणबेळगोळला गेल्यास तेथील कला, वास्तूशिल्प पाहून तुमचा अनुभव निबंध रूपात लिहा.

## बदामी चालूक्य

बदामी चालूक्यानी कर्नाटकात सुमारे 200 वर्ष वैभवात राज्यकारभार केला. बागलकोट जिल्ह्यातील बादामी (वातापी) ही चालूक्यांची राजधानी होती. डूक्कर हे चालूक्यांचे प्रतिक होते. याच्यात इम्मडी पुलकेशी हा प्रसिद्ध राजा होउन गेला.



वराह चालूक्याचे प्रतिक

## पुलकेशी

बदामी चालूक्यामध्ये इम्मडी पुलकेशीचा पराक्रमी बलशाली राजा होता. वारसा हक्काने मिळावयाचे राज्य काका मंगलेशपासून युद्ध करून मिळविले. नंतर राज्याच्या विस्तार करण्यासाठी मोहीम हाती घेतली. कदंब व गंग राजे पुलकेशीला शरण आले. सामंत असलेल्या राष्ट्रकूटांचा उठाव चिरडला. नंतर उतरेक्डील लाट, माळ्वा, गुर्जरांचा पराभव करून गुजरातपर्यंत मजल मारली. पूर्वेकडे वेंगी, कलींग, कोसलचा राजा पुलकेशीला शरण आला. दक्षिणेकडे कांचीच्या पल्लवांचा पराभव केला. कावेरी नदी

©KTBS Not to be republished

पार करून चोळ, केरळ आणि पांड्य राजांचा पराभव केला. पुलकेशीचे हर्षवर्धन बरोबरचे युद्ध फार महत्वाचे झाले. नर्मदा नदीच्या काठी झालेल्या घनघोर युद्धात पुलकेशीने हर्षवर्धनचा पराभव केला. या विजयानंतर पुलकेशीने चारी दिशाना मोहीम हाती घेऊन आपले राज्य अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत वाढविले.



©KTBS Not to be republished

पुलकेशीची किर्ती भारताच्या बाहेर पसरली. त्याने आपला दूत पर्शियाचा राजा खुस्त्रोकडे पाठविला. प्रत्यूत्तरादाखल खूस्त्रोने आपला राजदूत पुलीकेशीच्या राज्यात पाठविला. अजंठा येथील पहिल्या गुहेत असणाऱ्या चित्रामध्ये पुलकेशी खुस्त्रोच्या राजदूताचे स्वागत करतानाचे चित्र काढले आहे.

## वास्तूशिल्प आणि शिल्प कलेला बदामी चालूक्याचे योगदान

बदामी, ऐहोळे, पट्टदकल्ल, महाकूट ही बदामी चालूक्यांची प्रमुख वास्तूशिल्प केंद्रे होती. बदामी, ऐहोळे येथे त्यांच्या काळातील गुहालये होती. ऐहोळेच्या देवालयात लाडखान देवालय, दूर्ग (सूर्य) देवालय, मेगुती गुडी, हुच्चीमल्ली गुडी प्रमुख होत. ऐहोळेला देवालयांच्या वास्तूशिल्पाचा पाळणा असे म्हणतात. बदामीच्या गुहेत असलेल्या नटराज आणि विष्णूची मूर्ती अद्भूत आहेत.

©KTBS Not to be republished



**बदामीचे गुहालय**

## हे तुम्हाला माहित असू द्या

ऐहोळेच्या देवालयामध्ये लाडखान देवालय अत्यंत प्राचीन देवालय आहे. हे एक शिव देवालय होते. काही वर्षापूर्वी लाडखान नामक संत येथे रहात असत्यामुळे हे नाव पडले. येथील सूर्य देवालयाला 'दूर्ग देवालय' असे म्हणतात. हे देवालय किल्याच्या भिंतीत असल्यामूळे याला दूर्ग देवालय म्हणतात. किल्ल्याना दूर्ग असे म्हणतात.

पट्टदकल्ल येथील देवालयांमध्ये विरूपाक्ष देवालय सुंदर व भव्य आहे. येथील मल्लिकार्जून देवालय आणखी एक प्रमुख देवालय होय. पट्टदकल्ल येथे चालूक्य राजांचा पट्टाभिषेक झाल्याचे सांगतात. आतासुद्धा हे एक विश्व परंपरेच्या श्रेणीतील आहे.



**शेषनागावर विराजमान विष्णू, बदामी देवालय**

Not to be Republished



नटराज, बदामी गुहालय



विरुपाक्ष देवालय, पट्टदकल्ल

**नवीन शब्द**

**विश्व परंपरेची स्मारके** जगातील काही अपूर्व, अमुल्य स्मारके विश्व परंपरेत समाविष्ठ केलेली आहेत अशी घोषणा विश्व संस्थेने केली आहे. याना विशेष संरक्षण आहे. कर्नाटकातील हंपी व पट्टदकल्ल याचा यात समावेश आहे.

**I. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.**

1) चालूक्यांची राजधानी कोणती? ती कोणत्या जिल्ह्यात आहे?
2) पुलकेशीने उत्तर भारतातील कोणत्या सम्राटाचा पराभव केला?
3) चालूक्यांची मुख्य वास्तूशिल्प केंद्रे कोणती?
4) देवालयांच्या वास्तूशिल्प पाळणा असे कोणत्या स्थळाला म्हणतात?

**II. गटात चर्चा करून उत्तर लिहा.**

1) पुलकेशीच्या मोहीमेबद्धल विवरण करा.

**III. 'अ' व 'ब' गटातील विषय जूळवून लिहा.**

| अ | ब |
|---|---|
| ऐहोळे | विश्व परंपरेची स्मारके |
| पट्टदकल्ल | चालूक्यांचे राष्ट्रचिन्ह |
| डुक्कर | देवालयांच्या वास्तूशिल्पाचा पाळणा |

©KTBS Not to be republished

**उपक्रम**

- भारतात असलेल्या विश्व परंपरेतील स्मारकांची चित्रे संग्रह करून यादी करा. संक्षिप्त माहिती लिहा.
- चालूक्यांच्या काळातील देवालयांची चित्रे संग्रह करून अल्बम तयार करा.

## पल्लव

पल्लव घराणे हे दक्षिण भारतातील एक प्रसिद्ध घराणे होय. तामिळनाडूमधील कांची ही पल्लवांची राजधानी होती. त्यानी सुमारे 300 वर्ष राज्य केले. पल्लवामधील राजा नरसिंह वर्मा हा श्रेष्ठ राजा होता.

## नरसिंह वर्मा

नरसिंह वर्माला 'महामल्ल' ही पदवी होती. पराक्रमी नरसिंह याने चालूक्यावर हल्ला करून इम्मडी पुलकेशीचा पराभव केला. या विजयाची आठवण म्हणून 'वा-तापीकोंड' ही बिरुदावली धारण केली. नरसिंहाने मामल्लपूर (आताचे महाबलीपुर) येथील रेवू नगराचे सुंदर नगरात रूपांतर केले.

## पल्लवांचे शिल्पकलेला योगदान



©KTBS Not to be republished



शिल्पकलेला पल्लवानी अमूल्य योगदान दिले. महाबलीपूरम येथील नरसिंह वर्माच्या काळातील सात दगडी रथ याची साक्ष देतात. जगप्रसिद्ध असे हे रथ एकेका दगडात कोरलेले आहेत. महाबलीपूरम येथे गंगावतरण हे शिल्प आहे. या चित्रात भगीरथाने तपस्या करून गंगेला जमीनीवर आणल्याचे दृष्य आहे. हे एक प्रसिद्ध शिल्प होय.

पल्लवानी भव्य देवालयांची निर्मिती केली. त्यापैकी महाबलीपूरमच्या समुद्र किनाऱ्यावरील शिवदेवालय एक होय. पल्लवानी निर्माण केलेली आणखी दोन प्रसिद्ध देवालये म्हणजे कांचीमधील कैलासनाथ आणि वैकुंठ पेरूमाळ देवालये होय.

**नवीन शब्द**

कोरीव शिल्प दगडावर दिसण्यासारखे कोरीव शिल्प

**I. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) पल्लवांची राजधानी कोणती?
2) कांचीमधील पल्लवांचा प्रसिद्ध राजा कोण? त्याने कोणती पदवी धारण केली?
3) पल्लवांच्या काळातील दगडी रथ कोठे आहेत?
4) पल्लवांच्या काळातील प्रसिद्ध देवालये कोणती?

**उपक्रम**

1) पल्लवांच्या काळातील वास्तूशिल्प चित्रांचा माहितीसह संग्रह करा.

©KTBS Not to be republished

## चोळ

चोळानी दक्षिण भारतात प्रबल राजकीय शक्ती म्हणून सुमारे चार शतके राज्य केले. तंजावूर (तमिळनाडू) ही चोळांची राजधानी होती. चोळ साम्राज्यात राज राज चोळ व राजेन्द्र चोळ हे प्रमुख होत.




©KTBS Not to be republished

**राजराज चोळ :** राजराज हा पराक्रमी व दक्ष राजा होता. याचे साम्राज्य तुंगभद्रा नदीच्या सर्व प्रदेशात, श्रीलंका आणि मालदीव पर्यंत पसरले होते. साम्राज्याच्या रक्षणासाठी शक्तीशाली भूसेना व नौकादलाची उभारणी केली. बृहदेश्वराच्या भव्य देवालयाची निर्मिती केली.

**राजेंद्र चोळ:** राजराज नंतर त्याचा मुलगा राजेंद्र चोळ चोळ साम्राज्याचा उत्तराधिकारी झाला. उत्तर भारतातील आक्रमण ही त्याची विशेष साधना होय. त्या विजयाच्या आठवणीसाठी 'गंगेकोंड' ही पदवी धारण केली. तसेच 'गंगेकोंड चोळपूरम' ही नवीन राजधानी व तेथे भव्य देवालय निर्माण केले. राजधानीच्या जवळ उपयुक्त चोळगंगम नावाचा भव्य तलाव तयार केला.

आग्नेय आशियातील साम्राज्यातील श्री विजय राज्य जिंकून राजेंद्रने आणखी एक महान कार्य केले.

**साहित्य:** चोळांच्या काळात तमिळ साहित्य आणि संस्कृतीचा सुवर्ण काळ होता. त्यांच्या काळात भक्ती साहित्यही वाढले. 'पेरीय पुराणम' साहित्यामध्ये प्रमुख स्थान होते. त्याकाळातील कंबन याने लिहिलेले कंबन रामायण आजही लोकप्रिय आहे.

**ग्राम कारभार:** चोळांच्या काळात ग्राम कारभाराची पद्धत आदर्शवत होती. गावचा कारभार त्याच गावातील ग्रामसभेचे निवडलेले सदस्य चालवित असत. काही सदस्यांचा समावेश असलेल्या समितीची रचना करून ठरावीक कार्य सोपवित असत. समितीचे अर्थविषयक हिशोब द्यावा लागे. भ्रष्ट सदस्याना ग्राम सभेतून काढुन टाकत. चोळांच्या काळातील ग्राम कारभाराची व्यवस्था सामान्यपणे आताच्या पंचायती व्यवस्थप्रमाणे होती.

भारतावर राज्य केलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यानी चोळांच्या दक्ष कारभाराची प्रशंसा केली. चोळांच्या काळात गावाना लहान गणराज्य म्हणून पाहिले जाई.

## वास्तू शिल्प आणि मूर्ती शिल्प

वास्तूशिल्प आणि मूर्तीशिल्प कलेला चोळानी अपार योगदान दिले. कांचीमध्ये निर्माण केलेली नटराजची मूर्ती आणि कालीया मर्दन नृत्य शिल्प भारतीय शिल्प कलेला दिलेले अपार योगदान होय.

©KTBS Not to be republished



नटराज



कालीया मर्दन नृत्य

चोळानी तंजावूरमध्ये निर्माण केलेले बृहदेश्वर मंदिर जगप्रसिद्ध आहे. याची निर्मिती करून एक हजार वर्षे झाली आहेत. या देवालयाच्या गाभाऱ्यावरील कळस 200 फूट उंच आहे. हे भारतातील सर्वात उंच व भव्य देवालय आहे. याचा समावेश जागतिक वारशामध्ये केलेला आहे. या मंदिरातील समोरच्या भागात असलेला नंदी दक्षिण भारतातील सर्वात मोठा आहे. चोळाच्या काळातील आणखी एक भव्य देवालय म्हणजे गंगेकोंड चोळपूरम हे शिव मंदिर होय.



बृहदेश्वर देवालय, तंजावूर

भारतीय रीजर्व बँकेच्या अगोदरच्या 1000 रुपयाच्या नोटेवर सहस्त्रवर्माने बांधलेले बृहदेश्वर देवालयाची प्रतिमा होती.

© KTBS Not to be republished

## I. रिकाम्या जागी योग्य शब्द वापरून पूर्ण करा.

1) चोळांची राजधानी .......... होती.
2) बृहदेश्वर देवालयाची निर्मिती .......... यानी केली.

## II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) चोळांच्या काळातील प्रमुख साहित्य कृती कोणत्या?
2) चोळाच्या काळातील ग्राम पातळीवरील राज्यव्यवस्थेची विशेषता कोणती?
3) भारतीय मूर्तीशिल्प कलेला चोळानी दिलेले योगदान लिहा.
4) बृहदेश्वर देवालय का प्रसिद्ध आहे?

## III. खालील प्रश्नांची गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

1) राजराज चोळाचे कार्य कोणते?
2) राजेंद्र चोळाबद्धल टिपा लिहा.

### उपक्रम

- चोळांच्या काळातील ग्राम पातळीवरील कारभाराला आजही ग्राम पंचायती पातळीवरील असलेल्या समान लक्षणाबद्धल माहिती लिहा.
- चोळांच्या काळातील मूर्ती शिल्पकलेप्रमाणे चिकण मातीपासून मॉडेल बनवा.

## राष्ट्रकूट

चालूक्यांच्या अस्तानंतर राष्ट्रकूट घराणे अधिकारावर आले. राष्ट्रकूटांच्या काळातील लक्षात राहण्यायोग्य-कवीराज मार्ग, आदीकवी पंप आणि एल्लोऱ्याचे कैलास देवालय.

**कवीराज मार्ग:** हा कन्नडमथील प्रप्रथम उपलब्ध ग्रंथ (गंगांच्या दुर्विनीताच्या म्हणण्यानुसार) समजला जातो. हा महत्वाचा लक्षणग्रंथ राष्ट्रकूट अमोघवर्मा नृपतुंगाच्या काळात (सुमारे 1200 वर्षापूर्वी) रचला गेला. याची रचना श्रीविजय यानी केली. आतापर्यंत मिळालेल्या कन्नड ग्रंथामधील अती प्राचीन ग्रंथ होय.

| लक्षण ग्रंथ म्हणजचे भाषा, शैली, छंद इत्यादी लक्षणे विवरण केलेला ग्रंथ. |
|---|

©KTBS Not to be republished

**पंप :** पंप हा कन्नडमधील श्रेष्ठ कवी होय. याने कन्नडमध्ये सर्वप्रथम काव्यरचना केली. म्हणून पंपाना 'कन्नडचा आदीकवी' असे म्हणतात. पंपानी प्रथम कन्नडमध्ये रचना केलेली काव्ये आता मिळत नाहीत. पंप हा राष्ट्रकूटांच्या मांडलीक राजा वेमुलवाडच्या अरिकेसरीच्या राज्यात होता. आदी पुराण आणि विक्रमार्जून विजय या पंपाची श्रेष्ठ साहित्यकृती आहेत. महाभारताची कथा वर्णन करणाऱ्या विक्रमार्जून विजयाला 'पंप भारत' असे म्हणतात. कन्नड मधील प्रमुख कवीवर पंपाचा फार प्रभाव होता. त्या काळातील पोन्न हे आणखी एक मुख्य महाकवी होत.



**कैलास देवालय, वेळूर**

Not to be Republished



**महेशमूर्ती, इलीफंटा, याला त्रिमूर्ती असे म्हणतात.**

**एलोर आणि एलिफंट :** एलोराचे कैलास देवालय शंभर फूट उंच दगडात कोरलेले एकशिला देवालय आहे. याची निर्मीती करण्याचे श्रेय राष्ट्रकूट राजा पहिला कृष्ण याला आहे. जगात यासारखे वास्तूशिल्प कुठेही पाहायला मिळत नाही. येथील मूर्तीशिल्प पाहणे हा सुखद अनुभव असतो. वास्तूशिल्पात रावणाने कैलास पर्वत उचललेला कथा प्रसंग रमणीय आहे.

राष्ट्रकूटांच्या साम्राज्यात आताचा महाराष्ट्रातील बराचसा भाग समाविष्ट होता.

एलोर आणि एलींफटा महाराष्ट्रात आहेत. राष्ट्रकूट मूर्तिशिल्प कलावैभव एलीफंटा गुहामध्ये पाहू शकतो. एलीफंटा गुहा मुंबई बंदराजवळील एका बेटावर आहेत. येथील भव्य आकाराची तीन तोंडी असलेली महेशाची मुर्ती विस्मयकारक आहे.

**प्रसिद्ध राजे :** राष्ट्रकूटामधील पहिला प्रसिद्ध राजा धृव होय. उत्तर भारतावर प्रथम यशस्वी आक्रमण हाती घेतले. त्यांचा मुलगा तिसरा गोविंद होय.

©KTBS Not to be republished

नकाशा 3

राष्ट्रकूटांचे साम्राज्य
(९वे शतक)




©KTBS
Not to be republished

## तिसरा गोविंद

तिसरा गोविंद हा राष्ट्रकूट घराण्यातील श्रेष्ठ राजा होता. याने दक्षिण भारतात सगळीकडे प्रभुत्व मिळविले. नंतर हिमालयाच्या पायथ्यापर्यंत यशस्वी आक्रमण केले. या महान कार्याचा उल्लेख केलेल्या शिलालेखावर गोविंदाचे युद्धातील घोड्यानी गंगानदीच्या पूण्यतिर्थाची चव पाहिली असा केला आहे.

## अमोघवर्षा नृपतूंग

नृपतूंग हा तिसरा गोविंद याचा मुलगा होता. वयाच्या 14 व्या वर्षी तो गादीवर बसला. त्याने सुमारे 60 वर्षे राज्यकारभार केला. स्वतः विद्वान होता. श्रीविजय हा विद्वान त्याच्या दरबारात होता.

नृपतूंगाला आपल्या प्रजेचे हीत पाहणे पार आवडत असे. त्यानी मान्यखेट नगर (सद्याचे मूळखेड, जिल्हा कलबुरगी) निर्माण केले. ती राष्ट्रकूटांची राजधानी होती. त्या काळातील चार विशाल साम्राज्यापैकी राष्ट्रकूटांचे साम्राज्य एक होते. असा उल्लेख अरब प्रवाशी सुलेमान याने केला आहे. (इतर तीन म्हणजे रोमन, अरब आणि चीनी साम्राज्य)

## तिसरा कृष्ण

तिसऱ्या कृष्णाच्या काळात राष्ट्रकूटांचे साम्राज्य पून्हा भारतीय राजकीय दृष्ट्या वैभवशील बनले. कृष्णाने चोळांचा पराभव केला. रामेश्वरपर्यंत आपली विजयी पताका फडकाविली. या विजयाची आठवण म्हणून तेथे विजय स्तंभाची, देवालयांची स्थापना केली. याने पांड्य, चेर यांचा पराभव केला. सिंहलच्या राजाकडून खंडणी संग्रह केली. एवढेच नाही तर तिसऱ्या गोविंदप्रमाणे उत्तर भारतात अत्यंत यशस्वी आक्रमण केले. कवी पोन्न हा कृष्ण राजाच्या आश्रयाला होता. तिसऱ्या कृष्णाच्या नंतर राष्ट्रकूट घराण्याला उत्तरती कळा लागली.

**धर्म :** राष्ट्रकूटानी वैदिक असलेल्या शैव व वैष्णव धर्माचे आचरण केले. राष्ट्रकूट राजानी कन्हेरी येथे बौद्ध धर्माला दान दिल्याचा उल्लेख शिलालेखात आहे. जैन धर्मसुद्धा राष्ट्रकूट काळात लोकप्रिय होता. अमोघ वर्माने जैन धर्माला अपार उत्तेजन दिले. राष्ट्रकूटानी अरब व्यापाराला उत्तेजन दिल्यामुळे इस्लाम धर्म किनारपट्टीवर लोकप्रिय झाला होता. मुस्लिम अधिकारी राष्ट्रकूट राजानी नेमले होते. एकूण धर्म सहिष्णूता आणि समानता याचा राष्ट्रकूटांच्या काळात पाया घातला.

©KTBS Not to be republished

## I  रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

1)कन्नडमधील उपलब्ध प्रथम ग्रंथ ..........होय.

2)कन्नडमधील आदीकवी ........... याना म्हणतात.

3)एलोरामध्ये ............. देवालय एकाशिलेत निर्माण केले आहे.

## II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

1)राष्ट्रकूटांच्या काळातील प्रमुख कवींची नावे लिही.

2)राष्ट्रकूटांच्या काळातील प्रमुख वास्तूशिल्प केंद्रे कोणती?

3)पंप यानी रचलेल्या साहित्य कृती कोणला?

4)राष्ट्रकूट घराण्यातील प्रसिद्ध राजांची यादी करा.

5)राष्ट्रकूट साम्राज्याबद्धल सुलेमान याने काय म्हटले आहे?

## III. खालील प्रश्नांची गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

1)अमोघवर्मा बद्धल टिपा लिहा.

2)तिसरा कृष्ण याने केलेल्या सैनिक आक्रमणाचे वर्णन करा.

**उपक्रम:**

1) श्रीविजय, पंप, पोन्न यांच्या बद्धल संक्षिप्त माहिती संग्रहीत करा.

2) राष्ट्रकूट काळातील कला आणि वास्तूशिल्प कलांची चित्रे संग्रह करून विवरणासह अल्बम तयार करा.

## कल्याण चालूक्य

राष्ट्रकूटा नंतर चालूक्य घराणे पून्हा एकदा बिदर जिल्हयातील कल्याण ही राजधानी करून आधिकारावर आले. तेव्हापासून त्याना कल्याण चालूक्य असे म्हणतात. तैल हा या वंशाचा पहिला राजा होय. चालूक्य घराण्यातील सहावा विक्रमादित्य हाप्रसिद्ध राजा होऊन गेला.

© KTBS Not to be republished

## सहावा विक्रमादित्य

सहाव्या विक्रमादित्याच्या प्रदीर्घ राज्यकारभाराच्या काळात चालूक्य राज्य प्रगतीपथावर होते. त्याने अधिकारावर आलेली आठवण म्हणून चालूक्य विक्रम शकाची सुरूवात केली. विक्रमादित्याने अनेक विद्वानाना आश्रय दिला. यांच्या आश्रयाला असलेल्या पंडीत बिल्हनने 'विक्रमांक देवचरित' या महाकाव्याची रचना केली. यात विक्रमादित्यांचा जीवन वृतांत आहे. विज्ञानेश्वर हा आणखी एक श्रेष्ठ विद्वान होय. याने 'मिताक्षर संहिता' या ग्रंथाची रचना केली. हा ग्रंथ हिंदू पद्धतीचा प्रमाण ग्रंथ म्हणून आदर्श ठरला.

**तिसरा सोमेश्वर :** विक्रमादित्यानंतर त्याचा मुलगा तिसरा सोमेश्वर अधिकारावर आला. सोमेश्वर साहित्य व कलेचा भोक्ता होता. त्याने 'मानसोल्हास' या प्रसिद्ध विश्वकोशाची रचना केली. यात सर्व शास्त्रांचा समावेश आहे. सोमेश्वर हा महान विद्वान होता. सर्वज्ञ चक्रवर्ती या नावाने प्रसिद्ध पावला. तसेच त्याच्या काळात चालूक्य राज्याचा विस्तार झाला.

**साहित्य :** कल्याण चालूक्यांचा काळात कन्नड साहित्याला फार प्रोत्साहन मिळाले. कवी चक्रवर्ती अशी पदवी मिळालेल्या रन्ननी 'साहसभीम विजय' अथवा गदायुद्ध या वीर काव्याची रचना केली. पंप, पोन्न आणि रन्न याना कन्नड साहित्यातील रत्नत्रय असे म्हणतात.

वचन साहित्य हे कल्याण चालूक्यांच्या काळातील विशिष्ट योगदान होय. वचनकारानी साध्या सोप्या कन्नडमध्ये वचनाची रचना केली.

> चेडर दासिमय्या, बसवण्णा, अल्लमप्रभू, अक्कमहादेवी, चन्नबसवण्णा, सिद्धराम, मडीवाळ माचय्या, सूळे संकव्वे इत्यादी त्या काळातील प्रसिद्ध वचनकार होते.

**वास्तूशिल्प :** लकुंडी, इटगी, बागळी, बंदळीके, बळ्ळीगावे इत्यादी ठिकाणे चालूक्यांची वास्तूशिल्प केंद्रे होती. तसेच ललित कलेची केंद्रे होती. कोप्पळ जिल्हया-तील इटगीचे महादेव देवालय त्या काळातील अत्यूतम वास्तूशिल्प होते. याचे वर्णन तेथील शिलालेखावर 'देवालयांचा चक्रवर्ती' असे केले आहे. कल्याण चालूक्याच्या वास्तूशिल्पकलेचा होयसळांच्या वास्तूशिल्प कलेवर प्रभाव पडला.

### नवीन शब्द

विश्वकोश-लोक ज्ञानाचे सर्व विषय व्यवस्थितपणे वर्णन केलेला ग्रंथ विश्वकोश होय. याला इंग्लीशमध्ये 'इंन्साकलोपिडीया' म्हणतात.

©KTBS Not to be republished



महादेव देवालय इटगी

## I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

1) चालूक्य विक्रम शकाचा प्रारंभ ........ याने केला.
2) कवी चक्रवर्ती ही पदवी .............. या कवीला मिळाली होती.
3) मिताक्षर संहिताची रचना ........ याने केली.

## II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) कल्याण चालूक्यामधील प्रसिद्ध राजे कोण?
2) सहाव्या विक्रमादित्याच्या दरबारातील विद्वांची नावे लिहा.
3) राजा मम्मडी सोमेश्वर याने रचलेली साहित्यकृती कोणती? त्याची विशेषता काय?
4) कन्नड साहित्यातील रत्नत्रयींची नावे लिहा.
5) देवालयांचा चक्रवर्ती असे कोणत्या देवालयाला म्हणतात? हे कोठे आहे?

## उपक्रम

• तुमच्या शाळेतील ग्रंथालयातील शिवराम कारंत यांचा बालप्रपंच किंवा लहानांचा विश्वकोश वाचा.

©KTBS Not to be republished

# होयसळ

होयसळानी दक्षिण कर्नाटकात आणि तमिळनाडूच्या भौगोलीक प्रदेशाचा समावेश असलेल्या विशाल प्रदेशात 300 वर्षापेक्षा जास्त काळ वैभवपूर्ण कारभार केला. पहिल्यांदा बेलूर व नंतर दोरसमुद्र ही त्यांची राजधानी होती. दोरसमुद्राचे आताचे नाव हलेबिडु होय. सळ एंबायतने होयसळ घराण्याची स्थापना केली. वाघाला ठार मारणारा सळाचे चित्र हे होयसळांचे प्रतिक होते. होयसळ राजामध्ये विष्णूवर्धन आणि तिसरा बल्लाळ प्रसिद्ध राजे होऊन गेले.




विष्णूवर्धनचे राज्य

Not to be republished ©KTBS

## विष्णूवर्धन

विष्णूवर्धनाने चोळ आणि पांड्यांचा पराभव करून त्यांच्या ताब्यात असलेला कन्नड प्रदेश जिंकून घेतला. त्यानी जैन धर्माचे आचरण केले. त्यानंतर श्री वैष्णव धर्म स्वीकारला. त्यांची राणी शांतलेने जैन धर्माचेच आचरण पुढे चालू ठेवले. ती नाट्य सरस्वती म्हणून प्रसिद्ध होती. धर्मसहिष्णू असलेल्या यानी शैव व जैन धर्मांना अपार प्रोत्साहन दिले.

**तिसरा बल्लाळ :** तिसरा बल्लाळ हा होयसळ घराण्यातील शेपटचा प्रमुख राजा होता. त्याने 50 वर्षे दीर्घकाळ राज्य कारभार केला. त्याच्या काळात दिल्लीच्या सुलतानानी वारंवार दक्षिण भारतावर आक्रमण केले. देवालयांची नासधूस केली. येथील संपत्तीची लूट केली. आक्रमणामुळे होयसळ तसेच दक्षिण भारतातील प्रमुख राजधराणी अस्ताला गेली. या भयंकर परिस्थितीचा तिसरा बल्लाळ यानेच समर्थपणे प्रतिकार केला. या वेळी दिल्लीच्या सुलतानाचा प्रतिनिधी असलेला मथूरेचा सुलतानाचे कौर्य वाढले. वय झालेला बल्लाळने त्याना धडा शिकविण्यास गेला. परंतू युद्धात सुलतानाकडून बल्लाळ मारला गेला. त्या नंतर अधिकारावर आलेला त्याचा मुलगा चौथा बल्लाळ सुद्धा अल्पकाळातच मरण पावला. याप्रमाणे होयसळ घराण्याचा 670 वर्षाचा कारभार संपुष्टात आला.

**वास्तूशिल्प व मूर्तीशिल्प :** वास्तूशिल्प व मूर्तीशिल्प क्षेत्रात होयसळानी सुद्धा अनुपम योगदान दिले. सुक्ष्म कलाकुसरीने समृद्ध अनेक देवालयांची निर्मिती याच्या काळात झाली. या देवालयांची सामान्य लक्षणे म्हणजे.

- या देवालयांची निर्मिती नक्षत्राकार गाभाऱ्यावर पांढऱ्या दगडानी केली आहे.
- देवालयातील आतील गाथाऱ्यांचे खाब अत्यंत ललीत कलापूर्ण आहेत.
- देवालयाच्या बाह्य भिंतीवर पुराण आणि महाकाव्यातील कथा वर्णन केलेली शिल्पे आहेत.

होयसळ देवालयामध्ये हळेबिडू येथील होयसळेश्वर, बेलूरचे चन्नकेशव, सोमनाथपूर येथील केशव देवालय प्रमुख होत.

©KTBS Not to be republished



**मदनिकेचे शिल्प**




**होयसळांचे प्रतिक**



**होयसळेश्वर देवालय, हळेबिडू**

विष्णूवर्धनाने चोळांच्या वरील विजयाची आठवण म्हणून वेलूरचे चित्ताकर्षक चेन्नकेशव देवालय उभारले. तसेच त्यानी बळ्ळीगावे येथील दासोज, गदग येथील नागोज ही शिल्पे प्रमुख होत. तेथील सालबंजीके किंवा मदनिकाचे शिल्प डोळ्याचे पारणे फेडते. सोमनाथपूर येथील केशव देवालय सुद्धा तेवढेच आकर्षक आहे. राष्ट्रकवी कुवेंपू यानी याची 'बागीलोदू कैमुगीदू ओळगे बा यात्रकने, शिलयल्लवीगुडी काळेयूवलेयू' असी प्रशंसा केली आहे.

Not to be republished



भुवनेश्वरी बेलूर

**साहित्य :** जन्न, हरिहर आणि राघवांक हे होयसळ काळातील श्रेष्ठ कवी होते. जैनने 'यशोधर चरिते' हरिहराने 'गिरीजा कल्याण' आणि राघवांकने 'हरिश्चंद्र काव्य' या कृतीची रचना केली. हरिहराने रगळे हा एक नवीन काव्यप्रकार आरंभ केला. कन्नडमध्ये 'कंबीगर काव्य' नावाची कृती अड्डय्या कवीने लिहिली.

नवीन शब्द

**सालबंजीके :** मदनिका, खांबाला जोडून असलेली अलंकार युक्त स्त्री मूर्ती.

**रगळे**-एक प्रकारचा पद्यप्रकार.

Not to be republished

## I. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) होयसळाची राजधानी कोणती?
2) होयसळ घराण्यातील प्रसिद्ध राजे कोणते?
3) विष्णुवर्धनची राणी कोण? तिला कोणती पदवी होती?
4) दिल्ली सुलतानाने आक्रमण केले तेव्हा कोणता होयसळ राजा राज्य करत होता?
5) होयसळ काळातील श्रेष्ठ कवींची नावे लिहा.
6) होयसळ काळातील प्रमुख देवालये कोणती?
7) बेलूरचे चन्नकेशव देवालय कोणी उभारले ?

## II. गटात चर्चा करून उत्तर लिहा.

1) तिसऱ्या बल्लाळ बद्दल टिपा लिहा.
2) होयसळ देवालयांची सामान्य लक्षणे कोणती?

## III. अ व ब यादीतील विषय जूळवून लिहा.

| अ | ब |
|---|---|
| सळ | हळेबिडू |
| शांतला | कब्बीगर काव्य |
| बेलूर | होयसळ घराण्याचा संस्थापक |
| अड्डय्या | नाट्य सरस्वती |
| दोरसमुद्र | चन्नकेशव देवालय |

## उपक्रम

होयसळ काळातील देवालयांच्या चित्रांचा संग्रह करा. विवरण लिहा.

©KTBS Not to be republished

| पाठ 3 | कोडगू, कित्तूर, तुळूनाडू आणि हैदराबाद-कर्नाटक |
|---|---|

## पाठाचा परिचय

कर्नाटकातील साम्राज्य व त्यांच्या वैभवशाली इतिहासाप्रमाणेच कर्नाटकातील लहान-मोठ्या प्रदेशाचा इतिहास जाणून घेणे महत्वाचे आहे. कारण प्रादेशिक इतिहासच लोकाना भावतो. तो कर्नाटकाचा एकंदर इतिहास समजून घेण्यास सहाय्यकारी होतो. त्यादृष्टीने कोडगू, कित्तूर, तुळूनाडू आणि हैदराबाद - कर्नाटकचा इतिहास या पाठात वर्णन केला आहे.

## सामर्थ्ये

1 कोडगूचा परिचय करुन घेणे.

2 इंग्रजाविरुद्ध कित्तूरच्या राणीने व त्याचा सेनापती संगोळ्ळी रायण्णा यानी केलेला संघर्ष समजून घेणे.

3 तुळूनाडूचा इतिहास, संस्कृती आणि योगदान जाणून घेणे.

4 हैदराबाद-कर्नाटक प्रदेशात ब्रिटिशांची राजवट, निजाम व स्थानिक जमिनदारा विरुद्ध झालेला संघर्ष समजून घेणे.

©KTBS Not to be republished

## कोडगू

पश्चिम किनारपट्टीवरील शेवटचा जिल्हा कोडगू होय. येथील लोक जास्तीत जास्त कोडव भाषा बोलतात.



तलकावेरी

कर्नाटकच्या लोकांची जीवन रक्षिणी कावेरी. कावेरी नदीचा उगम तलकावेरी येथे झाला आहे. तलकावेरी हे लाखो लोकांचे श्रद्धास्थान आहे. कोडगू जिल्हा अरण्याने समृद्ध आहे. नागरहोळे नावाचे राष्ट्रीय उद्यान येथे आहे.

**हालेरी राजवंश:** कोडगूवर मुख्यत्वे गंग, हालेरी राजवंशाचे राज्य होते. 17 व्या शतकात वीरराजाने याची स्थापना केली. पुढे मुद्दुराजने मुद्रकेरीची निर्मिती करुन तिला आपली राजधानी बनविली व तेथून राजकारभार चालविला. मुदूराजकेरी म्हणजेच मडीकेरी होय.



**मडीकेरी किल्ला**

कोडगूवर 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात हैदर अली आणि टिपू सुलतान यानी राज्य केले. त्यावेळी कोडगूवर राज्य करीत असलेल्या **वीरराजना** टिपूने बंदी बनविले. त्याच्या तावडीतून सुटून वीरराजने ब्रिटीशांच्या सहाय्याने कोडगूवर पुन्हा ताबा मिळविला. टिपूच्या मृत्यूनंतर इंग्रज व कोडगूच्या राज्यात मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित झाले.

**कोडगू आणि ब्रिटिश :** प्रभावी ब्रिटिशानी 1834 मध्ये कोडगूवर ताबा मिळविला. कोडगूचा शेवटचा राजा **चिक्कवीर राजेंद्राला** हद्दपार केले. कोडगूवर आपली राजवट लागू केली. कोडगूचे विभाजन करुन कोडगूचा काही भाग केनरा जिल्हयाला जोडला.

© KTBS Not to be republished

**अमरसुळयचा संघर्ष :** केनरा जिल्हयातील शेतकऱ्यावर जास्त कर लावल्यामूळे त्यानी इंग्रजाशी सशस्त्र संघर्ष केला. त्यानी ब्रिटिशाना कोडगूमधून पळवून लावण्याचा निश्चय केला. या संघर्षाला 1837 चा अमरसुळय संघर्ष म्हणतात. संघर्ष करणाऱ्यानी सुळ्य, पुतूरु, कासरगोड आणि मंगळूरुवर तेरा दिवस कब्जा केला होता. तरीसुद्धा ब्रिटिशानी हा संघर्ष मोडीत काढला. अनेकाना फाशी दिली.

संघर्ष करणाऱ्यांचे प्रमुख नायक पुट्ट बसप्पा, कल्याणस्वामी आणि गुड्डुमने अप्पय्या गौडा हे होत.



**गुड्डु मने अप्पयाचा ब्राँझ पुतळा, मडीकेरी**

**कोडगूमध्ये स्वातंत्र संघर्ष:** स्वातंत्र्य संग्रामामध्ये कोडगूच्या स्वातंत्र्य प्रेमीनी सक्रिय भाग घेतला. स्वातंत्र्यानंतर काही काळ कोडगू स्वतंत्र राज्य राहिले. 1956 मध्ये कोडगू कर्नाटकात विलिन झाले.

©KTBS Not to be republished

**कोडगूतील आदर्श व्यक्ती :** कोडगूचा परिचय जगाला करुन देणाऱ्यात जनरल **कोडंदेर मादप्पा कार्यप्पा** हे मुख्य होत. ब्रिटिशांच्या काळात ते प्रथम भारतीय जनरल झाले. स्वतंत्र भारताच्या भूसेना, नौसेना व वायूसेनेचे प्रथम अधिपती झाले. त्यांचा कार्यभार, साहस, शौर्यासाठी त्याना **फील्ड मार्शल** ही मानाची पदवी बहाल करण्यात आली.



**फिल्ड मार्शल कार्यप्पा**



**जनरल तिम्मय्या**

आणखी एक महान देशभक्त जनरल **कोडंदेर सुब्बय्या तिम्मय्या** होत. त्यानी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धात महत्वाची कामगीरी करुन विजय मिळवून दिला. या दोन व्यक्ती कोडगू लोकांच्या गळ्यातील ताईत बनल्या. सैन्यशक्ती प्रमाणे कोडगू क्रीडा, साहस, लोकगीत आणि निसर्ग सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे.

**गटात चर्चा करुन उत्तर लिही.**

1. कावेरी नदीचा उगम कोठे झाला आहे ?
2. कोडगूवर कोणत्या राजानी राज्य केले ?
3. अमरसुळ्य संघर्ष म्हणजे काय ?

**कृती**

फिल्ड मार्शल कार्यप्पा आणि जनरल तिम्मय्या यांच्या जीवनाविषयी अधिक माहिती संग्रह करा.

©KTBS Not to be republished

# कित्तूर

बेळगावी जिल्हयातील कित्तूर सुमारे दोन शतकापूर्वी प्रभावशाली राज्य होते. ते व्यापार व उद्योगासाठी प्रसिद्ध होते.



**वीर राणी कित्तूर चन्नमाचा पुतळा**

©KTBS Not to be Republished

**राणी चन्नम्मा :** वीर राणी चन्नमा ही राजा मलसर्जची दुसरी पत्नी. मलसर्जचा उत्तराधिकारी मुलगा मरण पावला. चन्नम्माने शिवलिंग सर्जनला दत्तक घेऊन राज्यकारभार पुढे चालू ठेवला. धारवाडचा कलेक्टर थॅकरे याने दत्तक नियमानुसार नाही अशी कुटनीती आरंभिली. कित्तूरचा कारभार ब्रिटिशाना सोपवावा अशी शिफारस केली. या पत्रामूळे राणी रागावली. ब्रिटिशांचे दबाव तंत्र झुगारुन राज्याच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करण्याचा निर्धार केला. थॅकरेने 500 सैनिकासह कित्तूरवर हल्ला चढविला घनघोर युद्ध झाले.

चन्नम्मा आपल्या सैन्यासह ब्रिटिशाविरुद्ध पराक्रमाने लढली. ब्रिटिश सैन्याची दाणादाण उडाली. थॅकरे मारला गेला.

पून्हा ब्रिटिश सैनिकानी कितूरवर चढाई केली. कित्तूरचे सैन्य कमी म्हणजे फक्त सहा हजार सैनिक होते. ब्रिटिशाकडे जास्त सैन्य होते. तीन दिवस युद्ध चालले. चन्नमाकडील काहीनी त्याना दगा दिला. कित्तूर सैन्याचा पराभव झाला. चन्नमाला बंदीगृहात डांबले. चन्नम्माला ब्रिटिशानी बैलहोंगलला कैदेत ठेवले. पाच वर्षा पर्यत चन्नमा स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या वीराना धीराचा संदेश देत राहिली.

ब्रिटिश सतेला विरोध करणारी प्रथम महिला अशी किर्ती चन्नमाला मिळाली. तीचे स्वातंत्र्यासाठीचे हौतात्म्य शुक्रताऱ्याप्रमाणे चमकत आहे. तीच्या शौर्याच्या कथा गाण्यात गातात.

**संगोळ्ळी रायण्णा:** संगोळ्ळी रायण्णा हा चन्नमाचा निष्ठावंत होता. जनसामान्यामधील एक स्वातंत्र्य वीर. चन्नम्माच्या कैदेनंतर कित्तूरचे नायकत्व स्वीकारुन सैन्याला संघटीत केले. ब्रिटिशांच्या कचेऱ्या जाळल्या व खजाना लुटला. गनिमी काव्याने युद्‌द्ध करण्यात पटाईत रायण्णाला पराभूत करणे शक्य नाही हे ब्रिटीशानी ओळखले. त्याचा पराभव करण्यासाठी ब्रिटिशानी कुटनितीचा वापर केला.

पैशाच्या अमिषाला बळी पडून देशद्रोह्यानी त्याना पकडून दिले. त्यांच्या बरोबर इतर सहा जनाना फाशी दिली. शेवटी भेटण्यासाठी आलेल्या आपल्या आईला केंच्चमाला रायण्णाने साष्टांग दंडवत घातले व हसत हसत फासा-वर चढला. नंदगड येथे त्यांची समाधी आहे. रायण्णाच्या अनुयायानी लढा पुढे चालू ठेवला.



संगोळ्ळी रायण्णा

©KTBS Not to be republished

रायण्णांच्या समाधीवर त्यांचा सहकारी बिच्चूगट्टी चन्नबसप्पा याने पिंपळाचे रोप लावले. अजूनही ते झाड तेथे आहे. अनेक वर्षे चनबसप्पा बैरागी होऊन तेथेच राहिला. रायण्णानंतर अनेक युवकानी कित्तूरचा लढा पुढे चालू ठेवून स्वातंत्र्य प्रेम जागृत ठेवले.

**काल गणना (सा.श)**

| | | |
|---|---|---|
| कित्तूर चन्नम्मा | - | 1824 |
| संगोळ्ळी रायण्णा | - | 1829 |

**गटात चर्चा करुन उत्तरे लिही.**

1. कित्तूर राणी चन्नम्मा ब्रिटिशाविरुद्ध का रागावली ?
2. संगोळ्ळी रायण्णा कोण होता ? त्याचा अंत कसा झाला ?

**उपक्रम**

कित्तूर चन्नम्माच्या शौर्यगाथा संग्रह करुन वाचा.

## तुळूनाडू

प्राचिन काळी कर्नाटकाच्या किनारपट्टीच्या एका भागाला (आताचा दक्षिण कन्नड व उडूपी जिल्हा) तुळूनाडू म्हणत असत. पूराण साहित्यात या प्रदेशाचा परशुराम क्षेत्र असा उल्लेख आहे. येथील बहूतेक लोकांची भाषा तुळू आहे. कोकणी व ब्यारीभाषा बोलणारे अनेक लोक तुळूनाडूमध्ये आहेत.

इतिहास काळात तुळूनाडूवर कदंब, अळूप, होयसळ, विजयनगर इत्यादी राजानी राज्य केले. तुळूनाडूत अळूप वंशाच्या राजांनी दीर्घकाल राज्य केले. उद्यावर (उदयपूर), मंगळूरु (मंगळपूर), बारकुरु इत्यादी तूळू राज्याच्या राजधानी होत्या.

चौट वंशाच्या अब्बक्का राणीने (16 वे शतक) पोर्तूगीजाविरुद्ध लढाई करुन त्यांचा पराभव केला.

**धर्म** : तुळूनाडूच्या राजांपैकी बहुतेक राजे जैन होते. येथे बौद्ध, जैन, विरशैव, नाथ, इस्लाम, ख्रिस्त असे अनेक धर्माचे लोक राहात. तुळूनाडूत नागाराधने व भूताराधने हे दोन आराधना पंथ होते.

©KTBS Not to be republished

द्वैत मताचे प्रवर्तक मध्वाचार्य तुळूनाडू येथील होते. मंगळूर येथील कद्रा येथे असलेले मंजुनाथाचे देवालय तुळूनाडूतील प्राचीन देवालय होय.

- 'तूळूनाडूत ख्रिश्चनानी शिक्षण संस्था स्थापन करुन शिक्षण क्षेत्राला आपले योगदान दिले. त्यानीच मंगळूर येथे मुद्रणालय स्थापन करुन शिक्षण क्षेत्राला आपले योगदान दिले. फर्डीनांड किटेल यानी रचलेला कन्नड शब्दकोश बासेल मिशन मुद्रणालयात छापण्यात आला. जर्मनीतून आलेल्या मेन्नर यानी तुळू शब्दकोष तयार केला. प्रारंभीच्या काळात विदेशी पाद्रींनी ख्रिस्त धर्माचा प्रचार केला. पुढे हे प्रचाराचे कार्य येथीलच लोकानी केले. येथे अनेक सुंदर चर्च आहेत.
- प्राचीन काळापासून अरबी देशाबरोबर तुळूनाडूचा व्यापारी संबंध वृद्धींगत झाला होता. याचा परिणाम म्हणजे येथे इस्लाम धर्माचा प्रचार झाला. मुसलमानानी नमाजासाठी ठिकठिकाणी मशीदी बांधल्या.

**वास्तूशिल्पकला:** कद्री मंजुनाथाच्या मंदिरात सुंदर अशी अवलोकितेश्वराची भव्य कास्यमूर्ती आहे. ही शेकडो वर्षांची आहे. मुडबिदरी येथील हजारो खांबाची बसदी, कार्कळ, वेण्णूरु, धर्मस्थळ येथे असलेल्या गोम्मटमूर्ती जैन संस्कृतीचे प्रतिक आहेत.



**अवलोकीतेश्वराची कास्यमूर्ती, मंगळूरु**

© KTBS Not to be republished

येथे प्रसिद्ध देव कोटी चेन्नयाची गुहा पहावयास मिळते.



हजारखांबाची बसदी, मुडबिदरी

**लोककला :** रेडयांची पळण्याची शर्यत, कोंबडयांची झुंज, चेन्ने (लाल गुंजानी खेळायचा खेळ) इत्यादी खेळ तुळूनाडूत खेळत. यक्षगाण, झांज वाजविणे येथील प्रसिद्ध प्राचीन कला होत.

**ब्रिटिश राजवट:** 19 व्या शतकाच्या सुरवातीपासून कर्नाटकाच्या किनारपट्टीवर ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापीत झाली. त्याकाळी किनारपट्टीचा प्रदेश कॅनरा जिल्हा या नावाने ओळखला जात होता. पुढे कॅनरा जिल्हयाचे दोन जिल्हयात विभाजन केले. ते म्हणजे उत्तर भागाचा उत्तर कन्नड (नॉर्थ कॅनरा), दक्षिण भागाचा दक्षिण कन्नड (साऊथ कॅनरा) जिल्हा.

**स्वातंत्र्य संग्राम :** तुळुनाडूच्या स्वातंत्र्य संग्रामात कार्नाडू सदाशिवराय आणि अत्तावर यल्लाप्पा अग्रणी होते.



यक्षगान वेषधारी

©KTBS Not to be republished

- देशभक्त म्हणून कार्नाडू सदाशिवराव यानी हरिजनांची केलेली सेवा विसरु शकत नाही. दलीतांच्या काही मुलांना त्यानी आपल्या घरात भोजन घातले. देशासाठी सर्वस्वाचा त्याग करुन आदर्श निर्माण केला.
- अत्तावर यल्लप्पा हे सुभाषचंद्र बोसनी स्थापन केलेल्या आझाद हिंद सरकारच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. नेताजींच्या आझाद हिंद सेनेत 15 वर्षे सेनाधीकारी होते.
- अस्पृष्यतेविरुद्ध चळवळी, दलीत मुलींचे शिक्षण अशी अनेक दलीतउद्धार कार्य केलेल्या कुदमल रंगरावना विसरणे शक्य नाही. महात्मा गांधीजी मंगळूरुमध्ये आल्यावर त्यानी त्यांच्या कार्याचा गौरव केला.



**कार्नाडू सदाशीव राव**



**अत्तावर यल्लाप्पा**



**कुदमल रंगराव**

© KTBS Not to be republished

बँकींग क्षेत्रात तुळूनाडू प्रसिद्ध आहे. कॅनरा, कार्पोरेशन, सिंडीकेट, कर्नाटक आणि विजया बँकांची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळात येथे झाली आहे. देशाच्या उद्योगात विस्तारलेल्या या बँकांच्या हजारो शाखा भारताच्या अर्थव्यवस्थेला मजबूत करत आहेत. लाखो लोकाना नोकरीची संधी मिळवून दिली आहे.

1956 मध्ये उत्तर आणि दक्षिण कन्नड जिल्हयांचा कर्नाटकात समावेश करण्यात आला. (यापूर्वी दक्षिण कन्नड जिल्हा मद्रासच्या आधीन होता.) 1997 मध्ये दक्षिण कन्नड जिल्ह्याचे विभाजन करुन उडूपी जिल्हा निर्माण केला.

## नवीन शब्द

गरोडी - आराधना केंद्र

## कालगणना (सा. श.)

| | | |
|---|---|---|
| आळूपांचा राज्यकारभाराचा काळ | - | 7-14 वे शतक |
| ब्रिटिशांचा राज्यकाळ | - | 1801-1947 |

## गटात चर्चा करुन उत्तरे लिही.

1 तुळूनाडूवर दीर्घकाळ राज्य करणारे राजघराणे कोणते ?

2 उल्लाळची राणी कोण होती ?

3 फर्डीनांड किटेल कोण होता?

4. हजार खांबाची बसदी कोठे आहे ?

5 तुळूनाडूतील प्रसिद्ध प्राचीन कला कोणत्या ?

6 कार्नाडू सदाशीवरावाना आपण का स्मरण करतो ?

7 कुदमल रंगरावानी दलीतांच्या उद्धारासाठी कोणते कार्य होती घेतले ?

8 तुळूनाडूमध्ये स्थापन झालेल्या भारताच्या प्रमुख बँका कोणत्या ?

## उपक्रम

1 कुदमल रंगराव व कार्नाडू सदाशिवरावाचे जीवन चरीत्र वाचा.

2 भारताच्या आर्थिक प्रगतीमध्ये कर्नाटकाच्या किनारपट्टीवरील जिल्हयांचे पात्र यावर चर्चा करुन अहवाल तयार करा.

# हैदराबाद कर्नाटक

## बेड नायकांचा संघर्ष

विजयनगर साम्राज्याच्या पतनानंतर हैदराबाद कर्नाटकात बेडनायकांचे प्राबल्य वाढले. शौर्यासाठी प्रसिद्ध असलेल्या नायकानी 1800 नंतर ब्रिटिशाविरुद्ध संघर्ष केला.

©KTBS Not to be republished

**कारणे:** स्थानिक जमिनदारांचे शोषण केले जात होते. ब्रिटिशानी जारी केलेला शस्त्रास्त्र कायदा, अरण्य कायदा आणि त्यांची गुलामगीरी यामुळे अस्वस्थ झालेल्या राजानी, संस्थानिकानी आणि जनसामान्यानी ब्रिटिशाविरुद्ध उठाव केला. 1800 च्या नंतर झालेल्या उठावामध्ये बेडरानी जास्तीत जास्त सहभाग घेतला. ब्रिटिशाना हाकलून देणे हा उठावाचा मूळ उद्देश होता.

## हलगली बेडनायकांचा उठाव

हलगली हे बागलकोट जिल्हयातील मुधोळ तालुक्यातील एक गाव. हे गाव आजही पहिलवानासाठी प्रसिद्ध आहे. भारताच्या स्वातंत्र्य संघर्षात हे गाव आघाडीवर होते. तेथील अधिकतर लोक बेड समाजाचे होते. शिकारीसाठी आणि आत्मरक्षणासाठी ते हत्यारे जवळ बाळगीत.

1857 मध्ये ब्रिटिशानी लागू केलेल्या कायद्यानुसार भारतीयानी ब्रिटिश सरकारची परवानगी घेऊन शस्त्रास्त्र जवळ ठेवणे बंधनकारक झाले. स्वभावताच शूर आणि स्वाभिमानी असलेल्या नायकाना हे पटले नाही. यामूळे संघर्ष झाला व ब्रिटिशानी बेडनायकांवर हल्ला केला.

**जडग, बाल, रामी** इत्यादी ठिकाणी झालेल्या दंग्यामध्ये नायक निखराने लढले. यात अनेक वीर ठार झाले. 290 जनाना कैद करुन त्यापैकी 19 जनाना फासावर लटकविले. हलगली बेडनायकाच्या वीरकथा कर्नाटक स्वातंत्र्य संग्रामात अमर झाल्या आहेत.

**रामी :** हलगली उठावामध्ये ब्रिटिशांच्या तीन सैनिकांना रामी बेडर या वीर महिलेने गोळया घालून ठार केले या उठावात रामीला वीरमरण आले.

हलगलीच्या बेडनायकांच्या बाबत लिहिलेल्या लावणीचा प्रारंभ असा आहे.

हलगलीचे बेडर सिंहाप्रमाणे शूर
चालता थांबल्या संघर्ष करणार
कुळाचा महिमा वाढविणार ।।

©KTBS Not to be republished

## सिंधूर लक्ष्मण

सिंधूर लक्ष्मण हा ब्रिटिशाविरुद्ध संघर्ष करणारा एक महावीर होय.

सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील सिंधूर गावात राहणाऱ्या बेडर साबू आणि नरसब्बा या दांपत्याच्या पोटी लक्ष्मणचा जन्म झाला. यांची समाधी बिळगी येथे आहे.

सिंधूर गावातील जनता इनामदाराच्या (गौडर) कारभाराने बेजार झाली होती. तेव्हा लक्ष्मणने त्यांच्याविरुद्ध उठाव केला. लक्ष्मण ब्रिटिश सरकारचा विरोधक बनला.

लक्ष्मण ब्रिटिशांचा खजाना तसेच श्रीमंतांनी लुबाडणूक करुन जमा केलेले धन लुटून गरिबाना वाटत असे. समाजात सोशितांची सेवा करत असे. गावच्या चावडीसमोर उभे करुन चोरीचा आरोप केल्याने लक्ष्मण अपमानीत झाला. तेथून तो फरारी झाला. पोलीस अधिकाऱ्यानी त्याला पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. शेवटी त्याला गोळी घालून ठार केले. स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणारा क्रांतीकारी सिंधूर लक्ष्मण इतिहासात अविस्मरणीय झाला.

## सूरपूरचे नायक

यादगीरी जिल्ह्यातील सुरपूर शूर बेडनायकासाठी प्रसिद्ध होते. सुरपूरचा राजा कृष्णप्पानायक याच्या मृत्यूनंतर आठ वर्षे वेंकटप्पानायक हा उत्तराधिकारी होता. सुरपूर संस्थान निजाम आणि ब्रिटिशानी वाटून घेण्याची तयारी केली होती.

राजा वेंकटप्पा नायकानी इंग्रजी शिक्षण घेतले होते. ते स्वांतत्र्यप्रिय होते. 1857 चे स्वातंत्र्य युद्ध सुरपूरपर्यंत पसरले. तेव्हा वेंकटप्पा नायकानी यात भाग घेतला.


सुरपुरचा राजा वेंकटप्पा नायक

ब्रिटिशांच्या सैन्याने सुरपुरच्या किल्ल्याला वेढा घातला. भयंकर संघर्ष झाला. दुसऱ्याच दिवशी ब्रिटिश सैन्याचा एक वरिष्ठ अधिकारी मरण पावला. ब्रिटिशांचे धैर्य कमी झाले. फसवून किल्ला घ्यायचाच असा निर्धार ब्रिटिशांनी केला. नायकांच्या एका प्रमुख अधिकाऱ्यांने प्रलोभनाला

©KTBS Not to be republished

बळी पडून किल्ल्याच्या गुप्त मार्गाची माहिती ब्रिटिशाना दिली. यामूळे ब्रिटिशाना विजय मिळविणे शक्य झाले.

ब्रिटिश सैन्याला फसवून व्यंकटप्पा नायक जास्त सैन्य जमविण्यासाठी हैदराबादच्या निजामाकडे गेला. परंतू निजामांचा प्रधान सालार जंग याने ब्रिटिशांच्या कडून आपल्याला लाभ मिळवून घेण्याच्या उद्देशाने व्यंकटप्पाना ब्रिटिशाना सोपविले. ब्रिटिशानी चौकशी करुन व्यंकटप्पाला फाशीची शिक्षा सुनावली. नंतर ती शिक्षा चार वर्षे केली. पण व्यंकटप्पा नायकाना फसवून गोळी घातली आणि आत्महत्या केल्याचा खोटा प्रचार केला. त्यावेळी ते 24 वर्षाचे होते.

ब्रिटिशानी सुरपूर हैदराबादच्या निजामाना भेटीदाखल दिले. याप्रमाणे कलबुरगी, बिदर आणि रायचूर प्रदेश हैदराबादच्या संस्थानात समाविष्ठ झाले.

## हैदराबाद - कर्नाटक संघर्ष

हैदराबाद कर्नाटकाच्या मुक्तता संघर्षात अत्याचारी राजकारभाराविरुद्ध लोक एकत्रीत येऊन उज्वल इतिहास निर्माण केला. त्याचप्रमाणे महान त्याग, बलीदानासाठी साक्षी बनले.

आपल्या देशात प्रथम 562 लहान मोठी राज्ये ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली होती. त्यापैकी हैदराबाद प्रमुख होते.

**संघर्षाची पार्श्वभूमी :** हैदराबादच्या संस्थानात हिंदूची स्थिती अत्यंत दयनीय होती. सार्वजनिक धार्मिक आचरण करण्यावर बंदी होती. संस्थानात शिक्षणाला महत्व नव्हते. येथे उर्दू मिश्रीत कन्नड भाषा आणि साहित्याचा प्रभाव होता.

निजामानी **'कालागष्ती'** नावाचे 53 जाचक नियम लागू करुन लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले.

**संघर्षाची गती :** ब्रिटिश आणि निजामांच्या विरुद्ध संघर्ष करणाऱ्यांचा जनप्रिय नायक **स्वामी रमानंद तिर्थ** यानी हैदराबादच्या संस्थानात सगळीकडे संचार करुन अहिंसात्मक सत्याग्रहींची संघटना तयार केली. त्याप्रमाणे आणखी एक प्रसिद्ध नायक **हर्डीकर मंजाप्पा** कर्नाटक गांधी म्हणून प्रसिद्ध आहेत. यानी मद्यपान विरोध, अस्पृष्यता निवारण यासारखे समाजोपयोगी कार्यक्रम लोकप्रिय केले.

©KTBS Not to be republished



स्वामी - रमानंद तीर्थ



हर्डीकर मंजाप्पा

**वंदे मातरम चळवळ :** या काळात आलेल्या वंदे मातरम् गाण्याला ब्रिटिशानी विरोध केला. याविरुद्ध झालेल्या चळवळीतील वीर नायक रामचंद्र राव हे वंदे मातरम् रामचंद्र राव म्हणून प्रसिद्ध झाले. ब्रिटिशानी वंदे मातरम् म्हणणाऱ्या हजारो लोकाना कैद केले.

चळवळीत आर्यसमाजाची भूमिका महत्वाची होती. मुस्लीमानी इतीहाद-उल-मुसलमी नावाची संघटना तयार केली. त्याचे नेते कासीमरजनी होते. या संघटनेने हिंसात्मक मार्ग स्वीकारला.

कॉग्रेस संस्थेला संस्थानात बंदी होती. तरी हैदराबादचे स्वतंत्र भारतात एकत्रीकरणास निजामावर दबाव होता.

15 आगस्ट 1947 स्वातंत्र्य भारताचा ध्वज हैदराबाद मध्ये फडकविण्याचा संकल्प लोकानी केला होता. निजाम सरकारने लोकांवर आणखी प्रतिबंध लादले.

यावेळी रजाकारानी संस्थानात व्यापक प्रमाणात खून, दरोडे घालण्यात आले. त्याला निजामांचा पाठिंबा होता. त्यावेळी ठिकठिकाणी एकसारखे वंदे मातरम् ऐकू येत होते.

©KTBS Not to be republished

**शरणगौडा इनामदार :** हैदराबाद मुक्तता संघर्षात भूमीगत राहून कार्य करणाऱ्यांची संघटना निर्माण करणारे नेता शरणगौडा इनामदार होत. त्यानी रजाकारावर हातगोळयानी हल्ला केला. त्यामूळे अनेक खेडी रजाकाराच्या अत्याचारातून मूक्त झाली. लोक त्याना 'सरदार' या नावाने ओळखू लागले.



शरणगौडा इनामदार

रजाकारावरील हल्ल्यामूळे घाबरुन लाखो लोक हैदराबाद संस्थान सोडून स्वतंत्र भारतात स्थलांतरीत झाले. हजारो तरुणानी हैदराबादच्या सीमाभागात शिबीरांची स्थापना करुन रजाकार लुटारुंच्या टोळयाविरुद्ध सशस्त्र संघर्ष केला.



सरदार वल्लभभाई पटेल

1947 साली भारत देश स्वतंत्र झाला तरी हैदराबाद संस्थान अद्याप भारतात विलीन झाले नव्हते. याकाळात लुटारुंचा हिंसाचार सतत चालू होता. शेवटी भारत सरकारने हैदराबाद समस्या सोडविण्यासाठी गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल याना सर्वाधिकार दिले. त्यांच्या आदेशाप्रमाणे 17 सप्टेंबर 1948 रोजी भारतीय सेनेने हैदराबादेत प्रवेश केला. निरुपाय झाल्यामूळे तेथील निजामाने शरणागती पत्करली. नंतर हैदराबाद संस्थान भारतात विलिन झाले.

Not to be republished ©KTBS

1951 साली हैदराबादमध्ये सर्वप्रथम निवडणूकीमध्ये लोकानी आपले प्रतिनिधी निवडून पाठविले. अग्रगण्य नायक असलेले स्वामी रमानंद तीर्थ हे गुलबर्गा क्षेत्रातून लोकसभेवर निवडून आले.

## कालगणना (सा.श.)

| | | |
|---|---|---|
| 1857 | - | हलगली गावच्या बेडनायकांच्यावर ब्रिटिशांचा हल्ला. रामीचा अंत. |
| 1854-58 | - | सुरपुरचा राजा व्यंकटप्पा नायकाचा संघर्ष व अंत. |
| 22 जुलै 1922 | - | सिंधूर लक्ष्मणला ब्रिटिशानी गोळ्या घालून ठार केले. |
| 17 सप्टेंबर1948 | - | हैदराबाद निजामाची शरणागती आणि हैदराबाद संस्थानाचे विलीनीकरण. |

## गटात चर्चा करुन उत्तरे लिही.

1 बेडनायकानी उठाव करण्याचे कारण काय ?

2 हलगलीच्या बेडनायकानी कोणत्या कायद्याचा विरोध केला ?

3 रामी कोण होता ?

4 सिंधूर लक्ष्मण कोण होता ?

5 1857-58 च्या प्रथम स्वातंत्र्य युद्धात सुरपूरच्या व्यंकटप्पा नायकांचे कार्य कोणते ?

6 कालागप्ती म्हणजे काय ?

7 स्वामी रमानंद कोण होते ?

8 कर्नाटकाचा गांधीजी असे कोणाला म्हणतात ?

9 'वंदे मातरम' संघर्ष केलेला वीर नायक कोण ?

10 हैदराबादच्या मुक्तता संग्रामात शरणगौडा इनामदाराचे कार्य कोणते ?

## उपक्रम :

1 बेडनायकांच्या दंगली सदर्भातील गीतांचा संग्रह करा.

2 भारताच्या एकीकरणात सरदार वल्लभभाई यांची भूमिका या विषयी चर्चा करुन अहवाल लिहा.

* * * * *

© KTBS Not to be republished

| पाठ 4 | # धर्म आणि समाज सुधारक |
|---|---|

## पाठाचा परिचय

सा.श. 8 व्या शतकापासून ते 16 व्या शतकापर्यंतच्या कालावधीत अनेक धार्मिक सुधारकांचा जन्म झाला. ते चिंतनशील होते. त्यानी वैचारिक धारामधून धर्म आणि समाजाचे पुनरुत्थान केले. या पाठामध्ये सुधारणा चळवळीत अग्रेसर असलेले शंकराचार्य, रामानुजाचार्य, बसवेश्वर आणि मध्वाचार्याचे जीवन तसेच सुधारणांचे संक्षिप्तपणे वर्णन केलेले आहे.

## सामर्थ्ये

1. धार्मिक सुधारकांचे चिंतन तसेच सुधारणा समजून घेणे.
2. त्यांचे चिंतन आणि उपदेश किती योग्य आहेत हे जाणून घेणे.

Not to be republished ©KTBS

आपल्या भारत देशात अनेक महापुरुषांचा जन्म झाला. त्यानी फक्त उपदेशावर भर न देता स्वतः समाज सुधारणेसाठी सक्रीय सहभाग घेतला. त्यानी केलेल्या सुधारणामुळे लोकामध्ये असलेले अज्ञान आणि वाईट परंपरा नष्ट केल्या. आजही त्याचा प्रभाव व्यापक प्रमाणात दिसून येतो.


शंकराचार्य

### शंकराचार्य

शंकराचार्यांचा जन्म केरळच्या कालडी गावात झाला. जन्मापासूनच प्रतिभावंत असलेल्या शंकराचार्यानी वयाच्या आठव्या वर्षीच चारही वेदांचा अभ्यास केला. शंकरचार्याचे वडील शिवगुरु आणि आई आर्यांबा हे होत. शंकराचार्यानी प्रतिपादीत केलेल्या तत्वाना 'अव्दैत तत्वज्ञान' म्हणतात.

### शंकराचार्यानी केलेल्या सुधारणा

शंकराचार्यानी त्याकाळी असलेल्या हिंदू समाजातील वाईट आचार विचारांचे खंडण करुन त्यात सुधारणा घडवून आणली.

- शंकराचार्यानी बदरी (उत्तराखंड) द्वारका (गुजरात), पूरी (ओडीसा) आणि कर्नाटकात श्रृंगेरी येचे मठांची स्थापना केली. हेच मठ भारतीयांच्या भावनात्मक आणि धार्मिक एकत्रीकरणाचे केंद्रबिंदू ठरले.

- शंकराचार्यानी आनंद लहरी, सौंदर्य लहरी अशा अनेक ग्रंथांची रचना केली. त्यांच्या स्त्रोत्रातील 'भजगोविंदम' आज ही लोकप्रिय आहे. शंकराचार्यानी स्वत:च्या 32 वर्षाच्या वयात ही सर्व साधना केली.

## रामानूजाचार्य


रामानूजाचार्य

रामानूजांचा जन्म चेन्नई जवळील श्री पेरंबुदूर येथे झाला. त्यानी कांची मध्ये शास्त्राभ्यास केला. रामानुजांच्या वडीलांचे नाव केशव दिक्षित व आईचे नाव कांतीमती होते. त्यानी प्रतिपादीत केलेल्या तत्वज्ञानाला 'विशिष्ट तत्वज्ञान' असे म्हणतात.

रामानुजानी देशाच्या चारही दिशाना संचार करुन श्री वैष्णव धर्माचा प्रचार केला. मुक्तीसाठी देवाची भक्ती आणि शरणागती महत्वाची आहे असे त्यानी सांगीतले. चोळ राजांनी दिलेली वागणूक सहन न झाल्याने कर्नाटकाला येऊन होयसळ राजा विष्णुवर्धनांच्या आश्रयास राहिले.


चेलूवदेवराय देवालय, मेलूकोटे

©KTBS Not to be republished

## रामानूजाचार्यांनी केलेल्या सुधारणा

- रामानूजाचार्यांनी जातीवादाचे खंडण केले.
- कनिष्ट वर्गातील लोकाना मेलूकोटे देवालयात मुक्त प्रवेश करण्याची संधी दिली.

रामानूजाचार्य सुमारे 120 वर्षे जगले.

## बसवेश्वर



बसवेश्वर

कर्नाटकाच्या सामाजिक आणि धार्मिक आंदोलनामध्ये बसवेश्वरानी अत्यंत क्रांतीकारी भूमिका बजावली आहे. बसवेश्वर हे विजापूर जिल्हयातील बसवन बागेवाडी येथील होत. बसवेश्वरांच्या वडीलांचे नाव मादरस व आईचे नाव मादलांबिका होय. बसवेश्वरांच्या वचनाना 'शक्ती विशिष्टाद्वैत' म्हणून ओळखतात. बालपणीच उपनयन संस्कारांचा विरोध करुन लिंगदिक्षा घेतली. त्यांचा विद्याभ्यास कुडलसंगम येथे झाला.

कल्याण मध्ये राज्य करीत असलेल्या कलचुरी वंशाच्या बिज्जल राजाकडे कोषाध्यक्ष म्हणून काम करु लागले. कल्याणमध्ये बसवेश्वरानी आपल्या क्रांतीकारी चिंतनाचा प्रसार करण्यास सुरुवात केली. संप्रदायाच्या लोकानी याला विरोध केला. त्यामुळे त्यानी कल्याण सोडून कुडलसंगम येथे वास्तव्य केले. येथेच त्यानी जीवनाच्या अंतापर्यंत राहीले.



बसवेश्वर समाधी स्थळ, कुडलसंगम

© KTBS Not to be republished

## बसवेश्वरांच्या सुधारणा

- बसवेश्वरानी जातीरहीत आणि वर्गरहीत समाज निर्मितीचा संकल्प केला.
- 'कायकवे कैलास' (काम हीच पूजा) ही त्यांची मुख्य शिकवण होय.
- बसवेश्वरानी जातीयता, मूर्तीपूजा, यज्ञयाग इत्यादीचा विरोध केला 'देहवे देगुळ' (स्वतःचा देह हेच देवालय) असे सांगीतले.
- स्त्री ही आई तीच सर्वस्व असते. असे त्यानी विचार ऐकवून स्त्रियांचा आत्मविश्वास वाढविला.
- त्यानी बसवकल्याण मध्ये 'अनुभव मंटप' याची स्थापना केली. हेच वचनकारांचे व्यासपीठ झाले.
- बसवेश्वरानी हजारपेक्षा जास्त वचनांची रचना केली. त्या वचनांचा शेवट 'कुडल संगम देव' या शब्दाने होतो.

कायक- म्हणजे भक्तीपासून केलेले काम. कायकपासून मिळालेल्या फळाचे समान वाटप करुन घेणे हेच 'दासोह'. बसवेश्वराना समाजात 'कायक' कामाची संस्कृती रुजवायची होती.

**वचन साहित्य :** 'वचन' हा एक विशिष्ठ साहित्य प्रकार आहे. वचन हे गद्यासारखे वाचन करता येते. तसेच पद्यासारखे गाताही येते. जेडर दासीमय्या, अल्लमप्रभू, चन्नबसवण्णा, अक्कमहादेवी इत्यादी वचनकार होऊन गेले. त्यानी सर्व जाती धर्मांना सामावून घेतले होते. वचनाचे प्रकटपणे चिंतन आजही चालू आहे.


मध्वाचार्य

## मध्वाचार्य

मध्वाचार्यांचा जन्म उडूपी जवळील पाजक (बेल्ले) या गावी झाला. त्याच्या वडीलांचे नाव मध्यगेह भट्ट व आईचे नाव वेदावती होते. त्यानी **द्वैत** तत्वज्ञानाचे प्रतिपादन केले.

संन्यास स्वीकारलेल्या मध्वाचार्यांनी आपल्या तत्वांचा प्रसार करण्यासाठी दोनवळा संपूर्ण भारत भ्रमण केले. विष्णू हे त्यांचे आराध्य दैवत होते.

Not to be republished. ©KTBS



**श्री कृष्ण देवस्थान, उडूपी**

## मध्वाचार्यांच्या सुधारणा

- मध्वाचार्यांनी गीतातात्पर्य निर्णय, महाभारत तात्पर्य निर्णय इत्यादी 37 साहित्य कृतींची संस्कृत मध्ये रचना केली.
- उडूपी मध्ये अष्ठमठांची स्थापना केली.
- त्यानी सरळ अशा भक्तीमार्गाचा उपदेश केला.

अष्ठमठा बरोबरच उत्तरादी, व्यासराय आणि राघवेंद्र यांचे मठ हे मध्व तत्वांच्या अनुयायींची मुख्य धर्मकेंद्रे झाली आहेत.

## कालगणना

| | |
|---|---|
| शंकराचार्य | : सुमारे 11 शतकापूर्वी जन्मले. |
| रामानूजाचार्य | : सुमारे 8 शतकापूर्वी जन्मले. |
| बसवेश्वर | : सुमारे 8 शतकापूर्वी जन्मले. |
| मध्वाचार्य | : सुमारे 6 शतकापूर्वी जन्मले. |

©KTBS Not to be republished

## नवीन शब्द

दीक्षा-मंत्रोपदेश कोष-खजिना

## I. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

1. शंकराचार्यांनी कोणत्या पीठाची स्थापना केली?
2. रामानूजाचार्यांना कर्नाटकात कोणत्या राजाने आश्रय दिला?
3. वचन साहित्याचे महत्व काय? काही वचनांची नावे लिहा.
4. मध्वाचार्यांचे योगदान लिहा.

## II. खालील अ व ब यादीतील विषय जूळवून लिही.

| अ | ब |
|---|---|
| शंकराचार्य | शक्ती विशीष्ठाद्वैत |
| रामानूजाचार्य | द्वैत |
| बसवेश्वर | अद्वैत |
| मध्वाचार्य | विशिष्ठाद्वैत |

## III. खालील प्रश्नांचे गटात चर्चा करुन उत्तर लिहा.

1. बसवेश्वरानी केलेल्या सुधारणा कोणत्या?

## उपक्रम

1. शंकराचार्य, रामानुजाचार्य, बसवेश्वर आणि मध्वाचार्य यांचे जीवन चरित्र वाचा.
2. वचनकारांच्या वचनांचा संग्रह करा व गा.
3. प्रमुख वचनकारांची नावे व त्यांची टोपण नावे संग्रहीत करा.

* * * * *

©KTBS Not to be republished

पाठ 5

# भारतीय इतिहासात रजपूत

## पाठाचा परिचय

सा.श. 650 ते 1200 पर्यंतच्या कालावधीमध्ये रजपूत घराण्याने भारतीय इतिहासात मुख्य भूमिका बजावली. या पाठात काही प्रसिद्ध घराणी प्रतिहार, पाल, चौहान आणि गुहील इत्यादींचे योगदान आणि वास्तूशिल्प व साहित्य क्षेत्रातील त्यांचे योगदान वर्णन केले आहे. तसेच आर्थिक व सामाजिक जीवनाची माहिती दिली आहे.

## सामर्थ्ये

1. काही रजपूत घराण्यांचे मुख्य योगदान समजून घेणे.
2. रजपूत घराण्यांनी वास्तूशिल्प आणि साहित्य क्षेत्रात दिलेले अमूल्य योगदानाची प्रशंसा करणे.
3. रजपूत काळातील ऐतिहासिक स्थळे नकाशावर ओळखणे.

©KTBS Not to be republished

**रजपूत कोण होते?** रजपूत साहस आणि पराक्रमासाठी प्रसिद्ध होते. ते स्वतः ला क्षत्रीय समजत होते. ते आपली ओळख सूर्यवंशी व चंद्रवंशी अशी करुन देत असत. रजपूत घराण्याने उत्तर भारतावर सुमारे 500 वर्षे राज्य केले. तो मोठा काळ होता. भारतावर आक्रमण करण्यास आलेल्या अरब, तुर्क, अफगाणी आणि मोंगल याना न घाबरता समर्थपणे तोंड दिले.

## रजपूत घराणी

भारतीय इतिहासात अनेक रजपूत घराण्यानी महत्वाची भूमिका बजावली. रजपूतापैकी पाल, प्रतिहार, परमार, चौहान, गहडवाल, गुहील, सोळंकी इत्यादी 36 घराणी होती. त्यापैकी प्रतिहार, पाल, चौहान आणि गुहिल यांच्या योगदाना विषयी येथे माहिती दिली आहे.

**प्रतिहार :** प्रतिहार राजानी मध्यप्रदेशातील अवंतीमधून (उजैनी) राज्य कारभार केला. नागभट्ट हा या वंशाचा प्रसिद्ध राजा होता. अरबांच्या आक्रमणापासून भारताचे संरक्षण करण्याचा मान त्याच्याकडे जातो. त्याने विशाल साम्राज्याची स्थापना केली.



©KTBS
Not to be republished

याच वंशाचा भोज हा एक श्रेष्ठ राजा होऊन गेला. तो साहित्यिक होता. त्या काळातील प्रसिद्ध शहर कनोज वरती आक्रमण करुन ते जिंकून घेतले. बंगालच्या पाल याना त्याने हरविले. त्यांचे राज्य पाहिलेला अरब प्रवासी सुलेमान सांगतो. भोज हा एक श्रेष्ठ राजा होता. तो अरबांचा शत्रू होता. त्याच्याकडे उत्तम असे घोडदळ होते.

**पाल घराणे:** पालानी सुमारे चार शतके राज्यकारभार केला. धर्मपाल हा या वंशाचा श्रेष्ठ राजा होय. याच्या कारकिर्दीत पाल घराणे हे उत्तर भारतातील श्रेष्ठ घराणे म्हणून प्रसिद्ध होते. प्रसिद्ध शहर कनोजवर याने मिळविलेला विजय हे याचे विशेष कार्य. मूळचा कर्नाटकचा असलेल्या विजयसेनने पालांचा शेवट केला व **सेन** वंशाची सुरुवात केली.

पालानी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्याचबरोबर हिंदू धर्माला प्रोत्साहन दिले. त्यानी शिक्षण प्रसारात जास्त आवड घेतली. उदंडपुर विक्रमशील विश्वविद्यालयांची स्थापना यांच्याच काळात झाली.

**चौहान घराणे:** तिसरा पृथ्वीराज हा चौहान घराण्यातील प्रसिद्ध राजा होय. त्यांची राजधानी दिल्ली होती.

पृथ्वीराज चौहान तसेच कनोजचा राजा जयचंद्रची मुलगी संयुक्ता यांच्या प्रेमाच्या स्वारस्यकथा त्यावेळच्या अनेक ग्रंथामधून वर्णन केल्या आहेत. संयुक्ता ही अतिशय सुंदर राजकुमारी होती. राजा जयचंद्र आणि पृथ्वीराज चौहान यांच्यात पूर्वापार वैर होते. जयचंद्राने मुलीच्या लग्नाचे स्वयंवर ठेवले होते. पण त्यासाठी पृथ्वीराज चौहानला आमंत्रण दिले नव्हते. पृथ्वीराज चौहान आणि संयुक्ता एकमेकावर प्रेम करत होते. त्यामुळे पृथ्वीराज चौहानचा अपमान करण्यासाठी जयचंद्राने त्याचा पुतळा पहारेकऱ्या प्रमाणे महालाच्या प्रवेश द्वारापाशी ठेवला होता.

स्वयंवरामध्ये संयुक्ताने सर्व राजकुमाराना सोडून पृथ्वीराज चौहानच्या पुतळ्याच्या गळ्यात हार घातला. जवळच स्वयंपाक खोलीत लपलेल्या पृथ्वीराज चौहानने हे पाहिले. लागलीच त्याने संयुक्ताला घोडयावर बसवून पळवून नेले. व स्वतःच्या महालात तिच्याशी लग्न केले. या घटनेपासून दोन्ही राज घराण्यातील संबंध अधिकच बिघडले.

पृथ्वीराज चौहानने महंमद घोरीच्या भारतीय आक्रमणाला विरोध केला. त्यासाठी अनेक रजपूत राजे एकत्र आले. परंतु कनोजचा राजा जयचंद्र त्यांच्या मध्ये सामील झाला नाही. तरीसुद्धा पहिल्या तराईच्या युद्धात पृथ्वीराज चौहानने महंमद घोरीचा पराभव केला. त्या युद्धात हरल्यावर महंमद घोरीने क्षमायाचना केल्याने पृथ्वीराज चौहानने मोठया मनाने त्याला क्षमा करुन सोडून दिले. परंतू दुसऱ्याच वर्षी झालेल्या तराईच्या दुसऱ्या युद्धात महंमद घोरीने जयचंद्राची मदत घेऊन पृथ्वीराज चौहानला हरविले व ठार केले. दिल्लीवर महंमद घोरीने ताबा मिळविला. हीच दिल्लीवर सुलतानांच्या राजवटीची नांदी ठरली.


विजय स्तंभ
चितोडगड

पृथ्वीराजच्या शौर्य व धीरोदात पराक्रमाचे वर्णन **पृथ्वीराज रासो** या हिंदी महाकाव्यात चांद बरदाई याने केले आहे.

**गुहील घराणे :** रजपूत घराण्यापैकी गुहील (गुहीलोट) हे सुद्धा वीर-पराक्रमी होते. या वंशाचा राजा खोबण्णाने अरबांच्या आक्रमणापासून स्वतःच्या राज्याचे रक्षण केले. **बाप्पा रावळ** ही पदवी त्याने धारण केली. या वंशाचा आणखी एक श्रेष्ठ पराक्रमी

Not ©KTBS to be republished

राजा राणा कुंभ होय. त्याने दिल्लीच्या सुलताना विरुद्ध लढाया करुन स्वतःच्या राज्याने रक्षण केले. त्याने राज्याचा विस्तार करताना 32 किल्ले बांधले. त्यामुळे त्यांचे राज्य सुरक्षित झाले. चितोडगडावरील प्रसिद्ध विजयस्तंभ यांच्याच काळात उभारला गेला.

राजा संग किंवा राजा संग्राम सिंह हा गुहील वंशाचा प्रसिद्ध राजा होय. शंभर युद्धांचा वीर अशा त्याच्या शरिरावर युद्धातील 80 घाव होते. त्याने सतत दिल्लीच्या सुलतानाविरुद्ध लढाया केल्या.

## रजपूतांचे योगदान

**आर्थिक स्थिती :**

भारतीयाबरोबर जास्त विदेशी व्यापार अरब व्यापाऱ्यानी केला. मसाल्याचे पदार्थ, कापूस, रेशमी कपडे, सुगंधी द्रव्ये आणि हिरेमाणके भारतातून निर्यात केली जात. उत्तम प्रतीचे घोडे मध्य अशिया व अरेबियामधून आयात करत. रजपूतानी उत्पन्नाचा जास्त भाग किल्ले, देवालये निर्माण करण्यासाठी वापरला. यामुळे लोकांना काम मिळाले.

**सामाजिक स्थिती :** रजपूतांच्या काळामध्ये व्यवसायावर आधारित वर्गव्यवस्था होती. समाजामध्ये स्त्रियाना मानाचे स्थान होते. स्त्रियासुद्धा साहित्य, नृत्य, संगीत, चित्रकला, कशिदा काम इत्यादी कलामध्ये प्रवीण होत्या. बालविवाह, सती पद्धती रूढ होत्या. ब्रम्हाचा वास असलेले पुष्कर (अजमेर जवळ) हे त्यांचे यात्रेचे महत्वाचे ठिकाण होते. प्रत्येक वर्षी मोठ्या प्रमाणात तिथे उंट जत्रा करण्याची प्रथा आहे. ती आजही कायम आणि प्रसिद्ध आहे.

**साहित्य :** रजपूतांच्या काळामध्ये संस्कृत साहित्य भरभराटीस आले. त्याबरोबरच गुजराती, हिंदी, राजस्थानी भाषांचा विकास झाला. चांद बरदाई यांचे **पृथ्वीराज रासो** हे या काळातील प्रसिद्ध हिंदी साहित्य होय. बहुतेक रजपूत राज्यकर्ते हे स्वतः विद्वान आणि साहित्य प्रेमी होते. त्यानी कवीना राजाश्रय दिला. **गीत गोविंद** लिहिलेले कवी जयदेव हे स्वतः सेने मध्ये होते. नालंदा, काशी, विक्रमशील, उजैनी इत्यादी प्राचीन शिक्षण केंद्राना त्यानी प्रोत्साहन दिले.

**कला आणि वास्तू शिल्प :** रजपूत काळातील कला व शिल्पकला अतिशय समृद्ध होती. त्यानी बांधलेली कलात्मक देवालये, सुंदर राजवाडे आणि मजबूत किल्ले आम्ही आजही पाहू शकतो. देवालयामध्ये खजूराहो येथील कंडराय महादेव मंदिर, अबू पर्वतावरील **दिलवारा** मंदिर प्रसिद्ध आहेत. राजवाडयामध्ये गुलाबी शहर जयपूरातील हवामहल, उदयपूरातील भव्य राजवाडा प्रसिद्ध आहेत. किल्लयामध्ये मध्य प्रदेशातील ग्वालीयर किल्ला मोठ्या कल्पकतेने बांधला आहे. म्हणूनच त्याला **भारतीय किल्लयांच्या गळ्यातील ताईत** असे म्हणतात.

©KTBS Not to be republished



**ग्वालीयर किल्ला**



**हवामहल, जयपूर**

रजपूत राजानी भित्ती चित्र तसेच विशेष रंगचित्राना प्रोत्साहन दिले. कलाकारानी देवालय, महल, भित्ती तसेच पुस्तकामध्ये अलंकार चित्रे रंगविली.

खिस्त शकाला पर्याय म्हणून अलिकडे **सामान्य शक** (सा. श.) याचा वापर करत आहेत. खिस्त पूर्व ऐवजी सामान्य शक पूर्व (सा.श.पू.) असा वापर करत आहेत. निधर्मी दृष्टीने या पद्धतीचा वापर करत आहेत.

©KTBS Not to be republished

## कलागणना (सा.श.)

| | | |
|---|---|---|
| रजपूतांचा काळ | : | 650-1200 |
| नागभट्ट | : | 8 वे शतक |
| भोज | : | 9 वे शतक |
| धर्मपाल | : | 8-9 वे शतक |
| चौहान | : | 12 वे शतक |

## नवीन शब्द

1. चिकणी चित्रकला - केसांच्या सहाय्याने काढलेली लहान चित्रे. ही चित्रे सुक्ष्मपणे काढलेली असतात.
2. भित्ती चित्र - भिंतीवर काढलेली चित्रे.

## I रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून पूर्ण करा.

1. अरबांच्या आक्रमणापासून भारताचे रक्षण करणारा प्रतीहार राजा________होय.
2. पालांचा अंत करणारा सेन वंशाचा राजा________होय.
3. पृथ्वीराज चौहानची ________ही राजधानी होती.

## II उत्तरे लिहा.

1. प्रमुख रजपूत घराणी लिहा.
2. प्रतिहार घराण्यातील प्रसिद्ध राजा कोण?
3. पृथ्वीराज चौहान बध्दल माहिती लिहा.
4. राणा कुंभाचे योगदान लिहा.
5. रजपूतांच्या काळात कोणत्या वस्तूंची निर्यात होत होती?
6. उंटाची जत्रा कोठे भरते?
7. रजपूत काळातील प्रसिद्ध साहित्य कृती लिहा.
8. रजपूतानी प्रोत्साहन दिलेली प्राचीन शिक्षण केंद्रे कोणती?
9. रजपूतांच्या काळातील प्रमुख देवालये व राजवाड्यांची नावे लिहा.

©KTBS Not to be republished

**III खालील प्रश्नांची गटात चर्चा करुन उत्तरे लिहा.**

1. पृथ्वीराज चौहान बध्दल टीपा लिहा.
2. राणा कंबनचे योगदान.

**IV खालील अ व ब यादीतील विषयांचा संबंध जूळवून लिहा.**

| अ | ब |
|---|---|
| चांद् बरदाई | गीत गोविंद |
| खोम्माण | पृथ्वीराज रासो |
| जयदेव | उंटाची जत्रा |
| गुलाबी शहर | बाप्पा रावळ |
| पुष्कर | जयपूर |

**उपक्रम :**

1. रजपूतानी निर्माण केलेली देवालये, राजवाडे आणि किल्ल्यांची चित्रे वर्णनासह संग्रह करा.
2. रजपूतांच्या काळातील प्रसिद्ध वास्तूशिल्प केंद्रे नकाशात ओळखा.
3. रजपूत काळातील साहित्यिक व त्यांच्या साहित्य कृती यांची यादी करा.

* * * * *

©KTBS Not to be republished

| पाठ 6 | शासन |
|---|---|

## पाठाचा परिचय

या पाठामध्ये शासनाचा अर्थ, शासनाचे प्रकार, लोकशाही सरकार, सर्वाधिकार सरकार आणि समतावादी सरकार या बध्दल माहिती दिलेली आहे.

## सामर्थ्ये

1) शासनाचा अर्थ ग्रहण करणे.
2) शासनाचे प्रकार अर्थ ग्रहण करणे.
3) लोकशाही सरकार बद्दल माहिती करून घेणे.
4) सर्वाधिकार सरकार बद्दल अर्थ ग्रहण करणे.
5) समतावादी सरकारची समानता व्यवस्थेची माहिती करून घेणे.
6) तिन्ही सरकारमधील फरक ओळखणे.

Not to be republished ©KTBS

## 3:1 लोकशाहीचा अर्थ

एका देशातील लोकांना सुख, शांती आणि समृद्ध जीवन जगण्यासाठी एका व्यवस्थीत राज्यकारभाराची आवश्यकता असते. असा व्यवस्थीत, नियमानुसार राज्यकारभार चालविण्याचे अधिकार प्राप्त झालेल्या संस्थेला शासन असे म्हणतात. ही संस्था जनतेला अनुकुल असलेल्या कायद्यांची रचना करून त्याची अंमलबजावणी करण्याची आणि शांतता प्रस्थापित करण्याची जबाबदारी घेते.

## 3:1 सरकारचे प्रकार

सरकारचे बरेच प्रकार आहेत. त्यातील काही खालील प्रमाणे आहेत.

1) लोकशाही सरकार 2) सर्वाधिकार सरकार 3) समतावादी सरकार

**1) लोकशाही सरकार :** लोकशाही हे एक प्रकारचे सरकार आहे. येथे जनतेकडून निवडून दिलेल्या प्रतिनिधी मार्फत चालविलेले राज्य म्हणजेच लोकशाही सरकार असे म्हणतात. जनतेच्या पाठींब्याने जनताच सरकार होऊन राज्य कारभार चालवित असल्यामुळे याला लोकांचे सरकार सुद्धा म्हणतात. आपल्या प्रतिनिधींची निवड करण्याचे स्वातंत्र्य लोकांना आहे. हेच लोकशाहीचे गमक आहे. खऱ्या अर्थाने

लोकशाहीने व्यक्तीला अगत्य असलेले व्यक्ती स्वातंत्र्य, मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र, संघ संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य याची खातर जमा करून सरकार सोबत व्यक्तीगत संबंध प्रस्थापित करण्याची व्यवस्था आहे. लोकशाहीची लोकप्रिय व्याख्या अशी आहे. लोकांकडून, लोकांच्यासाठी आणि लोकांनी चालविले गेलेले राज्य म्हणजेच लोकशाही.

## लोकशाही सरकारची तीन अंगे आहेत

1) शासकांग 2) कार्यांग 3) न्यायांग

1)शासकांग हे शासन किंवा कायद्यांची रचना करण्याचे कार्य करते. कार्यांग हे शासकांगाने तयार केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करते आणि न्यायांग हे न्याय निवाडा करून निर्णय देते.

## लोकशाहीची मूळ तत्वे

1. **स्वातंत्र्य** स्वातंत्र्य हा लोकशाहीचा प्राण आहे. प्रजेने मुक्तपणे आपले विचार व्यक्त करणे, सरकारामध्ये भाग घेणे, आपल्या देशात संचार करणे, सभा समारंभात भाग घेण्यास आणि इतर स्वातंत्र्य असतात.

2. **समानता** लोकशाहीत सर्वांना समान स्थान असते. प्रत्येकाला समान संधी असते. धर्म, जात, पंथ, भाषा, लिंग आणि गरिबी श्रीमंती असा भेदभाव न करता समानतेने पाहिले जाते.

3. **एकता** प्रादेशिक भिन्नता, भाषा भिन्नता, धार्मिक भिन्नता अशा आणखी काही भिन्नता न मानता आम्ही सर्व एक आहोत अशी एकतेची भावना लोकशाहीत बंधुतेची भावना प्रोत्साहीत करते.

4. **जनतेचे कल्याण** राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्रात प्रगती साधून लोकाच्या आवश्यकता पूरवून सुखी राज्य निर्माण करणे हे लोकशाहीचे मुख्य धेय आहे.

5. **लोकांचे सरकार** लोकशाहीत जनतेचे सरकार असते. वेळोवेळी होणाऱ्या निवडणूकीद्वारे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत कारभार चालविला जातो. सामान्यपणे लोकांच्या ईच्छेनुसार कारभार चालविला पाहिजे. नाहीतर पुढील निवडणूकीत अधिकार गमावू शकतो.

©KTBS Not to be republished

**6. बहूमताचे सरकार** लोकशाहीत एकापेक्षा जास्त राजकीय पक्ष निवडणूकीत भाग घेतात. त्यामध्ये बहुमत मिळविलेला पक्ष सरकार स्थापन करून कारभार चालवतो.

**7. सार्वजनिक टीकेला संधी** लोकशाहीने लोकाना आपली मते व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. यामुळे सरकारची नीती, नियम आणि कार्याचे परिशीलन करून टीकेचा हक्क लोकाना आहे. यामुळे सरकार योग्यप्रकारे कार्य करते. एवढेच नाही तर सार्वजनिक अभिप्रायाला लोकशाहीत महत्व आहे.

**8. अधिकार केंद्रीकरण** अधिकार केंद्रीकरण हे लोकशाहीचे आणखी एक तत्व आहे. अधिकार केंद्र, राज्य आणि स्थानिक सरकारामध्ये विभागला आहे. अधिकार केंद्रीकरणामुळे लोकांच्या अभिप्रायाला पुढे येण्यास वेळ लागतो. खालच्या पातळीपर्यंत अधिकार येण्यास कठीण जाते.

**9. प्रौढ मतदान पद्धत** लोकशाही मार्गाने सरकार रचना करण्यास निवडणूका गरजेच्या आहेत. प्रौढ मतदान पद्धतीद्वारे निवडणूका होतात. 18 वर्षापेक्षा जास्त वयाच्या लोकाना मतदान करण्याचा अधिकार आहे. याद्वारे उत्तम सरकारची स्थापना व्हावी हा लोकशाहीचा उद्देश असतो. तसेच आणखी काही लोकशाहीची लक्षणे आहेत.



मतदान कक्ष

© KTBS Not to be republished

## 2) सर्वाधिकार सरकार



सर्वाधिकार सरकार

ही लोकशाही सरकार व्यवस्थेच्या विरुद्ध असलेली सरकारी व्यवस्था आहे. संपूर्ण सरकार एक व्यक्ती किंवा एका लहान गटा मध्ये केंद्रित असते. कोणाचेही आणि कोणतेही निर्बंध नसलेली एका व्यक्तीच्या किंवा लहानशा गटाचा अभिप्राय हाच सर्वाधिकार सरकार व्यवस्था होय. लोकशाहीने स्वातंत्र्याचा मुद्दा पुरस्कृत केला तर सर्वाधिकार त्याला विरोध करते. सर्वाधिकारी स्वत:च्या इच्छेनुसार राज्यकारभार चालवू शकतो. अशा सरकार मध्ये न्याय, धर्म, अर्थिकबाबी, सामाजिक रितीरिवाज हे सर्व ईश्वराच्या आज्ञेने निर्धार करतात. त्याला प्रश्नविचारणे किंवा विरोध करण्याचा अधिकार लोकांना नाही. लोकांच्या मागण्या आणि आशा आकांक्षा पूर्ण केल्या पाहिजेत असा कोणताही कायदा नाही. न्याय अन्याय याचा निर्णय हा सर्वाधिकारी याचाच अंतिम निर्णय असतो.

जगातील वेगवेगळ्या भागामध्ये अति प्राचीन काळापासून निरकूंश सर्वाधिकार शासन असल्याचे दिसून येते.

उदाहरणार्थ : 16 व्या शतकात युरोप मध्ये आणि 18 व्या शतकात फ्रान्स, स्पेन, रशिया आणि इंग्लड देशात सर्वाधिकार सरकार होते.

©KTBS Not to be republished

## सर्वाधिकारची लक्षणे:

### 1. एक पक्ष, एक नेता आणि एकच राजकीय कार्यसूची

सर्वाधिकार व्यवस्थेत फक्त एक पक्षाला संधी असते. तो सर्वाधीकारी पक्ष असतो. दुसऱ्या पक्षाना, संघ संस्थाना कार्य करण्याची संधी नसते. त्यांचे अस्तित्व रद्द केलेले असते. सर्वाधिकाराला विरोध करण्याचा निर्णय अंमलात येत नाही.

**एक नेता** सर्वाधिकार सरकार एका व्यक्तीच्या नेतृत्वाखाली चालते. सर्वाधिकाऱ्यावर संपूर्ण विश्वास ठेवतात. सर्वाधिकारी राष्ट्राची एकतेचे प्रतिनिधीत्व करतो. सर्व निर्णय सर्वाधिकारीच घेतो. त्याचा निर्णय अंतीम असतो.

**1.एक राजकीय कार्यसूची** संपूर्ण राष्ट्राला एकच राजकीय कार्यसूची असते. ही सर्वाधिकारी पक्षाची मार्गसूची असते. त्यानुसार सर्वाधिकारी कारभार चालवितो.

**2. व्यक्ती स्वातंत्र्य असत नाही** सर्वाधिकार व्यवस्थेमध्ये व्यक्तीचे वैयक्तिक स्वातंत्र्य किवा हक्क नसतात. तेथील कायद्याला गौरव देणे व्यक्ती स्वातंत्र्य समजतो. लोकाना कोणत्याही प्रकारचे व्यक्ती स्वातंत्र्य, सभेत भाग घेण्याचे, संघ संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य नसते. सर्वाधिकार सरकारच्या कारभारावर टीका करण्याची संधी लोकांना नसते. लोकानी सर्वाधिकार सरकारचा कारभार स्वीकारावाच लागतो.

**3. राष्ट्रीयतेचे धृवीकरण** राष्ट्रीयतेला अधिक प्राधान्य दिले जाते. लोकांच्यात राष्ट्रीयतेची भावना निर्माण करून राष्ट्रप्रेम वाढवितात. राष्ट्रासाठी लोक कोणताही त्याग करण्यास तयार असले पाहिजे अशी सर्वाधिकार सरकारची अपेक्षा असते.

**4. एकाधिकारापती** सर्वाधिकार सरकार एकाधीपती असल्यामुळे लोक सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अंश नियंत्रीत करतो. राष्ट्राच्या विरुद्ध कोणीही रहात नाही. सर्वजण राष्ट्राबरोबर राहतात.

**5. जमात श्रेष्ठता** सर्वाधिकारी जमात श्रेष्ठता मानतात. जगात इतर देशात असलेल्या जमातीपेक्षा आपली जमात श्रेष्ट मानतात. उदा. हिटलर जर्मनाना जगातील इतर राष्ट्राच्या लोकापेक्षा श्रेष्ट समजायचा.

©KTBS Not to be republished

सर्वाधिकार लोकशाहीच्या विरुद्ध व्यवस्था असल्यामुळे दुसरे महायुद्ध झाले. बहूतेक आधुनिक राष्ट्रात लोकशाही कारभार चालतो.

## 3.3 समतावादी सरकार

समाजामध्ये उत्पन्नाचे मूळ असलेली जमीन, कामगारांचे श्रम, हे भांडवालदार लोकांना मिळाले असा सिद्धांत आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या शक्तीनुसार काम करून आपल्या आवश्यकतेनुसार प्राप्त करून घेण्याचे तत्व प्रतिपादन केलेल्या सरकारची व्यवस्था म्हणजेच समतावादी सरकार असे म्हणतो. येथे खाजगी संपत्तीला संधी नसते. समानता या तत्वावर आधारीत असलेला समतावाद, समाजामध्ये गरीब, श्रीमंत, वरचा खालचा असा भेदभाव नसलेला मानवतावाद व्यवस्था आहे. खाजगी संपत्ती मध्ये श्रीमंत आणि गरीब या मधील अंतर वाढून असमानता निर्माण होते. ही असमानता पुढे गरीब श्रीमंत याच्या मध्ये संघर्ष निर्माण करते. शेवटी बहु संखेने असलेल्या कष्टकरी लोकांचा विजय होतो. त्यावेळी कोणताही भेदभाव नसलेला समानतेचा समाज निर्माण होतो. तेथे सर्वजण सर्वांसाठी कष्टकरण्याची संस्कृती सर्वांच्या मध्ये निर्माण होऊन प्रत्येकजण सुखी होण्यासारखी व्यवस्था निर्माण होते. हेच समतावादी सिद्धांतांचे सार आहे. या सिद्धांताचा जनक जर्मनीचा तत्वज्ञानी कार्ल मार्कस होय.

### समतावादाची लक्षणे

समतावादाची काही गुणलक्षणे आहेत. ती खालील प्रमाणे .

1. **संपत्ती समुदायाच्या हातात असते** उत्पादनाला आवश्यक जमीन, कार्मिकाचे श्रम आणि भांडवल खासगी व्यक्तीकडे असल्यामुळे शोषण होते. प्रत्येक व्यक्तीने आपल्या सामर्थ्यानुसार कमविले पाहिजे व त्याच्या गरजेनुसार खर्च केले पाहिजे हे समातावादाचे तत्व आहे.

2. **समानता** समतावादात प्रत्येकाला सगळया रित्तीने समान मानतात. वर्ग, जात, धर्म, वर्ण आधारावर भेदभाव न करता सर्वाना समान मानतात.

3. **वर्गरहीत समाज** समतावादात गरिब श्रीमंत असा भेदभाव नसतो. वर्गरहीत समाज निर्माण करतात. कमवता वर्ग एकच असला पाहिजे हे समतावादाचे तत्व आहे.

©KTBS Not to be republished

4. **कामगाराना अधिकार** खासगी संपत्ती अस्तित्वात राहिल्यास पुढे लाभासाठी शोषण होऊन वर्ग निर्माण होतात. गरिब श्रीमंत संघर्ष होतो व शेवटी अधिकार संख्येने जास्त असलेल्या कामगाराना मिळतो.

5. **क्रांतीकारी बदल** समतावादी व्यवस्थेत समाजातील बदल तीव्रगतीने होतात. तेव्हा प्रत्येकाला समान राजकीय, आर्थिक आणि सामाजिक संधी प्राप्त होते. सर्वजण सुख, समाधानाने जीवन जगतात.

एकूण समतावाद मानवपर सरकारी व्यवस्था आहे. प्रत्येकाला समानतेने शोषणमुक्त जीवन जगता येते.

## गटात चर्चा करून उत्तरे द्या.

1)शासन म्हणजे काय ?

2)शासनाच्या प्रकारांची नावे लिहा ?

3)लोकशाही म्हणजे काय ?

4)सर्वाधिकार सरकारचा अर्थ लिहा.

5)समतावाद सरकार म्हणजे काय ?विवरण करा.

## कृती

लोकशाही, सर्वाधिकार सरकार, आणि समतावाद सरकार यांच्या मधील फरकाची चर्चा करा.

* * * * *

©KTBS Not to be republished

| पाठ 7 | केंद्र सरकार, राज्य सरकार, न्यायांग |
|---|---|

**पाठाचा परिचय**

या पाठात केंद्र सरकारच्या शासकांग आणि कार्यांगाची रचना, व्याप्ती यांचा परिचय दिला आहे. संसद सदस्याची पात्रता व कार्ये, राष्ट्रपतींची पात्रता व त्यांची कार्ये, मंत्रीमंडळाची रचना व त्यांची कार्ये या संबंधीची माहिती देण्यात आली आहे.

**सामर्थ्ये :**

1 केंद्र सरकारची रचना व कार्य याबद्दल समजून घेणे.
2 शासकांग आणि कार्यांग यांची रचना व त्यांचे अधिकार याबद्दल चिंतन करणे.
3 लोकसभा आणि राज्यसभा यांची रचना व कार्य पद्धती समजून घेणे.
4 राष्ट्रपती आणि पंतप्रधान याचे अधिकार, कार्ये याची माहिती समजून घेणे.

©KTBS Not to be republished

**भारताची एकात्मता :** आपल्या देशात कर्नाटकासह 29 राज्ये, 6 केंद्र शासित प्रदेश आहेत. या सर्वांचे मिळून भारत एक संघराज्य बनले आहे. या संघराज्याचे सरकार म्हणजे केंद्र सरकार होय. या केंद्रसरकारची तीन अंगे आहेत.

**शासकांग :** शासन अथवा कायद्यांची रचना करणे हे त्याचे प्रमुख कार्य होय. त्याच प्रमाणे कार्यांगाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करते.

**कार्यांग :** हे शासकांगाने तयार केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करते.

**न्यायांग :** न्याय निवाडा करुन निर्णय देते.

## केंद्रीय विधीमंडळ (शासकांग)

केंद्रीय विधिमंडळाला (शासकांगाला) 'संसद' अथवा 'पार्लिमेंट' असे म्हणतात. भारतीय संसद ही राष्ट्रपती आणि दोन सभागृहे मिळून बनलेली आहे. ही दोन सभागृहे म्हणजे 'लोकसभा' आणि 'राज्यसभा' होत. संसदेची सभा ही दिल्ली येथील 'संसद भवनात' (पार्लिमेंट हाऊस) मध्ये भरते. येथे संसदेचे प्रतिनिधी चर्चा, विचार विनिमय करुन संपूर्ण देशाला उपयुक्त असे कायदे तयार करतात.

**लोकसभा :** लोकसभेला संसदेचे 'कनिष्ठ गृह' म्हणतात. मतदानाद्वारे 18 वर्षापेक्षा अधिक वय असलेली भारतीय प्रजा मतदानाद्वारे लोकसभेच्या सदस्यांची निवड करतात. सदस्य संख्या जास्तीत जास्त 552 आहे.

**लोकसभेचे सदस्य :** या सदस्यांचा अधिकारावधी 5 वर्षाचा असतो. लोकसभेचे सदस्य कितीही वेळा निवडणूक लढवू शकतात. पाच वर्षाचा कालावधी संपल्यानंतर लोकसभेचे विसर्जन होते.

**लोकसभेच्या सदस्याची पात्रता :** (1) लोकसभेचा सदस्य होऊ इच्छिणारी व्यक्ती भारताचा नागरिक असावी. (2) किमान वय 25 वर्षे असावे. (3) न्यायालयाकडून तुरुंगवासाची शिक्षा झालेली नसावी (4) ती व्यक्ती दिवाळखोर असू नये म्हणजेच आर्थिक दृष्ट्या सर्व गमावलेली असू नये.

**लोकसभेचे अध्यक्ष:** लोकसभेचे सदस्य आपल्या पैकी एकाची लोकसभेचे अध्यक्ष (स्पीकर) म्हणून निवड करतात. लोकसभेच्या अध्यक्षाचे कार्याधिकार पुढील प्रमाणे आहेत. लोकसभा भवनात चर्चा करावयाचे विषय ठरविणे. सदनामधील शिस्त, शांती, आणि संयम पाळणे. नियमानुसार लोकसभेचे कामकाज चालविणे व निर्णय घेणे.

**राज्यसभा :** राज्यसभा म्हणजे संसदेतील 'वरीष्ठ गृह' होय. राज्यसभेच्या सदस्यांची संख्या 250 असते. या सभेतील सदस्याची निवड जनतेकडून होत नाही. यातील 238 सदस्याची निवड सर्व राज्यांच्या विधानसभेच्या सदस्याकडून केली जाते. 12 सदस्यांची निवड राष्ट्रपती राज्य सभेसाठी नामनिर्देशित करतात.

**राज्यसभा सदस्य :** राज्यसभेचा सदस्य होऊ इच्छिणारी व्यक्ती भारताचा नागरिक असावी. वयाने किमान 30 वर्षाची असावी. राज्यसभेच्या सदस्याचा अधिकारावधी सहा वर्षाचा असतो. भारताचे उपराष्ट्रपती राज्यसभेचा अध्यक्ष असतो.

**संसद सदस्यांचे हक्क :** लोकसभा व राज्यसभेच्या सदस्यांना खासदार (M.P. मेंबर ऑफ पार्लिमेंट) असे म्हणतात. याना संसदेत भाषण स्वातंत्र्य असते. यांनी संसदेच्या सभागृहात मांडलेले अभिमत किंवा विचारावर कोणत्याही न्यायालयात दाद मागता येत नाही.

**विरोधी पक्षनेत्याचे पात्र व कार्य :** सरकार मधील सत्ताधारी पक्ष जर काही चुकीचे निर्णय घेत असल्यास ते त्यांच्या निदर्शनास आणून देणे. सरकारच्या निती नियमांचा परामर्श घेणे. सरकार, मंत्रिमंडळ आणि अधिकाऱ्यांना सतर्क करणे. इत्यादी कार्ये विरोधी पक्षनेत्याने करायची असतात. त्यामुळे या नेत्याला मानाचे स्थान आहे.

©KTBS Not to be republished

युद्ध करण्याचे आदेश देण्याचा अधिकारही राष्ट्रपतींना असतो. 4) उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो. 5) अपराध्याला न्यायालयाकडून मिळालेली शिक्षा रद्द करण्याचा किंवा क्षमा करण्याचा तसेच ती कायम राखण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो.

**उपराष्ट्रपती :** केंद्रातील संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सभासद उपराष्ट्रपतींची निवड करतात. भारताचा उपराष्ट्रपती होण्यास किमान 35 वर्षे वय असावे आणि राष्ट्रपती होण्यासाठीच्या आवश्यक सर्व अटी, पात्रता, त्यांच्याकडे असल्या पाहिजेत. यांचा अधिकारावधी पाच वर्षांचा असतो. ते राज्यसभेचे अध्यक्ष असतात. राष्ट्रपतींच्या गैर हजेरीत त्यांच्या कार्याची जबाबदारी उपराष्ट्रपती सांभाळतात.

## पंतप्रधान

**पंतप्रधानाचे महत्व:** संसदीय राज्यकारभार व्यवस्थेत पंतप्रधानाचे पात्र फार महत्वाचे असते. देशाच्या संरक्षणाची फार मोठी जबाबदारी त्यांच्याकडे असते. पंतप्रधान-

1 लोकसभेचे नायक असतात.
2 मंत्र्यांच्या खातेवाटपाचे अधिकार त्याना असतात.
3 मंत्रीमंडळाची पुनर्रचना करण्याचा अधिकार असतो.
4 विविध इलाख्याच्या मंत्र्यांची नेमणूक करण्यासाठी राष्ट्रपतींना शिफारस करतात.
5 मंत्र्यांना पदच्चुत करण्यासाठी राष्ट्रपतीकडे शिफारस करु शकतात.

### हे तुम्हाला माहित असू दे.

1 नवी दिल्ली येथील संसद भवन, राष्ट्रपती भवन, सचिवालय, मंत्रालय इत्यादी आकर्षक इमारती इंग्रजांच्या काळात निर्माण केल्या आहेत. इ.स. 1929 साली 340 खोल्या असलेल्या राष्ट्रपती भवनाचे काम पूर्ण करण्यात आले.

### गटात चर्चा करुन उत्तरे द्या.

1 केंद्र सरकारची तीन अंगे कोणती ? त्यांची कार्ये कोणती ?
2 लोकसभेचा सदस्य होण्यासाठी कोणती पात्रता असावी लागते ?
3 भारतीय गणराज्याचा सर्वोच्च अधिकारी कोण ?

### उपक्रम

1 तुमच्या शाळेत लोकसभेच्या कार्याचे प्रात्यक्षिक सादर करा.
2 भारताच्या पंतप्रधानांची यादी तयार करुन शाळेत प्रदर्शित करा.

Not to be republished ©KTBS

## भारताची अखंडता

## 29 राज्ये व 6 केन्द्रशासित प्रदेश
## (राज्यांची राजधानी कंसात दिलेली आहे)

**राज्य**

1 आंध्र प्रदेश (हैदराबाद)
2 अरुणाचल प्रदेश (इटानगर)
3 आसाम (दिसपूर)
4 बिहार (पटना)
5 गोवा (पणजी)
6 गुजरात (गांधीनगर)
7 हरियाणा (चंदीगड)
8 हिमाचल प्रदेश (सिमला)
9 जम्मू आणि काश्मीर (श्रीनगर-उन्हाळा, जम्मू-हिवाळा)
10 कर्नाटक (बेंगळूरु)
11 केरळ (तिरुवनंतपुर)
12 मध्य प्रदेश (भोपाळ)
13 महाराष्ट्र (मुंबई)
14 मणीपूर (इंफाळ)
15 मेघालय (शिलाँग)
16 मिझोरम (आइझोल)
17 नागालैंड (कोहीमा)
18 ओरीसा (भूवनेश्वर)
19 पंजाब (चंदीगड)
20 राजस्थान (जयपुर)
21 सिक्कीम (गंगटोक)
22 तामिळनाडू (चेन्नई)
23 त्रिपुरा (अगरतला)
24 उत्तर प्रदेश (लखनौ)
25 पश्चिम बंगाल (कोलकाता)
26 छत्तीसगड (रायपूर)
27 झारखंड (रांची)
28 उत्तरांचल (डेहराडून)
29. तेलंगाणा (हैदराबाद)

**केंद्रशासीत प्रदेश**

1 अंदमान आणी निकोबार द्वीप (पोर्टब्लेअर)
2 चंदीगड (चंदीगड)
3 दादर आणि नगर हवेली (सिल्वारा)
4 दमन आणि दीव (दमन)
5 लक्षद्वीप (कवरत्ती)
6 पाँडीचेरी (पाँडीचेरी)
7 दिल्ली-राष्ट्रीय राजधानी (दिल्ली)

©KTBS Not to be republished

## 16.2 राज्य सरकार

या पाठात राज्य सरकारच्या शासकांग, कार्यांग आणि न्यायांग याचा परिचय दिला आहे. त्याचबरोबर द्विसदन पद्धत, वरीष्ठ गृह आणि कनिष्ट गृह यांचे विवरण दिले आहे. आमदारांची पात्रता व त्यांची कार्ये आणि मुख्यमंत्री तसेच राज्यपालांची पात्रता व अधिकार या संबंधित विवरण येथे केले आहे.

### सामर्थ्य

1 राज्य सरकारची रचना व कार्य समजून घेणे.

2 राज्य सरकारच्या कार्याची व्याप्ती समजून घेणे.

3 राज्यपालाची पात्रता तसेच अधिकार आणि मुख्यमंत्र्यांचे अधिकार आणि कर्तव्ये समजून घेणे.



**विधानसभेचे अधिवेशन**

विधानसभा आणि विधान परिषद मध्ये कायदे तयार करतात. (शासकांग)

©KTBS Not to be republished



**विधानसौध-येथून राज्याचा कारभार चालविला जातो (कार्यांग)**



**कर्नाटक उच्च न्यायालय, बेंगळूरु येथे न्यायनिवाडा केला जातो (न्यायांग)**

राज्यात राज्य सरकार आहे. याच्या अधिकाराची व्याप्ती केंद्र सरकारपेक्षा कमी आहे. परंतु त्यांना आपले स्वतःचे अधिकार आणि स्वायत्तता आहे. राज्यांची रचना भाषावर झाली आहे. कर्नाटकात कन्नड ही राज्य भाषा आहे.

आपल्या संविधानामध्ये सर्व राज्याचा कारभार एकाच पद्धतीने चालावा अशी रचना केलेली आहे. राज्यसरकारची रचना सामान्यपणे केंद्र सरकारच्या नमुन्या प्रमाणेच आहे.



**सुवर्णसौध, बेळगावि**

©KTBS Not to be republished

## राज्य शासकांग

शासकांग (कायदेमंडळ), कार्यांग (कार्यकारी मंडळ) आणि न्यायांग राज्याच्या शासन यंत्रणेत राज्यपाल आणि विधानसभा व विधान परिषद यांचा समावेश असतो. शासकांग हे राज्याचे कायदे तयार करते.

## विधानसभा (कनिष्ठगृह)

**रचना :** विधानसभा ही सार्वत्रिक निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींची मिळून बनते. कर्नाटक विधानसभेमध्ये एकूण 224 सदस्य आहेत.

विधान सभेचे सदस्य आमदार (एम.एल.ए.) आपल्या पैकी एकाला सभापती (स्पीकर) म्हणून निवडतात. विधान सभेचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. ही कायम स्वरूपी सभा नाही. विधान सभा सदस्याची पात्रता पुढील प्रमाणे असावी.

- ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी.
- किमान 25 वर्षे वयाची असावी.
- सरकारमधील कोणत्याही लाभदायक पदावर असू नये.
- दिवाळखोर असू नये.

### विधान सभेचे अधिकार आणि कार्ये

- वास्तविकपणे विधानसभा हे राज्याचे शासकांग आहे.
- सर्वप्रकारच्या अर्थ विधेयकांच्या बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार विधान सभेला असतो.
- मुख्यमंत्र्यासह राज्याच्या मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य विधानसभा करते. मंत्रिमंडळ तसेच एखाद्या मंत्र्याचे कार्य असमाधानकारक वाटत असेल तर त्यावर अविश्वास ठराव मांडून बहुमत सिद्ध केल्यास संबंधित मंत्र्याचे पद तसेच मंत्रिमंडळ बरखास्त होऊ शकते.
- विधान सभेचे सदस्य राष्ट्रपतीच्या निवडणूक प्रक्रियेत भाग घेऊ शकतात.

## विधान परिषद (वरिष्ठ सभागृह)

**रचना :** विधान परिषदेच्या सदस्यांची (एम.एल.सी) संख्या विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या 1/3 पेक्षा जास्त असू नये. कर्नाटकच्या विधान परिषदेची सदस्य संख्या 75 आहे. काही सदस्यांना राज्यपाल नामनिर्देशित करतात. विधानसभा

©KTBS Not to be republished

सदस्याव्यतिरिक्त स्थानिक संस्था, नोंदणी केलेले पदवीधर आणि शिक्षक विधान परिषदेच्या सदस्याची निवड करतात.

विधान परिषद सदस्यांचा अधिकारावधी सहा वर्षाचा असतो. या सदस्याचे वय किमान 30 वर्षे असले पाहिजे.

## राज्य कार्यांग

राज्याच्या कार्यांगात राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ यांचा समावेश असतो. सामान्यपणे याची रचना व कार्ये केंद्रीय कार्यकारीमंडळ (कार्यांग) यासारखीच असतात.

## राज्यपाल

राज्यपाल हा फक्त संविधानाप्रमाणे कार्यांगाचा प्रमुख असतो. परंतु मुख्यमंत्री हाच राज्य कार्यांगाचा प्रमुख असतो. राज्यपालाची नेमणूक राष्ट्रपती करतात. राज्यपालांचा अधिकारावधी पाच वर्षाचा असतो.

**राज्यपालाची पात्रता :** ● ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी. किमात 35 वर्षे वयाची असावी ● ती व्यक्ती संसदेचा किंवा विधान सभेचा सदस्य नसावी.

**राज्यपालांचे अधिकार :** ● राज्यपाल मुख्यमंत्र्याची नेमणूक करतात व त्यांच्या सल्ल्यानुसार इतर मंत्र्यांची नेमणूक करतात. ● विधिमंडळाकडून संमत झालेल्या विधेयकांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यपालाची संमती असणे आवश्यक आहे. ते स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार त्यांना आहे. ● राज्यात अराजकता माजल्यास त्याचा अहवाल राष्ट्रपतींना कळवून राज्य सरकार बरखास्त करु शकतात.

● अशा अहवालांचे परिशीलन करुन राष्ट्रपती राज्यसरकार बरखास्त करतात राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करतात. या काळात राज्यकारभाराचा सर्वाधिकार राज्यपालांना असतो. तेच राज्यकारभार चालवितात.

## राज्याचे मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ

राज्यात मुख्यमंत्री हा राज्याचा प्रमुख असतो. विधानसभा निवडणुकीमध्ये बहुमत मिळविलेल्या पक्षाच्या नेत्याची राज्यपाल मुख्यमंत्री पदावर नेमणूक करतात.

©KTBS Not to be republished

## मुख्यमंत्र्याचे अधिकार आणि कर्तव्ये

- मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार राज्यपाल मंत्र्यांची नेमणूक करतात.
- मंत्र्यांचे खातेवाटप करण्याचा व ती बदलण्याचा अधिकार मुख्यमंत्र्याना आहे.
- मंत्र्याला पदच्यूत करण्याचा किंवा त्या पदावरुन काढून टाकण्याचा अधिकार मुख्यमंत्र्याना आहे.
- केंद्र आणि राज्य सरकारमधील संबंध उत्तम राखण्यासाठी मुख्यमंत्र्याची भूमिका फार महत्वाची आहे.

## गटात चर्चा करुन उत्तरे द्या.

1 लोकप्रतिनिधी असलेला शासकांगाचा विभाग कोणता ?

2 शिक्षक प्रतिनिधी कोणत्या सदनाचे सदस्य असतात ?

3 तुमच्या विधानसभा क्षेत्राचे आमदार कोण आहेत ?

4 तुमच्या जिल्हयाचे पालक मंत्री कोण ?

5 मुख्यमंत्र्याचे प्रमुख अधिकार आणि कर्तव्ये कोणती ?

## उपक्रम

1 विधानसभा आणि विधानपरिषदेचे कामकाज तुमच्या वडिलधाऱ्यांच्या सोबत जाऊन पहा किंवा दूरदर्शनवर पहा.

2 शिक्षकांच्या मदतीने वर्गमंत्रीमंडळाची रचना करा.

## 16.3 न्यायांग

न्याय व्यवस्थे मध्ये सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयातील न्यायाधिशांची पात्रता आणि कार्य, त्याच बरोबर इतर कनिष्ठ न्यायालये तसेच लोक अदालत यांच्या कार्यांची माहिती दिली आहे.

### सामर्थ्य

1. राज्याच्या शासन व्यवस्थेत कायदा व न्यायव्यवस्थेची भूमिका जाणून घेणे.
2. भारताच्या न्यायव्यवस्थेबद्दल गौरव व्यक्त करतील.
3. विविध प्रकारच्या न्यायालया बाबत माहिती मिळविणे.

©KTBS Not to be republished

कायद्याप्रमाणे न्यायनिवाडा करण्याच्या व्यवस्थेला 'न्यायव्यवस्था' असे म्हणतात. कायदे आणि न्यायव्यवस्था राज्यकारभारामध्ये महत्वाची भूमिका बजावतात.

**न्यायालयाची कार्ये :** शासकांगाने (कायदे मंडळ) तयार केलेल्या कायद्याचा अर्थ व त्याचे स्पष्टिकरण करते. व्यक्ती व्यक्तीतील झगडा, व्यक्ती आणि सरकार यांच्यातील वादामध्ये न्यायनिवाडा करण्याचे कार्य न्यायालय करते. नागरिकांचे प्राण, संपत्ती मर्यादा आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याचे मुख्य कार्य न्यायालयाचे आहे. न्यायालये ही कार्यांग (कार्यकारीमंडळ) च्या दबावाला बळी न पडता ती स्वतंत्र व नि:पक्षपातीपणे आपले कार्य करतात.

## सर्वोच्च न्यायालय

आपल्या देशाच्या संविधानात देशाची एकता व अखंडता राखण्याच्या दृष्टीने संपूर्ण देशाला लागू होणाऱ्या न्याय व्यवस्थेची तरतूद केली आहे. सर्वोच्च न्यायालय हेच देशाचे अतिउच्च न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायलयात एक मुख्य न्यायाधीश आणि इतर 25 न्यायाधीश असतात. यांची नेमणूक राष्ट्रपती करतात. सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे आहे.



**सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली**

©KTBS Not to be republished

## उच्च न्यायालय

उच्च न्यायालय हे राज्यातील अतिउच्च न्यायालय होय. कर्नाटकाचे उच्च न्यायालय (हायकोर्ट) बेंगळूरु येथे आहे. उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीश असतात. आपल्या देशात एकूण 24 उच्च न्यायालये आहेत.



कर्नाटक उच्च न्यायालय, बेंगळूरु

© KTBS Not to be republished

### उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाची पात्रता

● तो भारताचा नागरिक असावा ● किमात 10 वर्षे भारतीय न्यायालयामध्ये वकिली केलेली असावी ● किंवा 10 वर्षे उच्च न्यायालयात वकिली केलेली असावी.

### विविध पातळीवरील न्यायालये

| | | |
|---|---|---|
| सर्वोच्च न्यायालय | - | राष्ट्रीय स्थर (नवी दिल्ली) |
| उच्च न्यायालय | - | राज्य स्थर |
| कनिष्ठ न्यायालये | - | जिल्हा न्यायालय, मॅजिस्ट्रेट न्यायालय, कनिष्ठ मैजिस्ट्रेट न्यायालय, लोक अदालत. |

## गटात चर्चा करुन उत्तरे द्या.

1 न्यायालयाची प्रमुख कार्ये कोणती ?
2 देशातील अति उच्च न्यायालय कोणते ?
3 उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाची पात्रता लिहा.

## उपक्रम

1 शाळेत न्यायालयाचे कार्य प्रात्यक्षिक रुपात सादर करा.

2 स्थानिक न्यायालयात जाऊन - वादविवादाचे निरीक्षण करा.

* * * * *

©KTBS Not to be republished

| पाठ 8 | मानव हक्क |
|---|---|

**पाठाचा परिचय**

या पाठात मानव हक्क म्हणजे काय? त्याची आवश्यकता, मानव हक्कांचे प्रकार, मुलांचे हक्क आणि मानव हक्कांच्या रक्षणाबद्धल विवरण केले आहे.

**सामर्थ्ये**

1. मानव हक्कांचा अर्थ समजून घेणे.
2. मानव हक्कांचे महत्व जाणून घेणे.
3. मानव हक्कांचे प्रकार समजून घेणे.
4. मुलांचे हक्क जाणून घेणे.

## मानव हक्कांचा अर्थ आणि प्रामुख्यता

मानवाला गौरवयुक्त जीवन जगण्यासाठी आणि आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करण्यासाठी सहाय्य होणाऱ्या संधींना मानव हक्क म्हणतात. सर्व मानवाना स्वतंत्रपणे जगण्यासाठी, समानतेचे जीवन जगण्यासाठी, आपले मत व्यक्त करण्यासाठी आणि गौरवपूर्ण जीवन जगण्यासाठी अनुकूल अशा संधीना 'मानव हक्क' असे म्हणतात. सर्व मानव जातीला स्वतंत्रपणे जगण्यासाठी योग्य आणि त्यांचा कोणत्या कारणासाठी, कोणत्या विषयासाठी निर्बंध नसतो. मानवी हक्कांची परिकल्पना नागरिकतेच्या विकासाबरोबर उदयास आली. मानवाला उत्तम जीवन जगण्यासाठी हक्क अती आवश्यक आहेत. प्रत्येक मानवाला गौरवपूर्वक जीवन जगण्यासाठी त्यांचे मूलभूत हक्क आहेत. इतकेच नाही तर मानव हक्क तारतम्य रहीत आहेत.

जगात प्रजासताक सरकार सत्तेत आल्यानंतर मानव हक्काना जास्त महत्व प्राप्त झाले. काही राष्ट्रानी आपल्या संविधानात मानव हक्कांच्या रक्षणासाठी मूलभूत हक्कांचा समावेश केला आहे. या विकासामुळे जनतेला मूलभूत हक्क अनुभवण्यासाठी संधी प्राप्त करून दिली आहे. नंतर झालेल्या दोन महायुद्धामुळे आणि सामाजिक

©KTBS Not to be republished

राजकीय आणि आर्थिक कारणामुळे मानवाचे शोषण वाढले आहे. याप्रमाणे राष्ट्रे प्रजेच्या गौरवपूर्वक जीवनासाठी योग्य मानदंड तयार करण्यास राष्ट्रे विचाराधीन झाली. याचा परिणाम म्हणजे आंतरराष्ट्रीय तज्ञाकडून तयार केलेल्या मानव हक्क 10 डिसेम्बर 1948 रोजी विश्व संस्थेच्या सामान्य सभेत स्वीकारण्यात आले.

## मानव हक्काचे प्रकार

विश्व संस्थेने स्वीकारलेचे मानव हक्क-प्रत्येक व्यक्तीला जन्मतः स्वातंत्र, समानता आणि अधिकार आहे. जात, धर्म, लिंग, वर्ण या वर आधारीत कोणताही भेदभाव करू नये. तसेच प्रत्येकाने दुसऱ्याबाबत बंधुतेची भावना बाळगली पाहिजे. प्रत्येकाने स्वतःला वेगळे आहोत असे समजू नये. कोणत्याही व्यक्तीला व्यंगचित्र काढून किंवा अमानवीय शिक्षा देऊन त्रास देऊ नये. कोणालाही बंधनात, दासत्व करण्यास किवा गुलाम म्हणून वागवू नये.

प्रत्येकाला अभिव्यक्ती व अभिप्राय व्यक्त करण्याचा अधिकार आहे. प्रत्येकाला विचार, आत्मसाक्षात्कार आणि धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क आहे. ईच्छेनुसार श्रद्धा, धर्म स्वीकारण्याचा व त्याचे आचरण करण्याचा अधिकार आहे. प्रत्येकाला शांततेने सभा घेण्याचा व संघटना करण्याचे स्वातंत्र्य आहे. परंतू कोणालाही संघटनेत सामील होण्यास बळजबरी करता येणार नाही. प्रत्येकाला आपल्या देशात स्थापन होणाऱ्या सरकारमध्ये प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्ष भाग घेण्याचे स्वातंत्र्य आहे.

**उद्योग करण्याचा हक्क** समान कामासाठी समान वेतन घेण्याचा हक्क, कामाचा कालावधी, पगार, पगारासह रजा घेण्याचा आणि विश्रांती घेण्याचा हक्क प्रत्येकाला आहे. आहार, वस्त्र, निवारा, आरोग्य, रक्षण आणि आवश्यक सामाजिक सेवा मिळविण्याचा हक्क आहे. तसेच प्रत्येकाला मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण घेण्याचा हक्क आहे.

## मुलांचे हक्क

मानव हक्कामध्ये मुलांच्या हक्कांचाही समावेश केलेला आहे. प्रत्येक मुलाला नैसर्गिकरित्या काही सुविधा आहेत. प्रत्येक मुलाला आपल्या बाल्यजिवन, आई वडीलाबरोबर राहण्याचा, संरक्षणाचा, आहार, शिक्षण आणि आरोग्य, सुविधा

©KTBS Not to be republished

मिळविण्याचा हक्क आहे. तसेच, जाती, लिंग, वर्ण, धर्म आणि अपंगत्वावर आधारित भेदभाव न करण्याचा हक्क मुलाना आहे. भारतीय संविधानात 14 वर्षाखालील मुलाना मोफत आणि सक्तीचे शिक्षण घेण्याची संधी आहे. शिक्षणाबाहेर असणारी मुले, बालकामगार म्हणून मुलांचा हक्क उल्लंघन होताना दिसते. बाल कामगार पद्दतीच्या मानव हक्कांचे उल्लंघन होत आहे. कूली कामगार उद्योग करण्याचा पध्दतीला बालकामगार पध्दत म्हणतात. शाळा शिक्षणापासून वंचीत, शाळाबाहय 14 वर्षाच्या आतील कोणत्याही आर्थिक मिळकत करणाऱ्या मुलांना कायद्यानुसार बालकामगार म्हणतात.

### बाल कामगार कायदा 1986

या कायद्याप्रमाणे 14 वर्षाच्या आतील मुलांना काम करण्याचा हक्क नाही. या कायद्याचे उलंघन करुन बाल कामगार ठेवणाऱ्या व्यक्तीला 3 महिन्यापासून 1 वर्षापर्यंत शिक्षा, दंड अथवा दोही शिक्षा होऊ शकतात.

### बाल कामगार पद्धतीला निषिद्ध असणारे व्यवसाय

रेल्वेला संबंधीत कामे, ऑटोमोबाईल वर्कशॉप, गॅरेज, माग, खाण व्यवसाय, विषारी वस्तू उत्पादन करणारे घटक, बार, हॉटेल, मनोरंजन स्थळे, सर्कस, काचउत्पादन, बिडी, पॉलीस, टायर, कार्पेट, सिमेंट, रंग, काडीपेटी, फटाके, साबण, शिसे, किटकनाशक, इत्यादी तयार करण्याच्या कारखाने अशा ठिकाणी काम करण्यास वापर केल्यास अपराध होय.





©KTBS Not to be republished

## मानव हक्कांचे रक्षण

यामप्रमाणे मानव हक्क, मुलांचे हक्क आणि महिलांचे हक्क मानव जीवनाला आवश्यक आहेत. पण मानव हक्कांचे उल्लंघन निरंतर घडत आहे. त्यासाठी त्याचे संरक्षण केले पाहिजे. विश्व पातळीवर मानव हक्क आयोग, राष्ट्रीय पातळीवर मानव हक्क आयोग आणि राज्य पातळीवर मानव हक्क आयोग मानव हक्कांचे उल्लंघन झाल्यास क्रम हाती घेते.

याला पुरक म्हणून सर्व सजीवाना उत्तम जीवन जगण्याचा आणि सुस्थिर परिसर आवश्यक आहे. तसेच उत्तम आरोग्य, निवारा, आहार, पाणी आणि सुंदर परिसराचे संरक्षण हा मानव हक्काचा भाग आहे. या साठी विश्वसंस्थेने 2012 मध्ये घोषणा करून या सर्वांचे रक्षण करण्याची जबाबदारी सर्व राष्ट्रावर सोपवली आहे.

## चर्चा करून उत्तरे लिहा.

1. मानव हक्क म्हणजे काय?
2. मानव हक्क का आवश्यक आहेत?
3. मानव हक्कांचे प्रकार लिहा.
4. मुलांचे हक्क कोणते?
5. मानव हक्कांचे रक्षण करणारे आयोग कोणते?

## उपक्रम

1. मुलांच्या हक्का बाबत चर्चास्पर्धा आयोजित करा.
2. मुलाना त्यांच्या हक्कांचे उलंघन झाल्याचे समजून एका संघटनेला कळविण्यास सांगा.

* * * * *

©KTBS Not to be republished

# पाठ 9 यूरोप - आशियाचे पर्यायी व्दीप

**पाठाचा परिचय**

या पाठात युरोप खंडाचे स्थान, विस्तीर्ण, भौगोलिक रचना, नैसर्गीक आणि हवामानाचे विभाग, वनस्पती, शेती, दुग्धव्यवसाय आणि मासेमारी, खनिज संपती आणि उद्योगधंदे व लोकसंख्या वाढ, विभागणी. लोकसंख्येची घनता याबद्दल माहिती दिली आहे.

**सामर्थ्य**

1 युरोपचे स्थान, क्षेत्रफळ आणि भौगोलिक रचना याबद्दल माहिती समजून घेणे.
2 युरोप खंडाचे नैसर्गीक आणि हवामानाचे विभाग समजून घेणे.
3 वनस्पती वर्गावर हवामानाच्या होणाऱ्या प्रभावाबद्दलची तुलना करणे.
4 खनिज संपत्तीवर यूरोपातील उद्योगधंदे अवलंबून आहेत हे ओळखणे.
5 यूरोपमधील लोकसंख्येची असमान विभागणी, लोकसंखेची घनता आणि स्थलांतरावर नियंत्रण ठेवणाऱ्या गोष्टी बद्दल समजून घेणे.

©KTBS Not to be republished

**प्रस्तावना :** जगातील दाट लोकवस्ती आणि शहरीकरण झालेल्या भूखंडामध्ये यूरोप एक खंड आहे. समृद्ध आणि औद्योगीकरण झालेला खंड आहे. विस्ताराच्या दृष्टीने जगात सहावा क्रमांक लागतो. हा अनेक भाग असलेला आणि वैविध्यपूर्ण भौगोलीक रचना असणारा, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकिय वर्चस्व मिळविले आहे. युरोप खंड अनेक लहान मोठे 56 देश मिळून बनलेला आहे.

## 1. स्थान, विस्तार आणि भौगोलीक रचना

**स्थान :** यूरोप खंड 10° पश्चिमे पासून 60° पूर्व रेखांशापर्यंत आणि 36° उत्तरेपासून 72° उत्तर अक्षांशापर्यंत पसरलेला आहे.

**विस्तार :** यूरोप हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा लहान खंड आहे. त्याचा एकूण विस्तार 10.4 मिलीयन चौ.कि.मी. इतका आहे. हा भारताच्या विस्तारापेक्षा तीन पटीने मोठा आहे. या खंडाने पृथ्वीच्या एकूण विस्तारापैकी 7% भाग व्यापलेला आहे. परंतु जगातील लोकसंख्येमधील 1/4 लोकसंख्येएवढी आहे.

**भौगोलीक रचना :** यूरोप खंड आशिया खंडाचा पर्यायी द्विप असून या खंडाच्या तिन्ही बाजूने पाणी आहे. उत्तरेला बेरेंट समुद्र पश्चिमेला अटलांटीक महासागर आणि दक्षिणेला मेडीटरेनियन समुद्रांनी वेढलेला आहे.




जगात युरोपचे स्थान




यूरोपचे स्थान, विस्तार आणि भौगोलिक रचना

©KTBS Not to be republished

यूरोप खंडाच्या पूर्वेला आशिया खंड असून तो उरल पर्वत, ककासस पर्वत आणि कॅस्पीयन समुद्र यामुळे यूरोप खंडापासून वेगळा झाला आहे. यूरोप खंडाच्या दक्षिणेला आफ्रिका खंड आहे.

परंतू वर उल्लेख असल्याप्रमाणे भौगोलीक स्वरूपावरुन यूरोप आणि आशिया खंडामधील सिमाभाग निश्चीत नाही. म्हणून याला ''यूरेशिया'' या एकाच नावाने ओळखले जाते.

## 2. भौगोलीक परिस्थिती

यूरोप हा वैशिष्टयपूर्ण भौगोलीक परिस्थितीने बनलेला खंड आहे. या खंडाच्या पश्चिम आणि दक्षिण भागामध्ये बर्फाच्छादीत शिखरांचे पर्वत, दऱ्या, खोलदऱ्या आणि लहान मैदाने आहेत. परंतू या खंडाच्या पूर्व भागातील जास्त भाग सपाट पृष्ठभागांनी व्यापला आहे. काही ठिकाणी थोडाफार बदल दिसून येतो.

यूरोप खंडातील अतिउंच ठिकाण म्हणजे ''माऊंट एलब्रुस शिखर' (5633 मीटर) असून ते ककासस पर्वत रांगा मध्ये आहे. अत्यंत खोल ठिकाण म्हणजे कॅस्पीयन समुद्र असून तो समुद्रसपाटीपासून 28 मी. खोल आहे.



एलब्रुस शिखर

वास्तवीक पाहता आशिया भूखंडामध्ये यूरोप हे एक मोठे पर्यायी द्वीप आहे. या खंडात स्कॉडीनेवीया, ऐबीरिया, जटल्यॉंड, बाल्कन इ. असे अनेक पर्यायी द्विपे आहेत. त्यामुळे युरोपला ''पर्यायी द्विपांचा पर्यायी द्विप' असे म्हणतात.

युरोपमध्ये सुमारे 80,500 कि.मी. लांबीची समुद्रांची किनारपट्टी आहे. ती आशिया खंडातील किनाऱ्यापेक्षा लांब आहे. या खंडाच्या किनारपट्टीवर हजारो 'व्दिपकल्प' आहेत. त्यामध्ये ब्रिटन आणि आयर्लंड मोठे द्विपकल्प आहेत. तसेच शेटलँड, फैरोस, सिसिली, सार्डीनीया, ओर्केनी, कोर्सिक, क्रेट आणि चानेल द्विप ही इतर प्रमुख व्दिप आहेत.

© KTBS Not to be republished

## स्वाभाविक विभाग

वरील लक्षणांच्या आधारे युरोपचे सामान्यपणे 4 विभाग पडतात.

1) वायव्येचा उंच प्रदेश
2) उत्तरेची यूरोप मैदाने
3) मध्यावरील उंच प्रदेश
4) दक्षिणेकडील पर्वतांचा प्रदेश

**1. वायव्येचा उंच प्रदेश :** हा स्वाभाविक विभाग अत्यंत प्राचीन पर्वत श्रेणींचा असून फिनलँड, स्वीडन, नॉर्वेतील काही भाग मिळून आईसलँड आणि ब्रिटन पर्यंत विस्तारलेला आहे. हे अवशेषांचे पर्वत आहेत. हिमनद्या विरघळल्यामुळे त्यांची उंची कमी आहे. हे पर्वत प्राचीन शिलापासून बनलेले आहेत. स्कांडीनेवीयामध्ये याची उंची सामान्यणे 2000 मीटर आणि आयर्लंड आणि स्काटलँड मध्ये यांची उंच फक्त 600 मीटर इतकी आहे. नॉर्वेमधील ''गोल्डोपिग्गेन (2469 मी.) शिखर'' या प्रदेशातील सर्वात उंच शिखर आहे. स्कॉटलँड मधील 'बेन्ननेवीस' (1343 मी.) आणि वेल्स मधील स्नोडोन (1085 मी.) ही इतर शिखरे आहेत. हा भाग उत्तरेकडे साधारण उतरता आहे. येथूनच अनेक नद्या वाहतात.




स्वाभाविक विभाग

Not ©KTBS to be republished

**2. उत्तर यूरोपमधील मैदाने :** या भागाला "मध्य भागातील सखल मैदाने" असे संबोधतात. हा पूर्वेकडील उरल पर्वतापासून पश्चिमेला अटलांटीकच्या किनाऱ्यापर्यंत विस्तारलेला आहे. यूरोपातील जास्तीत जास्त भाग या प्रदेशात आहे. यामध्ये युरोपियन रशिया, पोलंड, उत्तरजर्मनी, नेदरलँड (हॉलंड), डेन्मार्क, बेल्जीयम, उत्तर फ्रान्स आणि इंग्लंडचा पूर्व भाग यांचा समावेश आहे.

या प्रदेशाचा पूर्व भाग रुंद असून पश्चिमेकडे अरुंद होत गेला आहे. नेदरलँड आणि बेल्जीयम देशातील कांही मैदाने समुद्र सपाटीपेक्षा खाली आहेत. येथील वाहणाऱ्या नद्यांच्या एकत्रीकरणामुळे ही मैदाने तयार झाली आहेत.

ही मैदाने भारतातील गंगा-सिंधू नदीच्या मैदानासारखी समपातळीत नाहीत. काही भागात ही मैदाने साधारण उतारतीने एकत्र झाली आहेत तर आणि काही ठिकाणी पर्वत आणि डोंगर रांगामुळे वेगळी झाली आहेत. येथे जग प्रसिद्ध अशी सुपीक शेत जमिनी आहेत.

**3. मध्य भागातील उंच प्रदेश :** हा भाग पुरातन दगडापासून बनलेला असून काही ठिकाणी पुरातन पर्वत, डोंगर आणि सपाट भूभाग सामावलेला आहे. त्यांची समुद्र सपाटीपासूनची उंची सरासरी 600 मीटर पेक्षा जास्त नाही.

हा भाग पश्चिमेकडे आयर्लंड पासून पूर्वेकडे रशिया पर्यंत विस्तारलेला आहे. यामध्ये स्पेन आणि पोर्तुगाल मधील मेसेट, फ्रान्स मधील मध्य मासिफ व ओस्जेस, जर्मनीचा ब्लॉकफॉरेस्ट व जेक आणि स्लोव्हीकिया गणराज्यात असणाऱ्या कांही उंचीच्या श्रेणी सामावलेल्या आहेत.

या प्रदेशातील काही भाग अरण्यानी व्यापलेला आहे. येथील जास्तीत जास्त भाग दगडगोट्यानी बनलेला असल्यामुळे येथील माती शेतीला उपयुक्त नाही. मात्र नद्या नाल्यानी उत्तम अशी शेत जमीन दिलेली आहे.

**4. दक्षिणेकडील पर्वतमय प्रदेश :** या विभागाला अल्पाईन पर्वतांचा भाग म्हणून संबोधले जाते. यामध्ये सियेर्रमोरेन (स्पेन), फ्रान्स आणि स्पेन च्या मध्यभागी सिमेसारखा पिरनिस पर्वत अशा अनेक पर्वतांच्या रांगा आहेत. या पश्चिमेतील अटलांटीक किनाऱ्यापासून पूर्वेकडे कॅस्पीयन समुद्रापर्यंत एकास एक अशी समांतर रांगामध्ये पसरले आहेत. हे हिमालयाप्रमाणे घडीचे पर्वत आहेत.

©KTBS Not to be republished

यो प्रदेशात 'आल्प्स' पर्वत मुख्य आहे. येथील ''माऊँट ब्लॉक'' (4807 मीटर) शिखर अति उंच आहे. फ्रान्सचा आग्नेय भाग, इटलीचा उत्तरभाग, स्विझर्लंडचा बहुतेक भाग, जर्मनी, ऑस्ट्रिया, आणि स्लोवेनिया या प्रदेशात आल्प्स पर्वतांच्या रांगा विखूरलेल्या आहेत. इटलीच्या जास्त भागामध्ये अपनाईन पर्वत, क्रोसिया, बोस्नीया आणि युगोस्लावीया मध्ये डिनारीक आल्प्स, बल्गेरियाच्या बाल्कन आणि उत्तर स्लोवेनियामध्ये कार्पेथियन पर्वत आहेत.



ब्लॉक शिखर

## 3. नैसर्गिक हवामान आणि वनस्पती

युरोपच्या हवामान प्रदेशाबद्दल चर्चा करण्याअगोदर तेथील सामान्य हवामान परिस्थितीची माहिती करुन घेऊ. याखंडातील जास्त भाग 'समशितोष्ण कटीबंधातील हवामानाप्रमाणे आहे. याला 'हितकारक हवामान' असेही संबोधतात. हे प्रमुख वायुगुण नियंत्रण घटकांचे परस्पर प्रक्रियेचे फळ आहे. याला अक्षांश भौतिक परिस्थिती, वारे आणि स्थान कारण आहेत. तरीसुद्धा अटलांटीक सागरातून वाहणाऱ्या वाऱ्यांचा या खंडातील जास्तीत जास्त हवामानावर प्रभाव पडतो. याला मुख्य कारण म्हणजे गल्फस्ट्रीम समुद्राचा उष्ण प्रवाह आणि जोराने वाहणारे पश्चिमीवारे आहेत.

सामान्यपणे दक्षिण युरोपातील थंड असणाऱ्या अल्पकाळ उन्हाळ्यापेक्षा उत्तरेतील हिवाळा दिर्घकाळ आणि थंड असतो. तसेच पश्चिम युरोपपेक्षा पूर्व भागात हिंवाळा दिर्घकाळ आणि थंड असून उन्हाळा अल्पकाळ आणि उष्णतादायक असतो.

### हवामानाचे प्रदेश

हवामानावरुन युरोपचे 4 प्रमुखभाग होतात.

**1. वायव्य युरोपचा सागरी हवामानाचा प्रदेश :** हा प्रदेश नॉर्वेच्या समुद्र किनाऱ्यापासून स्पेनचा उत्तरभाग आणि मध्य यूरोपच्या आतील भागापर्यंत विभागलेला आहे. हितकारक हिवाळा, उष्ण उन्हाळा आणि भरपूर पाऊस, ढगाळ वातावरण

© KTBS Not to be republished

असल्यामुळे सूर्याचा प्रकाश दिवसा मंद असतो. हिवाळा आणि उन्हाळा या दोन्ही ऋतूमध्ये तापमान साधारणपणे (10° से ते 18° से) इतके असून पावसाचे प्रमाण 75 से.मी. आहे.




**वार्षिक उष्णता विभागणी**




**वार्षिक पावसाची विभागणी**

Not to be republished © KTBS

**2. खंडांतर हवामानाचा प्रदेश :** हा भाग जास्त करुन पोलंड, स्लोवेकिया, झेकगणराज्य, हंगेरी, रुमेनिया आणि बल्गेरिया मध्ये आढळून येतो. या हवामानाची लक्षणे म्हणजे तीव्र थंडीचा हिवाळा ($-12^{o}$ से. आणि $10^{o}$ से) उबदार उन्हाळा आणि पावसाची वार्षिक सरासरी 50 सें.मी. इतकी आहे. उन्हाळयाच्या आरंभी येथे अति जास्त प्रमाणात पाऊस पडतो.

**3. मेडीटरेनियन हवामानाचा प्रदेश :** जास्त उष्णता, कोरडा आणि उन्हाने मिश्रीत उन्हाळा व थोडा पाऊस पडणारा हितकारक हिवाळा असा हा प्रदेश. या हवामानाची प्रमुख लक्षणे पावसाच्या प्रमाणात समानता नाही. हिवाळ्यामध्ये तापमान सरासरी $8^{o}$ सेल्सीयस असते आणि उन्हाळ्यात $22^{o}$ सेल्सीयस पर्यंत वाढते. पावसाचे वार्षिक प्रमाण सरासरी 75 ते 100 से.मी. आहे. अशाप्रकारचे हवामान विशेषत: मेडीटरेनियन प्रदेशा सोबत दक्षिण युरोपमध्ये दिसून येते.

**4. पर्वतीय हवामानाचा प्रदेश :** अशा प्रकारचे हवामान आल्प्स आणि ककासस पर्वत या भागामध्ये दिसून येते. हा उंच भाग सूर्यकिरणांचे कोन आणि वाऱ्यापासून संरक्षण करतो. हिवाळ्यातील तापमान-$4^{o}$ सेल्सीयस आणि उन्हाळ्यातील $16^{o}$ सेल्सीयस असते. पावसाचे सरासरी प्रमाण पर्वतातील भागामध्ये वाऱ्याच्या दिशेला 200 सें.मी. आणि वाऱ्याच्या विरुद्ध दिशेला 50 सें.मी. इतके असते. पर्वतांच्या अतिउंच भागातील तापमान पाण्याच्या गोठणबिंदू ($0^{o}$ से.) पेक्षाही कमी असते.

## नैसर्गीक वनस्पती

युरोपमध्ये फार वर्षापासून मानव रहात असून तेथे दाट लोकवस्ती आहे. त्यामुळे तेथील नैसर्गीक वनस्पती संपूर्णपणे नष्ट झाली आहे. जनवस्तीला प्रतीकूल भागामध्ये आणि उंच प्रदेशामध्ये फक्त वनस्पती दिसून येते. खालीलप्रमाणे युरोपमध्ये वनस्पती वर्गाचे 6 प्रकार पडतात.

**1. तंड्रा वनस्पती :** दगडफूल आणि शेवाळ (Lichens and mosses) यांनी बनलेला आहे. हा भाग आयर्लंड, उत्तर नॉर्वे, स्वीडन आणि फिनलँड यांनी साम ावलेल्या लहानशा प्रदेशामध्ये आढळून येतो. आल्पस पर्वत आणि उरल पर्वत्ताच्या उत्तरेकडील भागामध्येही अशा प्रकारच्या वनस्पती आढळून येतात.

**2. तैगा अरण्ये :** नॉर्वे, स्वीडन आणि फिनलँड मधील सामावलेल्या ध्रुव प्रदेशामध्ये तैगा अरण्ये आढळून येतात. याला "सूचिपर्णी अरण्ये" असेही म्हणतात. येथे थोड्याच प्रकारची झाडे वाढतात. उदा : स्काटसपैन, स्फ्रूस आणि लार्च. याला

© KTBS Not to be republished

काट्यासारखी पाने असून ती शंकूच्या आकाराची असतात.

**3. मिश्र अरण्ये :** दक्षिणेकडील मध्य भागात मिश्र वनस्पतीची अरण्ये आढळून येतात. तेथे पानझडीचे वृक्ष आणि सुचिपर्णी वृक्ष वाढतात. या मिश्र अरण्यात ओक, ॲश, आल्म, पाप्लर विलो, बीच इ. वनस्पती आढळतात.

**4. मेडीटरेनियन वनस्पती :** या प्रकारची वनस्पती साधारणपणे मेडीटरेनीयन समुद्र किनारपट्टीवर आढळून येते. या रुंद पाने असलेल्या 'सदाहरित वनस्पती' आहेत. कारण शरद ऋतूमध्ये त्या झाडांची पाने झडत नाहीत. कार्क, ओक, ऑलीव्ह, लारेल, इ. वनस्पती येथे आढळतात.

**5. गवताळ कुरणे :** पानझडी अरण्यापासून दक्षिण भागामध्ये गवताळ कुरणे आढळून येतात. उदा : हंगेरी, बल्गेरीया, रुमेनिया आणि युरोपियन रशिया. येथे झाडे विरळ असून स्टेपीज गवताळ कुरणाने बनलेला आहे.

**6. आल्पाईन वनस्पती :** यूरोपच्या दक्षिणभागात उंच पर्वत श्रेणीमध्ये विभागलेला आहे. उदा  आल्प्स, पिरनीस, बाल्कन, कार्पेथियन आणि दिनारीक पर्वत.



यूरोपियन वनस्पती वर्ग

Not to be republished © KTBS

# 4. शेती, दूग्धव्यवसाय आणि मासेमारी

**शेती :** युरोपमध्ये शेती हा औद्योगीकरणाला मुख्य पूरक धंदा बनलेला आहे. हा खंड विशाल, मैदानी प्रदेश, सुपीक जमीन आणि उत्तम पाणी पुरवठ्याच्या सोयींनी युक्त असून वैभवशाली आहे. येथील हवामान शेतीला पूरक असे आहे.

स्कांडीनेवीयन देश सोडून युरोपमधील बहुतेक देश त्यांच्या विस्तारापैकी 50% पेक्षा जास्त भाग शेतीने व्यापलेला आहे. युरोपमध्ये पिकणाऱ्या जमीनीचे सरासरी क्षेत्र 10 हेक्टर आहे.

पश्चिम युरोपीय देशामध्ये मिश्र शेतीची पद्धत रुढ आहे. यामध्ये पिकांची लागण व जनावारांची पैदास ही दोन्हीही आहेत. येथील शेतजमीन जनावरांचा चारा, पिकांची लागवड, कुक्कूट पालन, डूक्करे पाळण्यासाठी आणि विविध फळे भाजीपाला पिकविण्यासाठी उपयोग करतात.

मेडीटरेनियन हवामान असलेला दक्षिण यूरोपमधील शेतीची वेगळी आहे. ती एकदल धान्ये, फळे, भाजीपाल्याची लागवड, जनावारांची पैदास यामुळे एकत्रीकरण झाली आहे.

मोठ्या बाजारपेठेला अवलंबून असलेली एक विशेषप्रकारची शेती प्रगती झाली आहे. जास्त दाट लोकवस्ती असलेल्या शहरी प्रदेशातील जवळच्या भागात वाणिज्य आणि उत्तम प्रकारे एकत्रीत झालेली शेती आढळून येते. एकूण युरोपच्या जनसंख्येच्या 10% पेक्षा कमी लोक शेती कामात गुंतलेले आहेत.

भौतिक परिस्थिती, माती, हवामान, बाजारपेठ आणि शेतमजुरांची उपलब्धता यावर अवलंबून यूरोपातील विविध भागामध्ये वेगवेगळ्या प्रकारची पिके घेतात.

**गहू** हे यूरोपमधील प्रमुख आहार पीक आहे. पॅरीसचे मैदान, युरोपचे महामैदान, हंगेरीचे मैदान, सखल मैदानाचे देश आणि इटलीच्या पो नदीकाठचा प्रदेश हे युरोपम धील गहू उत्पादन करणारे प्रदेश आहेत.

**मका** हे यूरोपमधील दुसऱ्या क्रमांकाचे प्रमुख एकदल धान्याचे पीक आहे. फ्रान्स, इटली, हंगेरी, जर्मनी आणि स्पेन हे मका उत्पादन करणारे प्रमुख देश आहेत. राय (Rye) हे आखीन एक आहार पीक असून त्याचा उपयोग ब्रेड आणि मद्य तयार

©KTBS Not to be republished

करण्यासाठी करतात. पोलंड, जर्मनी, झेक गणराज्य आणि स्लोव्हेकिया गणराज्य प्रमुख राय उत्पादन करणारे देश आहेत. बार्लीचे उत्पादनातही यूरोप प्रमुख आहे. बार्लीचा उपयोग आहार धान्य म्हणून, जनावराना आहार म्हणून आणि मद्य तयार करण्यासाठी करतात. काही ठिकाणी ओट पिकवितात. भात हे उन्हाळी पीक असून ते अत्यंत कमी प्रमाणात पिकविले जाते.

**बीट** आणि **बटाटे** ही दोन्ही यूरोपमधील प्रमुख पिके आहेत. बीट पासून साखर तयार करतात तसेच जनावराना आहार म्हणून उपयोग करतात.

**बटाट्याचे** पीक मध्य आणि पूर्व यूरोप मधील मैदानी प्रदेशात जास्त प्रमाणात पिकविले जाते. विश्वामध्ये सर्वात जास्त बटाट्याचे उत्पादन यूरोप मध्ये होते. **जवस** (Flax) हे यूरोपमधील प्रमुख तंतूमय पीक आहे.

यूरोपातील बेटावरील उतार जमीनीवर द्राक्षे, सफरचंद, अंजीर, लिंबू, मणूके **(plum)** डाळींब, चेस्टनट इ. फळांची शेती आढळते. बल्गेरीया हा देश गुलाब फूले, भाजीपाला, आणि बागायती पिकांसाठी प्रसिद्ध आहे.

**दुग्धव्यवसाय :** हा यूरोपमधील मिश्रशेती पद्धतीतील अत्युत्तम उद्योग आहे. थंड व दमट हवामान, दाट लोकवस्ती असलेली शहरे, चांगले रस्ते, रेल्वे वाहुतुकीची व्यवस्था, अत्युत्तम अशी जैवीक-तंत्रज्ञानातील प्रगती, शेतीकरण, आर्थिक पाठबळ, दूग्धव्यवसायातील यांत्रीकीकरण आणि भरपूर चाऱ्याचा पुरवठा यामुळे यूरोपमध्ये दूग्धव्यवसायाच्या प्रगतीला प्रोत्साहन मिळाले आहे.



**युरोपमधील दूग्धव्यवसायाचे चित्र**

Not to be republished ©KTBS

डेन्मार्क, नेदरलँड, स्विझजरलँड, जर्मनी आणि ब्रिटनमध्ये दूग्धव्यवसायात मोठया प्रमाणात प्रगती झाली आहे. यामध्ये सर्वात मोठ्या प्रमाणात डेन्मार्क मध्ये दूग्धव्यवसाय चालतो. यूरोपमधील देश दूध व लोणी, तूप, चीज, चॉकलेट इ.दूग्धजन्य पदार्थांची निर्यात करतो.

**मासेमारी :** फार वर्षापासून यूरोप हा देश आहाराचे आर्थिक उत्पन्न म्हणून मासेमारी करीत आहे. कमी लांबीच्या समुद्र भागामध्ये मासेमारी चालते. प्रमुख मासेमारीचा प्रदेश वायव्य यूरोपमध्ये आहे. तो आर्क्टिक वृताच्या उत्तर भागापासून मेडीटरेनीयन समुद्रापर्यंत विस्तारलेला आहे. उत्तर समुद्रात मोठया प्रमाणात मासेमारी चालते. त्यामध्ये नॉर्वे, ब्रिटन, डेन्मार्क, स्वीडन आणि जर्मनी देश येतात. डॉगर बँक आणि ग्रेट फिशर बँक हे दोन्ही प्रदेश उत्तर समुद्राची मासेमारीची प्रसिद्ध केंद्रे आहेत. नॉर्वेचे लोक मासेमारीमध्ये तरबेज आहेत. सिल व देवमासा या जातीचे मासे धृवीय प्रदेशात पकडतात.




युरोपमधील मासेमारीचे क्षेत्र

©KTBS Not to be republished

नॉर्वे हा मोठ्या प्रमाणात मासेमारी करणारा आणि मासे निर्यात करणारा देश आहे. शेतजमीन आणि आहार धान्याची कमतरता असल्यामुळे यूरोपमध्ये मासेमारीची प्रगती झाली आहे.

## 5. खनिजे आणि प्रमुख उद्योगधंदे

**खनिजे :** यूरोप खंडामध्ये विविध प्रकारची खनिजे आणि इंधने मिळतात.

या खंडामध्ये मोठया प्रमाणात लोखंडाच्या खनिजाचे उत्पादन होते. यूरोपमधील बहुतेक देशामध्ये लोखंडाची खनिजे सापडतात. जगातील खनिजापैकी 5% लोखंडाच्या खनिजाचे साठे या खंडात मिळतात. फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन आणि स्विडन हे लोखंडाची खनिजे उत्पादन करणारे प्रमुख देश आहेत.

बल्गेरीया आणि पोलंड हे तांबे उत्पादन करणारे प्रमुख देश आहेत. यूरोपमध्ये पेट्रोलीयम आणि नैसर्गीक वायू अत्यंत कमी प्रमाणात सापडते. उत्तरसमुद्र, फ्रान्स, इटली, नेदरलँड आणि जर्मनी हे पेट्रोलियम उत्पादन करणारे प्रमुख देश आहेत.

Not to be republished © KTBS




प्रमुख खनिज संपत्ती

दगडीकोळसा हे युरोपमधील विद्युतशक्तीचे प्रमुख साधन आहे. स्कांडीनेवीया आणि मेडीटरेनियन देश सोडून या खंडात दगडी कोळशाचे साठे सापडतात. उत्तम दर्जाचा बिटूमिनस दगडी कोळसा यूरोपियन रशिया, जर्मनी आणि ब्रिटन मध्ये मिळतो. काही ठिकाणी बॉक्साईट आणि पोटॅस सापडते.

## प्रमुख उद्योगधंदे

**पोलाद व लोखंडाचे उद्योग :** आधुनिक युग हे लोखंड आणि पोलादचे युग असून यांचे उद्योगधंदे मोठया प्रमाणात आहेत. काही उद्योगधंद्याना लागणारे लोखंड आणि पोलाद यांचे उत्पादन करतात. लोखंड आणि पोलादाचे उत्पादन करणारे प्रमुख देश म्हणजे 1) जर्मनी : -ऱ्होस, सार, वेसर नदीकाठचा प्रदेश आणि बर्लीन प्रदेश. 2) ब्रिटन : ब्लॉक कंट्री, शिघील्ड, ईशान्य किनारपट्टी आणि वेल्स प्रदेश. 3) फ्रान्स : लॉरेन्स, वायव्य आणि पूर्वेकडील प्रदेश, पोलंडमधील सैलीसिया आणि इटलीच्या पो नदीचे खोरे आणि लंबार्डी मैदान होय.

**कापूस कापड उद्योग :** युरोपमध्येही शेतीवर आधारीत उद्योगधंदे प्रगती पथावर आहेत. त्यामध्ये कापसापासून कपडे बनविण्याचा उद्योग आहे. युरोप मध्येही कापसाच्या (गिरणी) मिल आहेत. कच्या कापसाचा माल बाहेरील देशातून आयात केला जातो. ब्रिटन हा देश आधूनिक कापड उद्योगधंद्याचे उगमस्थान आहे. येथील लंकाशायर, चेशायर, आणि डर्बीशायर ही कापड गिरणीची प्रमुख केंद्रे आहेत. जर्मनी आणि फ्रान्स हे कापूस आणि तागाच्या वस्तू उत्पादन करणारे इतरप्रमुख देश आहेत. उत्तम दर्जाची रेशमी, लोकरी कपडे आणि मानवनिर्मीत कपडयासाठी ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, बेल्जीयम आणि इटली हे देश प्रसिद्ध आहेत.

**जहाज बांधणीचा उद्योग :** हा एक मोठया प्रमाणातील तांत्रीक आणि विशेषकरुन जहाज बांधणेचा उद्योग आहे. तंत्रज्ञानातील प्रगती, उत्तम बंदरांची सोय, उद्योगधंद्याची प्रगती इ. उद्योंगांच्या वाढीसाठी प्रेरणार्थक ठरल्या आहेत. जर्मनी हा युरोपमधील जहाज बांधणीचा प्रमुख देश आहे. स्वीडन, ब्रिटन, आणि फ्रान्स हे युरोपमधील जहाज बांधणीचे इतर देश आहेत.

**स्वयंचलीत वाहनांचे उद्योगधंदे :** येथे कार, ट्रक, बस, स्कूटर इ. आणि मोटर इंजिनच्या सहाय्याने इतर कोणतेही वाहन तयार करण्याचा उद्योग आहे. हा एक बांधणीचा उद्योग आहे. अत्युत्तम तांत्रीक आणि नफा देणारा उद्योगधंदा आहे. जर्मनी फ्रान्स, इटली आणि ब्रिटन हे युरोपमधील स्वयंचलीत वाहनाच्या उद्योगधंद्याचे प्रमुख देश आहेत.

©KTBS Not to be republished

## 6. युरोपमधील प्रमख उद्योग धंद्याचे प्रदेश

युरोपमधील प्रमुख उद्योगधंदे आणि उद्योग धंद्याची केंद्रे यांचा एक प्रकारचा त्रिकोण तयार झालेला आहे. याला युरोपमधील उद्योगधंद्याचे हृदय म्हणतात. हा त्रिकोण उत्तर समुद्रापासून पोलंडमधील मध्यभाग आणि दक्षिण इटलीच्या पो नदी काठापासून उत्तरेतील स्विडन पर्यंत व्यापलेला आहे.

या खालील प्रमाणे युरोपमधील उद्योगधंद्याचे प्रमुख विभाग आहेत.

1. ब्रिटन मधील उद्योगधंद्याचा विभाग.
2. पश्चिमेकडील उद्योग धंद्याचा त्रिकोण विभाग.
3. पॅरीसच्या उद्योगधंद्याचा विभाग (यालाच 'फ्रान्सच्या उद्योग धंद्यांचे हृदय' म्हणतात)
4. लोराईन सार उद्योग धंद्यांचा विभाग.
5. ऱ्हाईन नदी काठावरील विभाग.
6. सैलेसियाचा काठावरील विभाग
7. दक्षिणेचा स्कॉंडिनेवीयाचा विभाग. (स्टॉकहोमला धरुन)
8. पूर्व जर्मनीपासून ईशान्य झेक गणराज्य आणि स्लोवेकीयाचा विभाग.
9. उत्तरेकडील इटलीच्या 'पो' नदी काठच्या उद्योगधंद्याचा प्रदेश.

## 7. लोकसंख्या

युरोपच्या भौगोलीक क्षेत्रफळाचे निरीक्षण करुन पाहिल्यास त्यामानाने तेथील लोकसंख्या जास्त आहे. युरोपीयन रशिया सोडून जगातील 11% भूभाग व्यापला आहे. तरी सुद्धा जगातील लोकसंखेची 1/5 लोकसंख्या येथे आहे. येथील एकूण लोकसंख्या 738.2 मिलीयन (2010) इतकी होती. त्यामध्ये शहरातील लोकसंख्या जास्त आहे.

**लोकसंख्या विभागणी :** युरोपमध्ये लोकसंख्येची विभागणी मध्ये समानता नाही. जर्मनी, ब्रिटन, इटली आणि फ्रान्स हे युरोपमधील दाटलोकवस्तीचे देश आहेत. वायव्य युरोप मध्ये लोकाची संख्या कमी आहे. आल्प्स, ककासस, कमी प्रमाणातील कोरडया प्रदेश धरुन, आग्नेय यूरोप मधील भागामध्ये लोकसंख्या विरळ आहे.

© KTBS Not to be republished

युरोपमधील दाट लोकसंख्येचे देश म्हणजे बेल्जीयम, लक्षंबर्ग, नेदरलँड इत्यादी. याला औद्योगीकरण, वाहतुकीच्या उत्तम सोयी, नैसर्गीक संपत्ती आणि नवीन तंत्रज्ञातील प्रगती ही प्रमुख कारणे आहेत.

**वाढ :** युरोपमधील बहुतेक राष्ट्रे कमी लोकसंख्या आणि वाढीव लक्षणाने बनलेली आहेत. लोकसंखेची वाढ एका प्रदेशाहून दुसऱ्या प्रदेशात बदलत जाते.

**स्थलांतर :** गेल्या 200 वर्षामध्ये युरोपियन लोक दुसऱ्या देशात स्थलांतर झाले आहेत. तसेच अनेक कारणामुळे बाहेरील देशातील लोक युरोप मध्ये स्थलांतरीत होऊन तेथेच स्थायिक झाले आहेत.

दुसऱ्या जागतीक महायुद्धानंतर विविध खंड आणि देशातून लोक ब्रिटन मध्ये स्थलांतर होऊन आलेले आहेत. यामध्ये इटालीयन लोक जास्त प्रमाणात आहेत.

©KTBS Not to be republished




लोकसंख्येची घनता

दुसऱ्या जागतीक महायुद्धाच्या अगोदर जर्मन लोक वेगवेगळ्या देशामध्ये स्थलांतर होऊन गेले आहेत. पोलंड, रुमेनिया, हंगेरी, झेक, स्लोवीकीया आणि युगोस्लावीयामध्ये जर्मन लोक अल्पसंख्याक म्हणून दिसून येतात.

**जनघनता :** युरोपमधील जनघनतेमध्ये विविधता आढळते. प्रगती पथावर असलेल्या नेदरलँड मध्ये प्रति चौ.कि.मी.ला 950 लोक असून आइसलँडमध्ये प्रति चौ. कि.मी. फक्त 3 लोक राहतात. उत्तर युरोपातील सखल प्रदेशात अतिजास्त प्रमाणात जनघनता आहे.

युरोपमधील अत्यंत दाट लोकवस्ती असलेला प्रदेश म्हणजे उद्योगधंद्याचे जिल्हे, बेल्जीयम आणि जर्मन मधील दगडी कोळशाचा प्रदेश, ग्रेट आयर्लंड, नेदरर्लंड, ऱ्हाईननदी काठचा प्रदेश, उत्तर इटली आणि स्पेनचा किनारपट्टीचा प्रदेश होय.

विरळ लोकसंख्या असलेला प्रदेश म्हणजे मध्य फ्रान्स, पर्वतमय प्रदेश, बाल्कन विभाग आणि स्कॉटलंडचा उंच भाग होय.

## नवीन शब्द

आल्वीन, आल्प्स, स्वंयचलीत, गळीतधान्ये, घडीचे पर्वत, सागरीय हवामान, मासिफ, मेसेट, स्थलांतर, पर्याय, द्वीप, तैगा, कापडउद्योग.

## हे तुम्हाला माहिती असू दे.

1 स्क्वांडीनेवीय : उत्तर युरोप मधील भाग असून नॉर्वे, स्वीडन, आणि फिनलँड याच्या मध्ये आहे.

2 ब्रिटन अथवा ग्रेटब्रिटन: युरोपमधील अत्यंत मोठे द्वीप असून इंग्लंड, स्क्वॉटलंड, वेल्स यांच्या मध्ये आहे. उत्तर इंग्लड मिळून हे संयुक्त राज्य (U.K.) झाले आहे.

3 सुमारे 500 वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून युरोपला ‘जगाचे हृदय’ म्हणून ओळखतात.

4 ब्लॉक फॉरेस्ट हे अरण्य नाही. तो एक पर्वतमय प्रदेश आहे. तो दक्षिण जर्मनीमध्ये असून याचा अंतरभाग घनदाट असल्यामुळे सूर्याचे किरणही पोहचू शकत नाहीत. त्यामुळे हे नाव पडले आहे.

Not to be republished ©KTBS

## उत्तरे लिहा.

1 युरोपचे भौगोलीक स्थान सांगा.

2 युरोपला आशियाचे 'पर्यायी द्वीप' असे का म्हणतात ?

3 युरोपचे स्वाभाविक विभाग सांगा.

4 युरोपमधील प्रमुख पर्वत आणि शिखरे कोणती ते सांगा.

5 युरोपमधील हवामानाचे प्रमुख प्रदेश कोणते ?

6 युरोपमधील नैसर्गीक वनस्पतींचे प्रमुख विभाग सांगा.

7 युरोपमधील दूग्धव्यवसायातील प्रमुख देशांची नावे लिहा.

8 युरोपमधील प्रमुख आहार धान्ये कोणती ?

9 युरोपमधील मासेमारीचे प्रमुख विभाग सांगा.

10 युरोपमधील प्रमुख खनिजे कोणती ?

## कृती

1 नकाशामध्ये युरोपचे मुख्य स्वाभाविक विभाग दाखवा.

2 शिक्षकांच्या मदतीने युरोप मधील प्रमुख पर्वत आणि शिखरे ओळखा.

3 तुम्ही रहात असलेल्या आजूबाजूचा परिसर निरीक्षण करुन तेथील जमीनीचे स्वरूप, वनस्पती आणि पिके यांची यादी तयार करा.

4 युरोपच्या नकाशात राष्ट्रांच्या राजधानीची नावे, पर्यटन स्थळे आणि उद्योगधंद्याचे प्रदेश ओळखा.

* * * * *

©KTBS Not to be republished

| पाठ 10 | आफ्रिका - केंद्रिय खंड |
|---|---|

**पाठाचा परिचय**

या पाठामध्ये तुम्ही आफ्रिकेचे भौगोलिक स्थान, विस्तीर्ण आणि भौगोलिक रचना, स्वाभाविक विभाग, नद्यांची व्यवस्था, हवामान आणि नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी, संपत्ती, शेती, उद्योगधंदे, मौल्यवान खनिजे, लोकसंख्या वाढ, लोकसंख्या विभागणी आणि जनघनता याबद्दल माहिती करुन घ्या.

**सामर्थ्य**

1 आफ्रिका खंडाचे स्थान, विस्तीर्ण, भौगोलीक रचना आणि स्वाभाविक विभाग याबद्दल माहिती समजून घ्याल.

2 आफ्रिकेतील प्रमुख नद्यांची व्यवस्था, हवामान आणि हवामानाचे प्रदेश, नैसर्गीक वनस्पती आणि प्राणी संपत्ती याबद्दल माहिती मिळेल.

3 शेती, उद्योगधंदे आणि मौल्यवान खनिजे यांच्याबद्दल माहिती मिळेल.

4 आफ्रिकेची लोकसंख्या, लोकसंख्या वाढ, विभागणी आणि जनघनता याबद्दल माहिती मिळेल.

©KTBS Not to be republished

प्रस्तावना आफ्रिका खंड आशिया खंडानंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाचा विशाल खंड आहे. हा लोकसंख्येमध्येही दुसऱ्या क्रमांकावर आहे. आजतागायत आफ्रिका खंडाला ‘काळाखंड’ असे संबोधले जात होते. ते या खंडात मुख्यतः काळे लोक रहातात म्हणून नव्हे. तर त्याच्या ओसाड जमीनी समुद्र किनाऱ्यापर्यंत विस्तारलेल्या आहेत. उत्तरेकडे सहारा वाळवंट असून तो खंड बाहय विश्वापासून दिर्घ कालावधी पर्यंत त्याचा शोध लागलेला नव्हता. या खंडात 52 देश सामावलेले आहेत.

## 1. स्थान, विस्तार आणि भौगोलीक रचना

**स्थान :** आफिका खंड $37^0$ उत्तर आणि $35^0$ दक्षिण अक्षांश आणि $17^0$ पश्चिम आणि $50^0$ पूर्व रेखांशाच्या मध्ये वसलेला आहे. आफ्रिकेच्या पश्चिम भागात मुख्य रेखांश उत्तर-दक्षिण दिशेने स्पर्शून गेले आहे. विशेष म्हणजे त्या खंडातून मकरवृत, कर्कवृत आणि विषुववृत्त गेले आहे. विषुववृत्त या खंडाच्या मध्यातून गेल्यामुळे याला ‘केंद्रीय खंड’ असे म्हणतात.

**विस्तार :** आफ्रिकेचा एकूण विस्तार 30.4 मिलीयन चौ.कि.मी. आहे. याची दक्षिणोत्तर लांबी 8000 कि.मीटर आणि पूर्व पश्चिम रुंदी 7400 कि.मीटर इतकी आहे.

अल-फिरम (ट्रूनिसिया) हे ठिकाण आफ्रिकेचे उत्तर टोक असून अगुल्हास हे ठिकाण (दक्षिण आफ्रिका) भूभाग दक्षिण टोक आहे.




जगाच्या नकाशात आफ्रिकेचे स्थान




आफ्रिकेचे स्थान व रचना



©KTBS Not to be republished

**भौगोलिक रचना :** आफ्रिकेचा बहुतेक भूभाग कोणत्यातरी समुद्र किंवा महासागरानी सगळीकडून वेढलेला आहे. उत्तरेकडे मेडीटरेनियन समुद्र, पश्चिमेला अटलांटिक सागर, पूर्वेला तांबडा समुद्र आणि हिंदू महासागर यानी वेढलेला आहे. पूर्वी या खंडाचा ईशान्य भाग सिनाय या पर्यायी द्वीपामुळे आशिया खंडाला जोडलेला होता. तो आता सुवेझ काळव्यामुळे वेगळा झाला आहे. जिब्राल्टरच्या खाडीमुळे यूरोप आणि तांबडया समुद्रापासून अरेबीया पर्यायी द्वीपापासून वेगळा झाला आहे. आफ्रिका खंडाचा समुद्र किनारा 30500 कि.मीटर लांबीचा आहे.

## 2. स्वाभाविक विभाग

आफ्रिका खंडाचे स्वाभाविक विभाग आंतरीक रचनेचे प्रतिबिंब बनले आहे. संपूर्ण खंडच विशाल मैदानी प्रदेश म्हणून ओळखला जातो. हा खंड प्राचिन स्फटीके दगडापासून बनलेला आहे. तो समुद्र किनाऱ्याजवळ लहान भाग असून तो एकदम उंच होऊन पठार बनले आहे. यामुळे या खंडातील आतील भागात प्रवेश करणे कठीण आहे. पठारी प्रदेश (मैदानी प्रदेश) आग्नेय भागात उंच आहे आणि इशान्येला वाढता उत्तार आहे. आफ्रिका खंडाच्या विस्तीर्णाशी तुलना केल्यानंतर इतर खंडाच्या पेक्षा कमी उंचीचे पर्वत आणि सखल मैदानानी बनला आहे.



मोठया दुभंगलेल्या दरी

आफ्रिकेचा समुद्र किनारा कमी जास्त प्रमाणात सरळ आहे. तो काही मोठी सखल मैदाने, नैसर्गिक बंदरे आणि लहान खाडयानी बनला आहे. तेथे कोणत्याही खाड्या (Bay) आणि भूशीर आत विस्तारलेला भाग नाही. तर समुद्र आतील भाग लांबट निमुळते झाले आहेत.

**मोठया दुभंगलेल्या दरी :** दोन सामान्य उंच असलेला भाग किंवा दोन सखल भागामधील जमीनीचा भाग घसरल्यामुळे निर्माण झालेल्या सपाट असलेल्या तळ खालच्या दरीला 'दुभंगलेली दरी' असे म्हणतात. आफ्रिकेची मोठी दुभंगलेली दरी अधिक लांबपल्ल्याची आहे (6900 कि.मी) त्यामुळे त्याला "मोठी दुभंगलेली दरी" असे म्हणतात.

© KTBS Not to be republished




**आफ्रिकेची भौगोलिक रचना**

©KTBS
Not to be republished

इंग्लीश अक्षर Y आकारात असलेली भलीमोठी दुंभगलेली दरी आफ्रिका खंडाचे स्पष्ट दिसणारा स्वाभावीक विभाग आहे. हे दक्षिणेतील मोंबीक पासून प्रारंभ होऊन मालवी, टांझानिया, केनिया आणि इथोपिया मार्गे जाऊन तांबड्या समुद्रापर्यंत पसरले आहेत. तेथून अक्यूबा खाडी, मृत समुद्र आणि गालीली समुद्रापासून पुढे जाऊन जॉर्डनच्या सिरिया दरीमध्ये संपते.

**आफ्रिकेची सखल मैदाने :** आफ्रिकेमध्ये प्रमुख 5 सखल मैदानी प्रदेश आहेत. त्यांचे विवरण खालील प्रमाणे आहे.

**1. सुदानचा सखल मैदानी प्रदेश :** हा पांढरी आणि निळी नाईल नद्या वाहणारा प्रदेश आहे. या दलदलीच्या भागाला 'सड' (**Sudd**) असे म्हणतात.

**2. चाडचा सखल मैदानी प्रदेश :** हा भाग चाड सरोवराने वेढलेला आहे. हा सुध्दा दलदलीचा प्रदेश असून हा सहारा वाळवंटसुद्धा आक्रमितो.

**3. जोफ (Djouf) सखल मैदानी प्रदेश :** याने सहारा वाळवंटाचा पश्चिम भाग व्यापलेला आहे. तसेच मारिटानीया - माली सिमेच्या लांबपर्यंत विस्तारलेला आहे.या यातून नायझर नदी वाहते.

**4. कांगो (जैरे) सखल प्रदेश :** हा भाग एक रचनात्मक भूस्वरूप झाला असून तो मैदानी प्रदेशाने वेढलेला आहे. यातून कांगो आणि तिच्या उपनद्या वाहतात. हा एक अरण्याचा प्रदेश आहे.

**5. कलहरी सखल मैदानी प्रदेश** : हा प्रदेश जास्त प्रमाणात वाळवंटी प्रदेश आणि स्टेप्पीजचा गवताळ कुरणांचा भाग आहे. हा मैदानी प्रदेशाने वेढलेला आहे.




**सखल मैदानी प्रदेश**

**सरोवरे :** आफ्रिका खंडाची आर्थिक प्रगती होण्यासाठी अनेक सरोवरे कारणीभूत आहेत. त्यामधील 8 सरोवरे प्रमुख आहेत. पूर्व आफ्रिकेत भली मोठी आणि लांब अशी सरोवरे आहेत. ती सर्व साधारणपणे दुभंगलेल्या दऱ्यांबरोबर संबंध प्रास्थापित झालेली आहेत. दुभंगलेल्या दऱ्यांच्या पश्चिमेला अलबर्ट, एडवर्ड, किवू, टांगानिक आणि न्यास सरोवरे आहेत. इतकेच नव्हेतर या दऱ्यांच्या पूर्वेला रुडाल्फ (तुर्कान) नट्रोन आणि इयासी सरोवरे आहेत.

टांगानीक सरोवर जगातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे सरोवर आहे.

Not to be republished ©KTBS

हे सुमारे 1,436 मीटर लांब आहे, दुभंगीत दरींच्या दोन रांगाच्या मध्ये असलेले व्हिक्टोरीया सरोवर आफ्रिकेतील अत्यंत मोठे सरोवर आहे. ते सुमारे 69,481 चौ. कि. मीटर इतके विस्तारलेले आहे. येथूनच नाईल नदीचा उगम होतो.

**पर्वत :** आफ्रिका खंडात मोठे पर्वत नाहीत. आफ्रिकेच्या सपाट मैदानांची मालिका खंडीत करण्यासाठी कांही लहान लहान डोंगराच्या रांगा आहेत. त्यामध्ये अटलास रांगा, डेकन्सबर्ग पर्वत आणि किलीमांजारो पर्वत प्रमुख आहेत.

**अटलास श्रेणी :** यात आपल्या भारतातील हिमालय पर्वता प्रमाणेच घडीचे पर्वत आहेत. हे दक्षिण युरोपातील पर्वतच पुढे सरकले आहेत. माऊंट टाब्काल हे उंच शिखर आहे. अटलास श्रेणी अल्जेरीया, मोराक्को आणि टूनेसिया मध्ये पसरल्या आहेत.

**ड्रेकन्सबर्ग पर्वत :** आफ्रिकेच्या आग्नेय समुद्र किनाऱ्याच्या लांबपर्यंत पसरलेल्या आहेत. हे नावापुरतेच पर्वत आहेत व ते सपाट मैदानात घुसलेले आहेत.

**किलीमांजारो पर्वत :** ही पर्वत श्रेणी आफ्रिकेच्या पूर्व भागात आहे. यात आफ्रिका खंडातील सर्वात उंच शिखर आहे. त्याची उंची 5,895 मीटर इतकी आहे. हे विषुववृत्ताच्या जवळ असले तरी याचे शिखर कायम बर्फाने अच्छादलेले असते. याला कारण त्यांची उंची होय. वर उल्लेख असलेले आहाग्गार, टिबेस्टी, रुवेंजोरी, तांबडी श्रेणी आणि पूर्व आफ्रिका श्रेणी हे आफ्रिकेतील इतर पर्वत आहेत.



किलिमांजारो पर्वत

आफ्रिकेतील अत्यंत उंच शिखर किलीमांजारो आणि अत्यंत सखल प्रदेश असल सरोवर (जेबोटी) आहे.

**सुवेझ कालवा :** दोन विशाल भूभागांना जोडणारा आणि दोन जलराशींना वेगळा करणारा लहान भूभाग म्हणजेच 'कालवा' (भूकंठ). त्यांच्यामध्ये सुवेझ कालवा प्रसिद्ध आहे.

©KTBS Not to be republished

हा मेडीटरेनियन समुद्र आणि तांबडा समुद्र यांच्या मधील लहान भूभाग आहे. तो आफ्रिका आणि आशिया खंडाना जोडतो. प्रस्तुत आफ्रिका खंडातील देशामधील एका इजिप्त देशाला या कालव्याचा भाग मिळालेला असून आफ्रिकेच्या ईशान्य भागात आहे. हा कालवा साधारणपणे मानवनिर्मित आहे. तो मेडीटरेनियन समुद्र आणि तांबडया समुद्राला जोडतो. हा जगात जास्त जहाजे वाहतूक करणारा प्रमुख सागरी मार्ग असून यूरोप आणि आशियातील कमी अंतराने जोडलेला आहे.



सुवेझ भूकंठ



सुवेझ कालवा

## 3. जलसंपत्ती

### आफ्रिकेतील नद्या

आफ्रिकेतील नद्यांना स्वत:ची अशी विविधता प्राप्त झाली आहे. बहुतेक नद्यानी आपल्या दऱ्यांच्या पात्रात लांब असा खोल भाग तयार केला आहे. धबधबे, वेगवानप्रवाह (Rapids) आहेत. पावसाळी ऋतूतच पाऊस पडत असल्यामुळे त्या या काळातच

©KTBS Not to be republished

वाहतात. नौकानयनाला उपयूक्त नाहीत. सर्व काळात वाहणाऱ्या नद्या कमी आहेत. आतील भागात नद्या जास्त आहेत.

आफ्रिका खंडात प्रमुख 4 नद्या आहेत. त्या म्हणजे नाईल, कांगो, नैजर आणि जांबेजी नद्या होय.

आफ्रिकेतील इतर महत्वाच्या नद्या म्हणजे सेनेगल, ऑरेंज आणि लिंपोपो या आहेत.

**नाईल नदी :** नाईल नदी ही जगातील अत्यंत लांब नदी असून ती 6,650 कि.मी. लांब पर्यंत वाहते. व्हिक्टोरीया सरोवरामध्ये नाईल नदीचा उगम झाला आहे. ती सहारा वाळवंटातून उत्तराभिमुख वाहत मेडीटरेनियन समुद्राला जाऊन मिळते. नाईल नदीकाठचा प्रदेश अत्यंत सुपीक आहे. हजारो लोकाना जगण्यासाठी सहाय्य झाली असून तेथील लोक त्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग करतात. अल-गजल नावाची डावीकडील उपनदी आणि सूबत, निली नाईल व अटबार या उजवीकडील उपनद्या आहेत.

निळ्या नाईल नदीचा उगम थाना सरोवरामध्ये (इथियोपिया) झाला आहे. आणि कार्टूम येथे पांढऱ्या नदीला सामाऊन घेते. नाईल नदीने जगप्रसिद्ध अशी सुपीक भूमी निर्माण केली आहे. या नदीवर बांधलेल्या धरणामधील 'अस्वान' धरण मोठे आहे.

**कांगो नदी :** कांगो किंवा जैरे नदी आफ्रिकेतील दुसऱ्या क्रमांकाची लांब नदी आहे. आफ्रिकेतील लोक या नदीला विविध नावांनी ओळखतात. हिच्या उगम स्थानामध्ये या नदीला **'लुआपुला'** असे आणि उरलेल्या सगळीकडे 'लुअलाब' असे संबोधतात.

कांगो नदी विषुववृत्ताजवळ उगम पावून प्रथम उत्तरेला त्यानंतर नैर्ऋत्येला 4640 कि.मी. लांब वाहत जाऊन अटलांटीक समुद्राला मिळते. ही आफ्रिकेच्या मध्यभागातील विषुववृत्त अरण्यातून वाहते. या नदीवर प्रसिद्ध लिवींगस्टन धबधबा निर्माण झाला आहे. परंतू नदी काठी सुपीक भूमी नाही.

©KTBS Not to be republished




**आफ्रिकेतील नद्या**

©KTBS Not to be republished

**नैजर नदी :** आफ्रिकेतील तिसऱ्या क्रमांकाची लांब नदी आहे. ही नदी पश्चिम किनारपट्टीच्या उंच भागामध्ये उगम पावलेली आहे. ही सुद्धा अटलांटीक महासागराला जाऊन मिळते. ही वर्षभर भरुन वाहणारी नदी नाही. या नदीची लांबी 4000 कि.मी. आहे.

**जांबजी नदी :** आफ्रिकेतील चौथ्या क्रमांकाची प्रमुख नदी आहे. ही आफ्रिकेच्या दक्षिण भागातील महत्वाची नदी आहे. ही मध्य आफ्रिकेतील प्रदेशामध्ये उगम पावून आग्नेयेकडे वाहते. हिंदूमहासागराला जाऊन मिळते. या नदीच्या पात्राच्या लांबपर्यंत भरपूर जोराच्या प्रवाहामुळे धबधबे निर्माण झाले आहेत. यांच्यामध्ये विशिष्ट असा 'व्हिक्टोरिया धबधबा' आहे. या नदीचा प्रवाह कांही ठिकाणी लांब अशा खोल भागातून वाहतो. त्यामध्ये ''करीबकंदर'' प्रसिद्ध आहे. या नदीची लांबी सुमारे 3500 कि.मी. इतकी आहे.



**व्हिक्टोरिया धबधबा**

**सेनेगल नदी :** ही नदी गिनीच्या घौटा जाल्लोन मैदानी प्रदेशात उगम पावते. नंतर वायव्येला 1640 कि.मी. वाहत जाऊन शेवटी अटलांटीक समुद्राला जाऊन मिळते. मारीटानीय आणि सेनेगल प्रांतातील सिमेवरुन वाहते.

## 4. हवामान, नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी संपत्ती

**हवामान :** अत्यंत लांब आणि रुंद असलेला आफ्रिका खंड उत्तरगोलार्ध आणि दक्षिणार्धगोलार्धात विस्तारलेला आहे. म्हणून याला 'केंद्रस्थान भूखंड' असे म्हणतात. या खंडाच्या मध्यभागातून विषुववृत्त गेले असल्यामुळे सूर्यांची किरणे लंबरुपाने पडतात. त्यामुळे या खंडामध्ये उष्ण कटीबंधातील हवामान आहे. सोबत आणखीन काही अंश आफ्रिकेतील हवामानावर प्रभाव टाकतात. उदा : उंच पर्वत नाहीत, समुद्र प्रवाह, पूर्व-पश्चिमेला जास्त विस्तार आणि रचना हे होय. सहाराच्या पश्चिम किनाऱ्याच्या लांब पर्यंत वाहणारा (किनरी प्रवाह) आणि कलहरी पश्चिम किनारपट्टीला मिसळून घेतल्या प्रमाणे वाहणारा थंड समुद्र (बेंग्वल प्रवाह), किनारपट्टीच्या सखल मैदानी प्रदेशाना मिसळून घेतलेल्या भागांचा उष्मांश कमी करतो. हे दोन्ही शित प्रवाह असल्यामुळे जास्त उष्णता आणत नाहीत. परंतू आग्नेय किनाऱ्याला मिळवून घेऊन वाहणारे मोसांबीक उष्ण सागरी प्रवाह जास्त उष्णता आणण्याबरोबर पाऊस पाडतो.

©KTBS Not to be republished

उंच पर्वत नसल्यामुळे आणि विविध हवामानाच्या पट्ट्यांची कमतरता असल्यामुळे येथे उष्णकटीबंधातील हवेच्या मुक्त संचाराला वाव मिळतो. यामुळे हवामानातील बदल संथगतीने घडतात.

आफ्रिकेतील हवामानावर पावसाचे महत्वाचे पात्र आहे. विषुववृत्ताजवळ पाऊस जास्त पडतो. या प्रदेशामध्ये वर्षात सरासरी 200 सें.मी. इतका पाऊस पडतो. आणि विषुववृत्तापासून जसे दूरजावे तसे पावसाचे प्रमाण कमी कमी होत जाते. सहारा, कलहारी, आणि नामीबीया प्रदेशामध्ये पाऊस फक्त 15 से.मी. इतकाच पडतो. तसेच कॅमरुन हा आफ्रिकेतील अत्यंत उष्ण प्रदेश असून वार्षिक सरासरी 1016 सें.मी. इतका पाऊस पडतो.

**हवामानाच्या परिस्थितीच्या आधारे आफ्रिका खंडाचे 8 विभाग पडतात ते खालील प्रमाणे.**

1 विषुववृत्ताचा उष्ण प्रदेश
2 सेव्हाना हवामानाचा प्रदेश
3 उष्ण कटीबंधातील वाळवंटीप्रदेश
4 मेडीटरेनियन प्रदेश
5 समशितोष्ण कटीबंधातील गवताळ कुरणांचा प्रदेश
6 उंचावरील हवामानाचा प्रदेश
7 समशितोष्ण कटीबंधहवामानाचा प्रदेश
8 कोरडया हिवाळ्याचा समशितोष्ण कटीबंध

**1. विषुववृत्ताचा उष्ण प्रदेश :** हा विषुववृताच्या दोन्ही बाजुकडे पसरलेला सखल प्रदेश तसेच कांगो मैदानापासून गिनी प्रदेशापर्यत विस्तारलेला आहे. येथील हवामान वर्षभर अतिउष्ण आणि पाऊस यानी युक्त आहे. येथे रोज दुपारच्या वेळी वळीव(downpour) पाऊस पडतो. तो सतत पडणारा पाऊस आहे. अतीउष्ण व दमट या प्रकारचे हवामान हीतकारक नसते.

**2. सेव्हाना हवामानाचा प्रदेश:** हा प्रदेश सोमालिया, इथियोपिया, सुदान, चाड, आणि नैजर प्रातांचा समावेश झालेला आहे. हे नमुनेदार हवामान जास्त सुदान मध्ये दिसून येते. यामुळे याला 'सुदानचे नमुनेदार हवामान' म्हणून ओळखतात. येथे तापमान जास्त असते. ते सखल प्रदेशापेक्षा पूर्वभागातील उंच प्रदेशात कमी असून उन्हाळ्यात जास्त पाऊस पडतो.

©KTBS Not to be republished




**हवामानाचे प्रदेश**

**3. उष्णकटीबंधातील वाळवंटी प्रदेश :** आफ्रिका खंडाचा उत्तरभाग आणि दक्षिण भाग या दोन्ही ठिकाणीही वाळवंटी प्रदेश आहेत. या प्रदेशात उन्हाळ्यात अति उष्मांश असले तरी हिवाळ्यात थंडी असते. उन्हाळा आणि हिवाळ्या पेक्षाही दिवसा आणि रात्रीचे उष्मांशामध्ये मोठ्या प्रमाणात फरक असतो. पाऊस फार कमी असतो. ढगांची रचना फार मनोहारी असते.

**4. मेडिटरेनियन हवामानाचा प्रदेश :** आफ्रिका खंडाच्या उत्तरेकडील किनारपट्टीचा प्रदेश आणि दक्षिणेतील टोकाच्या भागामध्ये अशा प्रकारचे हवामान आढळून येते. या

©KTBS Not to be republished

प्रदेशात मोराको, उत्तर अल्जेरिया आणि तांबडा प्रांत यांचा समावेश आहे. अति उष्ण आणि कोरडा उन्हाळा व थंड आणि पाऊस पडणारा हिवाळा हे या हवामानाचे मुख्य लक्षण आहे. हा असा एकच हवामानाचा प्रदेश आहे की हिवाळ्यात पाऊस पडतो.

**5. समशितोष्ण गवताळ कुरणांचा प्रदेश :** याला उन्नत वेल्ड (श्रेष्ठ क्षेत्र) प्रदेश असे देखील म्हणतात. डच भाषेमध्ये वेल्ड (Veldts) म्हणजे क्षेत्र असा अर्थ होतो. या हवामानाचा प्रदेश दक्षिण आफ्रिकेच्या आतील भागामध्ये आढळून येतो. हा भाग समुद्र किनाऱ्यापासून दूर आहे. यामुळे हिवाळा आणि उन्हाळ्यातील उष्णतेच्या प्रमाणामध्ये फार फरक असतो. उन्हाळ्यात तापमान जास्त आणि हिंवाळ्यात गार असते. या दोन्ही काळामध्ये पावसाचे प्रमाण कमी असते.

**6. उंचावरील हवामानाचा प्रदेश :** यात इथियोपियाचा उत्तरभाग आणि पूर्व आफ्रिकेचा भाग समाविष्ठ झाला आहे. समुद्र सपाटीला जास्त उंचीच्या प्रदेशात थंड हवामान असते. पावसाचे प्रमाण कमी असून फक्त उन्हाळ्यातच पडतो.

**7. समशितोष्णं कटीबंध हवामानाचा प्रदेश :** हा प्रदेश ड्रेकन्सबर्ग पर्वताचाभाग व मादागास्कर द्वीप सामावून पूर्व किनाऱ्यापर्यंत विस्तारलेला आहे. येथील हवामानामध्ये उन्हाळ्यात अति उष्ण आणि पावसाळ्यात व हिंवाळ्यात देखील थंड आणि कोरडे असते.

**8. कोरडया हिंवाळ्याचा समशितोष्ण कटीबंध :** हा आफ्रिकेच्या आग्नेय भागात सामावलेला आहे. अतिशय गरम आणि पाऊस पडणारा उन्हाळा आणि सौम्य व कोरडा हिवाळा हि या हवामानाची मुख्य लक्षणे आहेत. विषुववृत्त प्रदेशात तीव्र हवामानाच्या कटीबंधात पावसाचे प्रमाण येथेही आढळून येते. परंतू उंच आणि दमट हवामानामुळे उष्णता विभागणी मध्ये बदल होतो.

## नैसर्गिक वनस्पती

आफ्रिकेतील नैसर्गिक वनस्पती वर्गामध्ये विविधता आहे. कारण वनस्पती आणि प्राणी वर्गावर हवामान, माती, भौतिक परिस्थिती आणि मानवाचा संचार यांचा परस्परपूरक प्रभाव स्पष्टपणे आढळून येतो. या खंडाच्या जास्तीत जास्त भागामध्ये वनस्पतींचे स्वरुप मानवी कृत्याने बदलले आहे. बहुतेक अरण्य आणि गवताळ कुरणे विविध उद्देशासाठी तोडलेले आहे आणि पेटविलेले आहे. यामुळे आफ्रिका खंडातील प्रस्तुत वनस्पती वर्गामध्ये नैसर्गिकता नाही.

© KTBS Not to be republished




Not to be republished ©KTBS

**नैसर्गिक वनस्पती**

विषुववृतातील अति उष्ण आणि आद्रताभरीत हवामान तेथे घनदाट अरण्ये तयार होण्यास उपयुक्त झाले आहे. झाडे उंचच्याउंच वाढतात. विषुववृतातील सदाहरित अरण्ये असण्याचे मुख्य कारण म्हणजे तेथील झाडाना असणारी रुंद पाने आणि मोठ्या मोठ्या वनस्पती होय.

विशेष लक्षणे असणारी झाडे येथे फार विरळ आहेत. तरीसुद्धा उष्ण कटीबंधातील मौल्यवान (किंमती) सुगंधी असलेली झाडे, रबर, बीट, एबोनी, शिसम, नारळ, ताड, करिमर इ झाडे वाढतात. मँग्रोव वनस्पती सुद्धा समुद्राच्या दलदलीच्या प्रदेशात वाढते.

विषुववृतावरील सदाहरीत अरण्याच्या उत्तर आणि दक्षिण भागात (Baobab) बाभूळ आणि बेअबॉव वृक्षांची अरण्ये आहेत. कमी पाऊस असलेल्या अरण्य प्रदेशात काटेरी वनस्पती व गवताळ प्रदेश आहेत. काटेरी वनस्पती आणि पाईन, जेनिफर, कार्क, सिडार, फीग व ऑलीव झाडे विषुववृतीय हवामानाच्या प्रदेशात आढळतात.


बेअबॉब वृक्ष

पठारी प्रदेशाच्या उंचावरील भागात पर्वतीय वनस्पती आणि सहारा तसेच कलहारी भागात वाळवंटीय वनस्पती आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या टेकडीमय भागात प्रसिद्ध खुरटया वनस्पती, नाईल नदीच्या खोऱ्यात सड नावाची विशेष वनस्पती आढळते.

## प्राणी

आफ्रिकेतील वन्यप्राण्यामध्ये फार विविधता आहे. तेथील हवामानाची परिस्थिती, भूलक्षणे, अरण्य, मातीचा प्रकार आणि आशिया तसेच युरोप खंडाचा संपर्काचा यावर परिणाम पडला आहे. भरपूर पाऊस असलेल्या अरण्य प्रदेशात बहुतेक प्राणी विशाल देहाचे आहेत. चिंपाझी, विविध प्रकारची माकडे, गोरीला, रानगायी, चित्ते आणि इतर खूर असलेले प्राणी येथे आढळतात.

सूसर आणि पानहत्ती तसेच पानथळ दलदलीच्या प्रदेशात आकर्षक विविध रंगाचे पक्षी येथे आढळतात. उदा : शहामृग, गरुड, बगळा इत्यादी.

Not to be republished ©KTBS



**प्रमुख वन्यप्राणी**

झेब्रा, रानमांजर, जिराफ, गेंडा, हरिण, हत्ती, इंपाल, चित्ता आणि आफ्रिकन सिंह उष्ण प्रदेशातील गवताळ आणि सॅव्हाना प्रदेशात आढळतात.

वाळवंटी प्रदेशात विंचू, उंट, पाल, वाळवंटीय कोल्हा, विविध प्रकारचे कीटक आढळतात. त्याचप्रमाणे हरिणाच्या जातीतील सुंदर प्राणी, गाढव, घोडा व अड्डाक्ष इत्यादी प्राणी आढळतात.

KTBS
Not to be republished





**इंपाल व अड्डाक्ष**

उंट हा फार महत्वाचा आणि सर्वांना परिचित वाळवंटीय प्राणी आहे. याला वाळवंटातील जहाज असे म्हणतात.

**शहामृग**

हा आफ्रिकेतील मूळपक्षी असून तो कलहारी वाळवंट व आफ्रिकेच्या दक्षिणेकडील मैदानी प्रदेशात आढळतो. हा जगात सर्वात मोठा पक्षी होय. याचे अंडे सर्वात मोठे असते. तो उडू शकत नाही. पण अत्यंत वेगाने पळू शकतो. तसेच हा पायाना दोन बोटे असणारा जगातील एकमेव पक्षी आहे.



**शहामृग**

## 5. शेती आणि उद्योगधंदे

आफ्रिकेतील बहूतेक लोकांचा शेती हाच मुख्य उद्योग आहे. सुमारे 75 टक्के लोक शेती करतात.

विषुववृत प्रदेशाचा भाग सोडून आफ्रिकेच्या बहुतेक देशामध्ये शेती हाच जीवनाचा

©KTBS Not to be republished

आधार आहे. आधुनिक अवजारांचा तसेच रासायनिक खतांचा व कीटनाशकांचा उपयोग फार कमी प्रमाणात करतात. बहुतेक भागात मशागतसुद्धा माणसे श्रमातून करतात. प्रती हेक्टरी कमी उत्पादन मिळते.

बहुतेक शेती प्रदेशात आहारधान्याची लागवड हिच महत्वाची मानली जाते. मका, भात, राळे, रताळी आणि कडधान्ये, वाटाणा व पिष्टमय पदार्थांची पिके पिकवितात. विषुववृतीय प्रदेशात जास्तीतजास्त शेती हा व्यवसाय केला जातो. आफ्रिकेत पिकणारी इतर पिके म्हणजे ऊस, केळी, चहा, तेलवर्गीय पिके आणि लिंबूच्या जातीतील फळे. हे सर्व मोठया बागामधून व पाण्याच्या प्रदेशात पिकवितात.

सेनेगल, मारीटानीया, माली, नैजर, चाड, उत्तर सुदान, ईथियोपिया व सोमालिया देशाला वरचेर दुष्काळाचा सामना करावा लागतो. तेथील लोक भूकेने व्याकूळ झालेले असतात.

आफ्रिका विविध जातीच्या फळांसाठी प्रसिद्ध आहे. विषुववृत्तीय प्रदेशात लिंबूच्या जातीच्या फळांची लागवड करतात. ऑलीव, लिंबू, संत्रे, द्राक्षे इ, पिके पिकवितात. पूर्व आफ्रिकेत मोसंबी पिकवितात. जांजीबार बेट आणि टांझानिया लवंग पिकासाठी प्रसिद्ध आहे.

येथे जोंधळा हे महत्वाचे पीक आहे. काही प्रदेशात भात व ऊस पिकवितात. फळांच्या पिकापैकी कॉफी, ताड, कोको मध्य, पूर्व आणि आफ्रिकेच्या इतर भागात पिकवितात. इथियोपियामध्ये कॉफीचे पीक इजारो वर्षापासून घेतले जाते. ईजिप्त देशात कापूस पिकवितात.

युरोपच्या जवळील केनिया, दक्षिणआफ्रिका आणि झिंबाब्वेमध्ये पशु संगोपन हा मुख्य उद्योग आहे. जगातील 15% पशुधन आफ्रिका खंडात आहे.

**शेतीच्या मागासलेपणाची कारणे :** आफ्रिकेतील शेती मागासण्याची अनेक कारणे आहेत. जूनी शेती करण्याची पद्धत, जिवनावश्यक शेती पद्धती, जून्या कृषी अवजारांचा वापर, निरक्षरता, जून्या चालीरीती, अपूरे भांडवल व परदेशी गुंतवणूकीचा अभाव ही कारणे होत.

©KTBS Not to be republished

### उद्योगधंद्याच्या मंद विकासाची कारणे :

• आफ्रिकेतील अनेक देश पाणी, अरण्य आणि खनिजाने समृद्ध आहेत. या नैसर्गिक संपतीची विभागणी समान नाही. येथील बऱ्याच देशानी अधिक शेतीचा अवलंब केला आहे.

• मागे अनेक शतकापासून आफ्रिकेतील नैसर्गिक साधनसंपती युरोपीयनानी लुटून नेली. हेच येथील उद्योगधंदे मंदीने उदयास येण्याचे कारण होय. त्याचप्रमाणे उद्योगधंद्यासाठी आवश्यक सोयी सवलतींची कमतरता, कमी भांडवल, तंत्रज्ञानाचा अभाव, कुशल कामगारांची कमतरता, कमी उत्पादन तसेच राजकीय अस्थिरता यामुळे आफ्रिका देशात उद्योगधंद्याची प्रगती दिसून येत नाही.

• अलिकडच्या काळात झिंबाब्वे, नायजेरिया, ईजिप्त, अल्जेरीया आणि दक्षिण आफ्रिका या देशानी उद्योग धंद्याना चालना दिली आहे. स्वातंत्र्यानंतर आफ्रिकेतील अनेक देशानी लघुउद्योगाच्या प्रगतीला प्रोस्ताहन दिले. शेती उद्योग, औषधे, आहार संस्करण व पाणी उद्योगाना चालना दिली.

• मोठया उद्योगामध्ये लोखंड, रबर, सिमेंट आणि पेट्रोलियम तयार करणे यासारखे उद्योग दक्षिण आफ्रिकेत केंद्रीकृत झाले. अल्जीरीया, ट्यूनिसीया, ईजिप्त आणि झिंबाब्वे या देशात पोलाद उद्योग प्रगतीपथापर आहे. आफ्रिकेमधील इतर प्रमुख उद्योगधंदे म्हणजे विद्युत उपकरणे तयार करणे, वाहतुकीची साधने, ट्रॅक्टर तयार करणे आणि युद्धविमान तयार करणे हे होत.

## 6. मूल्यवान खनिजे

### हिरे व सोने

आफ्रिका खंड अपार खनिज संपतीने समृद्ध आहे. त्यापैकी किंमती खनिजे म्हणजे हिरे, सोने आणि प्लाटीनियम जास्त प्रमाणात उत्पादीत केले जाते.

**हिरे :** जगातील 80% हिरे आफ्रिका खंडात उत्पादीत करतात. जैरे आणि दक्षिण आफ्रिका येथे हिऱ्याचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. तसेच अंगोला नामिबीया व घाना हे हिऱ्याचे प्रमुख उत्पादन करणारे देश. हिऱ्यांचे नैसर्गिक खडा व उद्योगधंद्यात तयार केलेला हीरा असे भाग केलेले आहेत. किंबर्ली व प्रिटोरिया येथे हिऱ्यांना पैलू

©KTBS Not to be republished

पाडण्याचा मोठा उद्योग चालतो. तसेच काच कापण्याची उपकरणे येथे तयार केली जातात.

**सोने :** जगात उत्पादीत सोन्याच्या निम्मे सोने आफ्रिका खंडात सापडते. वीटवाटर्सरांड (ट्रान्सवाल) आणि अरेंज फ्री स्टेट या राज्यात सोन्याच्या खाणी आहेत. या खंडातील 50% पेक्षा जास्त सोने दक्षिण आफ्रिका, झिंबाब्वे आणि कांगो गणराज्यातून पूरवठा केले जाते.




प्रमुख खनिजे

©KTBS Not to be republished

# 7. लोकसंख्या वाढ, विभागणी आणि घनता

जगात सर्वप्रथम माणूस दिसल्याची व उपकरणांचा वापर करण्याची कला आफ्रिकेत झाल्याचे समजतात. मानवशास्त्रज्ञांच्या व वैज्ञानिकांच्या मते होमोसेपीयन हे आफ्रिका खंडातील केनिया आणि ईथियोपिया मधील पूर्व सरोवराच्या जवळ आढळल्याचे समजते.

प्रामुख्याने निग्रो आणि त्यांचे मूळनिवासी गटागटाने राहत. आता आफ्रिकेत अनेक जाती आणि वर्ग आहेत. या खंडात वेगवेगळ्या लोकांचे, भाषांचे आणि संस्कृतीचे मिलन झाले आहे.




लोकसंख्येची विभागणी

©KTBS Not to be republished

सुमारे 1051 मिलीयन लोक आफ्रिका खंडात राहतात. नायजेरिया, ईजिप्त, इथियोपिया, जैरे आणि दक्षिण आफ्रिकेत लोकांची घनता जास्त आहे. गेल्या तीन दशकात आफ्रिकेतील काही राष्ट्रातून मरण प्रमाण कमी झाले आहे. त्याचे कारण म्हणजे आहाराचे जास्त उत्पादन, औषधांचा पुरवठा आणि स्वच्छता राखण्यामध्ये झालेली सुधारणा होय. जन्मप्रमाण जास्त झाल्यामुळे लोकसंख्या घनता वाढली वाआहे. जगाशी तुलना केल्यास आफ्रिकेचे जननप्रमाण जगाच्या सरासरी प्रमाणापेक्षा जास्त आहे.

सोमालिया, इथियोपिया, चाड, नायजेरिया, माली या देशात जीवनकाळ फार कमी म्हणजे 50 वर्ष आहे.

विशेष बाब म्हणजे लोकसंखेची विभागणी असमान झालेली आहे. आफ्रिकेच्या खाणींच्या प्रदेशात, नाईल नदीच्या खोऱ्यात, पूर्व आफ्रिकेचा उत्तर प्रदेश, मादागास्कर आणि उत्तरेकरील दक्षिण आफ्रिकेची गिनीची किनारपट्टी या ठिकाणी लोकसंख्या दाट आहे.

वाळवंटी प्रदेश, पर्वतमय प्रदेश आणि विषुववृतीय अभयारण्यात विरळ लोकसंख्या दिसून येते. लिबियाच्या सहारा आणि अल्जेरियामध्ये लोकसंख्येची घनता कमी आहे. येथील लोकसंख्येची घनता 15 लोक प्रती चौरस कि.मी. इतकी आहे.

आफ्रिकेच्या लोकांची चार गटात विभागणी करु शकू. (1) पिग्मी, बुशमेन आणि मसायी. हे सहारा वाळवंटाच्या दक्षिण भागात राहतात. (2) अरब, उत्तर आफ्रिकेत राहतात. (3) इंडीयन, दक्षिण आणि पूर्व आफ्रिकेत राहतात. (4) युरोपियन दक्षिण आफ्रिका आणि इतर सुपीक नद्यांच्या खोऱ्यात राहतात.

## नविन शब्द

पर्याय द्वीप, खाडी, वाळवंट, खाण, सरोवर, जीवनकाळ, लोकसंखेची घनता, मुख्य रेखांश, भूकंठ, कर्कवृत्त, मकरवृत्त, यज्ञ.

©KTBS Not to be republished

## तुला माहित असू दे

- नाईल नदीचा बहूतेक भाग सहारा वाळवंटातून जातो. पण ती सूकून-जात नाही कारण नदीच्या जलानयन प्रदेशात भरपूर पाऊस पडतो.
- सहारा वाळवंटाने आफ्रिकेचा उत्तर भाग व्यापलेला असून ते जगातील मोठे वाळवंट आहे.
- लिबियाच्या इल अजीजीयामध्ये जगातील जास्तीत जास्त तापमान $50^{o}$ सेल्सीयस नोंद झाली आहे.
- अड्डाक्ष नावाचा प्राणी उंच वर्तूळाकार शिंगे असणारे हरिण आहे. तो पाणी पीत नाही. त्या ऐवजी आपल्याला आवश्यक पाणी खात असलेल्या गवत व वनस्पती पासून मिळवितो.
- आफ्रिकेत बेअबॉब नावाचा वृक्ष आहे. त्याचा आकार बाटलीसारखा असून त्याच्या खोडात पाणी भरलेले असते. ते 1000 ते 12000 लिटर असते. काही प्रवासी या पाण्याचा वापर करतात.
- जगातील शेकडा 24 भाग कॉफीचे उत्पन्न आफ्रिकेत होते.
- जगात 50 टक्के पेक्षा जास्त कोको आफ्रिकेत उत्पादीत करतात.
- पीग्मी लोक जगात कमी उंचीचे (ठेंगू) असतात. ते कांगोच्या खोऱ्यात राहतात.
- आफ्रिका खंडाच्या लोकात जास्त शक्ती असते. पण त्याचा जीवनकाळ कमी असतो.
- आफ्रिका खंडात 800 पेक्षा जास्त भाषा बोलल्या जातात.
- आफ्रिकेत ग्रामीण लोकसंख्या जास्त आहे. येथील नगर वस्ती कमी आहे.

Not to be republished ©KTBS

**गटात चर्चा करुन उत्तरे लिहा.**

1 आफ्रिकेला काळा खंड असे का म्हणतात ?

2 आफ्रिकेला केंद्रीय खंड असे का म्हणतात ?

3 भूकंठ म्हणजे काय ? आफ्रिकेचे भूकंठ कोणते ?

4 आफ्रिकेच्या समतल भागाचे नाव सांगा.

5 आफ्रिकेतील सर्वात उंच पर्वत शिखर कोणते ?

6 आफ्रिकेतील विविध वनस्पती सांगा.

7 आफ्रिकेतील सर्वात लांब नदी कोणती ?

8 आफ्रिकेतील प्रमुख पिके कोणती ?

9 आफ्रिकेच्या कोणते देश हिऱ्यांचे उत्पादन करतात ?

**उपक्रम :**

1 आफ्रिका खंडातील प्रमुख सरोवरे नकाशात ओळखा.

2 आफ्रिकेचे प्रमुख पर्वत व नद्या नकाशात दाखवा.

3 कर्नाटकातील बेअबॉब वृक्षांच्या चित्रांचा संग्रह करा.

4 आफ्रिकेतील अड्डाक्ष आणि आपल्या भारतातील हरिण यांची तूलना करुन लिहा.

* * * * *

©KTBS Not to be republished